संगीत

प्रणयमुद्रा नाटक.

विठ्ठल सीताराम गुर्जर.

बई.]

संगीत प्रणयमुद्रा नाटक.

हें

विठ्ठल सीताराम गुर्जर

यांनीं केलें.

उघडा करितां होइल
    दूषकखलदृष्टिमक्षिका पात ।
रसिकांसि शोधितों मी
    तों चषकावरि असो तुझा हात ॥ १ ॥

—मोरोपंत—

सन १९०५; शके १८२७.

किंमत बारा आणे.

मुंबई:—विजय छापखान्यांत छापिलें.

समर्पण

केवळ ज्यांचीं नाटकें, स्फुट कविता, टीकाविषयक
व इतर लेख यांच्या वाचनामुळें मला हें
नाटक लिहिण्यास स्फूर्ति झाली, असे

रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर,

बी. ए. एलएल. बी.

वकील–तेल्हारा

व

संगीत वीरतनय, मूकनायक व गुप्तमंजूष
या नाटकांचे कर्ते

यांस,

त्यांच्या अनेक सद्गुणांवर लुब्ध होऊन, मजवर
असलेल्या त्यांच्या प्रेमाचें अंशतः तरी
उतराई व्हावें म्हणून

हें नाटक

सप्रेमादर व अत्यंत कृतज्ञताबुद्धीनें
अर्पण केलें आहे.

वि. सी. गुर्जर.

दोन शब्द.

प्रस्तुत नाटक महाकवि शेक्स्पियरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या सुप्रसिद्ध नाटकावरून लिहिलें आहे. येथें प्रथमच सांगितलेलें बरें, कीं मूळ नाटकाचें हें अगदीं तंतोतंत प्रतिबिंब नाहीं. इकडील रंगभूमीसाठीं ही कृति तयार केल्यामुळें हींत कोठें कोठें फेरफार केलेले आढळतील.

नाटकाचा काल ब्राह्मणधर्म व बौद्धधर्म यांच्या कलहानंतरचा व ब्राह्मणधर्माचें वर्चस्व स्थापित झाल्याबरोबरचा कल्पिला आहे. इकडील चालीरीतींशीं अत्यंत विसदृश अशा आंग्ल चालीरीतींना भारतीय रूप देणें—त्यांतून विवक्षित काळांतील रूप देणें—हें काम बेमालूमपणें साधणें अगदीं असाध्य नसलें, तरी बरेंच कठिण आहे; ह्मणून इंग्रजी भाषणसंप्रदाय, आचार, विचार इत्यादिकांची झांक या प्रतिकृतींत दिसून येईल.

यापेक्षां येथें विशेष लिहिण्यासारखें नाहीं. रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर बी. ए. एल्एल्. बी. यांच्या उपकारांसंबंधीं दिग्दर्शन समर्पणपत्रिकेंत केलेंच आहे. प्रसिद्ध नाटककार रा. रा. गोविंद बल्लाळ देवल यांनीं हें नाटक वाचून ज्या उपयुक्त सूचना केल्या त्यांबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. श्रीमहालक्ष्मीप्रासादिक संगीत नाटक मंडळीनें हें नाटक रंगभूमीवर आणिलें, ह्मणून त्या मंडळीचे व 'विजय' छापखान्याचे उत्साही व मनमिळाऊ

मालक रा. रा. गणेश नारायण जोशी यांनीं श्रम घेऊन पुस्तक लौकर छापून दिलें, या संबंधानें त्यांचे आभार मानणें हें मी अवश्य कर्तव्य समजतों.

मुंबई—२५ मे १९०५.

पुस्तककर्ता.

॥ श्री ॥

संगीत प्रणयमुद्रा नाटक.

मंगलाचरण.

[हमीर–चौताल.]

वंदन विभुवरास। यत्पदपंकज मधुकरगणसम सेवि-ति सुरनर ॥ आस्ताई ॥ करि जो हे लोक पूत। मंगलगण यत्प्रभूत। हरी प्रभु जो सदा दुरित। करुणानिधि थोर वितत। नित्य सर्वगत सकलनि-गमनुत भुवनावनपर ॥ वंदन० ॥ १ ॥

[पूर्वी–त्रिवट.]

प्रणति करीं ही तुजसि शारदे। तव सुकृपा करिते मूढहि ते ज्ञानवंत सुखदे ॥ धृ० ॥ दिव्य प्रतिभा निज पाडुनियां हरिसि जनांचें तिमिर विश्व हें भरिसी अतुल मुदें ॥ प्रणति० ॥ १ ॥

[दिंडी]

महोदधि जे पावित्र्यमंगलांचे।
तेविं करुणेचे थोर निचय साचे ॥

सकल सुरमुनि वितरोत ते तुह्मातें ।
संतत सुकृपामांगल्यविमलतांतें ॥ १ ॥

अंक पहिला.

प्रवेश पहिला.

(मणिपुर-रस्ता.)

(धनदत्त, मेघकांत व मेघनाद येतात.)

धनदत्त–खरोखर, माझी अशी स्थिति कां व्हावी हें समजत नाहीं–

[धाडुनि दिधलें दासी०]

मन्मानस कां आजि असें हें भाराक्रांतचि होई ।
उदासीनता व्यापी मजला न सुचे अंतरिं कांहीं ॥धृ०॥
उल्हास नसे अल्पहि चित्ता शून्य जगत्त्रय वाटे ।
आत्मस्थितिही ओळखण्यातें कठिण जहालें मातें ।
व्याधि काय ही, कोठुनि आली, कैशी मज जडली तें ।
कांहिं कळेना भ्रांतचित्त मी ऐसा होउनि जाई ॥ १ ॥

मेघकान्त–या तुझ्या उदासीनतेचें कारण मला दुसरें कांहीं दिसत नाहीं. तुझें मन समुद्रावर गटंकळ्या खात आहे. मौल्यवान् मालानें भरलेलीं तुझीं गलबतें हल्लीं समुद्रावर फिरत आहेत. आणि तुझी बहुतेक धनदौलत तर त्यांतच अडकून राहिली आहे.

तीं सर्व सुरक्षितपणें परत कशीं येतात याचीच तुला काळजी लागली आहे, असें दिसतें.

मेघनाद–असें होणें अगदीं साहजिक आहे. याच्याप्रमाणें माझी दौलत जर या धोक्याच्या व्यापारांत अडकून राहिली असती तर मलाही अशीच काळजी लागून राहिली असती. वारा कसा वहात आहे, याची मी क्षणोक्षणीं चौकशी केली असती. माझ्या गलबतांना वाटेंत सोईचीं, सुरक्षितपणें मुक्काम करण्या-सारखीं बंदरें कोठलीं आहेत, खडक भोंवरे वगैरे धोक्यांचीं स्थलें कोणतीं आहेत, हें मी नकाशांत बारंबार सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतें आणि मला एकसारखी तळमळ लागून राहिली असती.

मेघकान्त–माझीही स्थिति तुझ्यासारखीच झाली असती. ऊन दूध थंड होण्यासाठीं फुंकर घालीत असतां, समुद्रावरील वादळाची आठवण होऊन मला ताप भरला असता ! कलमदानांतील वाळू पाहून, माझीं गलबतें वाळूंत रुतून त्यांचा नाश झाला आहे असें मला भासलें असतें ! एखादी दगडी इमारत पाहून, माझीं गलबतें खडकावर आपटून त्यांचे तुकडे तुकडे झाले आहेत, त्यांच्या फळ्या, डोलकाठ्या वगैरे समुद्रावर तरंगत आहेत, लाटा त्यांतील मौल्यवान रेशमीवस्त्रें, किनखाब वगैरे हिकडून तिकडे फेंकीत आहेत, क्षणापूर्वी मी किती श्रीमंत होतों आणि आतां या क्षणांत माझ्या गलबतांच्या नाशामुळें केवढ्या कंगाल स्थि-तींस पोंचलों आहें, या सर्व गोष्टींचें भयंकर चित्र माझ्या डोळ्यां-समोर ताबडतोब उभें राहिलें असतें! खरोखर, असे विचार मनांत आले ह्मणजे अशी स्थिति खरोखर आली तर काय होईल, अशी काळजी वाटून मन उदासीन होणारच. धनदत्त आपल्या धना-च्या काळजीनें असा उदासीन झाला आहे.

धनदत्त–छे, माझ्या उदासीनतेचें कारण हें नाहीं. सुदैवानें माझें सर्व धन एकाच गलबतांत अडकून राहिलेलें नाहीं किंवा माझीं सर्व गलबतें एकाच ठिकाणीं गेलीं आहेत असेंही नाहीं. तसेंच माझी सर्व दौलत याच एका वर्षावर अवलंबून आहे असें पण नाहीं. माझ्या धनाच्या काळजीमुळें मी असा उदासीन झालों आहें असें मला वाटत नाहीं.

मेघकान्त–तर मग तूं कोठें तरी प्रेमाच्या तडाक्यांत सांपडला आहेस!

धनदत्त–छे छे,

[स्वार्थीं जी प्रीति०]

लवही तें स्थल न मम हृदयीं प्रीतिला ॥ धृ० ॥
शक्त सुंदरी कवण कराया प्रीतिबद्ध मजला ॥ १ ॥
चित्रसृष्टि करि त्या ईशानें स्वभाव हा रचिला ॥ २ ॥
आश्चर्यप्रद होइ तुह्मातें मजहि तसा झाला ॥ ३ ॥

मेघकान्त–काय, हेंही कारण नाहीं ह्मणतोस? तर मग तूं आनंदांत नाहींस ह्मणून उदास आहेस असें ह्मटलें पाहिजे. तुला उदास असणें आणि आनंदानें हसणें खिदळणें हीं दोन्हीं सारखींच आहेत. तूं आतां मोठ्यानें हंसशील आणि ह्मणशील कीं मीं उदासीन नाहीं ह्मणून आनंदांत आहे. जगांत असे कांहीं विलक्षण लोक आहेत कीं, कांहीं अगदीं क्षुल्लक, न हसण्यासारख्या गोष्टीवरूनही सारखे हसत सुटतात आणि कांहीं असे आहेत कीं, मोठे गंभीर पुरुषही एखाद्या गोष्टीमुळें हसतील पण ते कधींही हसणार नाहींत.

[**वसंत**, **तरंग** आणि **कलहंस** प्रवेश करितात.]

मेघनाद–हे पहा, वसंत, कलहंस आणि तरंग आले. आतां

आह्माला जावयाला हरकत नाहीं. आमच्यापेक्षां हे तुमचे जवळचे मित्र.

मेघकांत–तुझी उदासीनता जाईपर्यंत मी येथें तुजजवळ राहिलों असतों पण आतां हे आल्यानंतर माझी विशेष जरूरी नाहीं.

धनदत्त–तुमची योग्यता मी फार मोठी समजतों. मला वाटतें तुमचेंच कांहीं काम असेल आणि या निमित्तानें तुह्मी जात आहां.

मेघकांत–नमस्कार, हो मंडळी नमस्कार.

वसंत–नमस्कार. पण तुह्मी आह्माला आतांसे परकी कां मानावयाला लागलां ? तुह्मी असे लागलेच कां निघालां ? बरें जा. पण पुनः आतां कधीं भेट ?

मेघकांत–पुनः फुरसतीनें लवकरच भेटूं.

[मेघकांत व मेघनाद जातात.]

कलहंस–वसंता, तुझी आणि धनदत्ताची भेट झालीच आहे, आह्मी दोघेही जातों आतां. पण भोजनाचे वेळीं तेथें भेटावयाचें ठरलें आहे, हें ध्यानांत असूं दे.

वसंत–तें मी नाहीं विसरत.

तरंग–धनदत्त महाराज, तुमची तब्येत आज बरी दिसत नाहीं. जगासंबंधीं तुह्माला मोठीच काळजी दिसते बुवा. पण ही काळजी चांगली नाहीं. हिजपासून तुह्माला सौख्य ह्मणून लागावयाचें नाहीं. खरोखर सांगतों, तुमच्यांत आज फार फरक दिसतो आहे.

धनदत्त–तरंगा, मी जगाची किंमत विशेष मानीत नाहीं—

[झिंझोटी–त्रिवट.]

जगती रंगभूमिशी । वाटे खास मानसीं ॥ धृ० ॥

जगत्सूत्रधर भूमिका नियत करी ती ती । जन या
रंगस्थलीं पहा घेउनियां येती ॥ जग० ॥ १ ॥
उदासीनतास्वभाविका भूमिकाच मजसीं । ईशवरानें
नेमियली आचरितों तिजसी ॥ २ ॥

तरंग-माझी भूमिका विदूषकाची आहे. माझ्या म्हातारपणापर्यंत हा माझा आनंदी आणि विनोदी स्वभाव टिकावा अशी माझी इच्छा आहे. उदास आणि चिरचिऱ्या स्वभावापेक्षां आनंदी आणि विनोदी स्वभाव किती उत्तम ! तरुणपणीं अंगांत ताजें रक्त खेळत असतां, म्हाताऱ्या आजोबाप्रमाणें अथवा एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें मनुष्यानें सत्त्वहीन आणि उदासीन कां दिसावें ? जागृतावस्थेंत असतां निद्रेंत असल्याप्रमाणें आपण सुस्त कां असावें ? धनदत्त, माझें तुमच्यावर अंतःकरणापासून प्रेम आहे आणि त्या प्रेमामुळेंच मी हें बोलतों आहें. कांहीं लोक इतरांनीं आपणाला शहाणे, खोल, विचारशील म्हणावें म्हणून आपल्या चेहऱ्यावर नासक्या पाण्यानें भरलेल्या डबक्याप्रमाणें गंभीरता धारण करतात आणि कोणाशीं सहसा बोलत नाहींत आणि ते बोलत नाहींत म्हणूनच शहाणे समजले जातात ! पण जर एखादे वेळीं त्यांनीं तोंड उघडलें तर इतर लोक त्यांना मूर्खशिरोमणि म्हणून ताबडतोब ठरवितात. धनदत्त, यासंबंधीं मी तुम्हाला पुनः कधीं तरी बोलणार आहें; आतां एवढेंच सांगतों कीं, मी आतां वर्णन केलेल्या लोकांप्रमाणें इतरांनीं आपणास गंभीर म्हणावें म्हणून तुम्ही उदासीनता दाखवूं नका. कलहंसा, चल. धनदत्त, आम्ही जातों आतां.

कलहंस-बरें तर आम्ही जातों. तरंगानें वर्णन केलेल्या या शहाण्या आणि मुक्या लोकांपैकींच मी एक आहें अथवा मला व्हावें लागलें आहे. कारण तरंग मला बोलूंच देत नाहीं !

तरंग–मजपाशीं सतत दोन वर्षें राहिलास तर तुझा स्वतःचा स्वरही तुला ओळखूं येणार नाहीं !

धनदत्त–बरें, या तर. तूं उपदेश केल्याप्रमाणें मी आतां पुष्कळ बोलावयास लागणार आहें !

तरंग–फार उत्तम. अबोलपणा फक्त जनावरांना किंवा अबलांना योग्य. (तरंग आणि कलहंस जातात.)

धनदत्त–वसंता, तरंगाचे बोलण्यांत कांहीं तथ्य असतें का ?

वसंत–या मणिपुरांत तरंगासारखा वाचाळ मनुष्य कोणीही नसेल. आणि त्याच्या बडबडींत तथ्यही कांहीं नसतें. त्याच्या बोलण्यांतलें तथ्य ह्मणजे पोतेंभर कोंड्यांत गव्हांचे दोन दाणे असावे, त्याप्रमाणें असतें आणि ते सांपडावयाला सबंध एक दिवस खर्च केला पाहिजे. व सांपडलेंच तर श्रमाच्या मानानें तें अगदीं क्षुल्लक असतें.

धनदत्त–बरें वसंता, तूं एका तरुणीच्या खटपटींत आहेस, तिच्या संबंधी हकीगत तूं मला आज सांगणार होतास, ती सांग आतां.

वसंत–मित्रा, हें तुला ठाऊक आहे कीं–

[सार्थचि ते वदती०]

वेंचियलें धन तें ॥ मित्रा ॥ लघु जें संग्रहिं मम कीं होतें ॥ धृ० ॥ वैभवदंभें राहुनियां जनिं । मग्न जाहलों मी तयें ऋणीं । शल्य सदा हें सलतें मम मनिं । क्लेश अमित जें मजला देतें ॥ वेंचियलें धन०॥१॥

आणि या ऋणांतून प्रामाणिकपणानें आणि न्यायमार्गानें माझी कशी मुक्तता होईल ही काळजी मला रात्रंदिवस लागून राहिली आहे. धनदत्ता, मजवर तुझे फार उपकार झाले आहेत. मजवर

तुझें फार प्रेम आहे. आणि ह्मणूनच या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं केलेले सर्व बेत मी तुला सांगतों आहें.

धनदत्त–वसंता, मी ते सर्व ऐकायाला तयार आहें. तूं नेहमीं ज्या प्रामाणिकपणाच्या मार्गानें जातोस तो मार्ग जोंपर्यंत तूं सोडला नाहींस तोंपर्यंत प्रत्येक कामांत मी तुला साहाय्य करीन, याबद्दल तुला तिळमात्र शंका नको. माझें सर्व धन, फार काय माझा प्राणसुद्धां तुजकरतां मी देईन !

वसंत–या माझ्या हकीगतींत ज्याचा संबंध आहे अशा एका लहानपणाच्या खेळाची तुला आठवण देतों. अहाहा ! लहानपणचे खेळ किती निर्व्याज असतात–

[कपोला कपोलाचि०]

अहा मानसा निर्मला दाविती । मुलें खेळ जे शैशवीं खेळती ॥ धृ० ॥ कधीं चाप घेवोनि शर सोडितां । न तो सांपडे कीं त्यजी दृक्पथा ॥ १ ॥ तदा त्या दिशेनेंच तैशा शरा । दुजा सोडिं दृष्टीस लावीं खरा ॥ २ ॥ दुजा बाण हा प्रथमनिकटीं पडे । अशा रीति शरयुग्म मम सांपडे ॥ ३ ॥

धनदत्ता, पैशासंबंधीं तर मी तुझा बराच ऋणी आहें आणि जें ऋण आजपर्यंत तूं मला दिलेंस तें सर्व मी तारुण्याच्या भरांत उधळून टाकिलें. आतां मी सांगितलेल्या खेळांतील पहिल्या बाणाप्रमाणेंच हें धन गेलें आहे. परंतु पुनः एकदां तसाच धनरूपी बाण त्याच दिशेनें जर तूं सोडलास–आणि आतां त्यावर मी अगदीं तीक्ष्ण नजर ठेवीन-तर माझी खात्री आहे कीं हे दोनही बाण आपल्याला सांपडतील. निदान हा दुसरा बाण तरी हटकून सांपडेलच सांपडेल.

धनदत्त–वसंता, तूं मला पूर्णपणें ओळखतोस, मग अशा वांकड्या तऱ्हेनें कां सांगतोस ? मजबद्दल तुला शंका आहेसें दिसतें. मग मी तुझा मित्र कसला आणि तूं माझा मित्र कसला ? मित्रा–

[सूनी है तूने बाते ०]

मनिं किंतु असा नच आणी । वच सुहृदा मदीय
मानी ॥ धृ० ॥ होइल मोद नितांत अहा मज त्वदर्थ
जीवितदानीं ॥ १ ॥ वित्ताची मम काय कथा मग
त्यागिन सर्व निदानीं ॥ २ ॥

तूं मला सांग मात्र–मी ही माझी मान तुला तोडून देईन.

वसंत–धनदत्ता, धनदत्ता, हें काय ?

[पिलू–त्रिवट.]

वदसी सुमित्रा कां असें । मजसी शंका नसे ॥ धृ० ॥
त्वदीय उपकृतिभारीं पूर्वींच विनम्र झालों असें ॥ १ ॥
कृतघ्नत्व वद वर्तुनि ऐसा पदरीं घेऊं कसें ॥ २ ॥

तुला मी आतां त्या श्रीरत्नाविषयींच हकीगत सांगतों. रत्नपुरांत पद्मराग म्हणून एक अति सधन आणि बलाढ्य सरदार होते. ते नुकतेच दोन तीन वर्षांपूर्वी परलोकवासी झाले. त्यांची मृणालिनी नांवाची एकुलती एक उपवर कन्या आहे–

[परम सुवासिक पुष्पें०]

रत्नपुरींतें जगतातें वा ललामभूता ती रमणी ।
रूपगुणगणां विलासिनीच्या वर्णावें जगतीं कोणीं॥धृ०॥
जैशी नयनां प्रमोद वितरी कासारस्था मृणालिनी ॥
मृणालिनी ही तैशी भुवना प्रमोदकर हो रूपगुणीं ॥१॥

आणि मित्रा,—

[दक्ष करना मुजकु०]

कांति जेवीं विमल राहे कांचनीं ।
शीतता चंद्रातपीं वा या जनीं ॥ धृ० ॥
तेवीं ती रुचिराननना स्वर्गीची सुरांगना ।
सर्वदा सुहृदा वसे या मन्मतीं ॥ १ ॥

धनदत्त–तूं तत्त्वज्ञानांत शिरत चाललास, बरें पुढें ?

वसंत–तिच्या सौंदर्याविषयीं जिकडे तिकडे बातमी पसरली आहे. ठीकच आहे—

[देस–त्रिवट.]

जैं विकच कमल आमोदभरें । भरि दाहि दिशा
परितोषकरें । तैं मधुप येति धांवोनि त्वरें ॥ धृ० ॥
परिसोनि तेविं लावण्य असें । प्राप्त्यर्थ इच्छा झणिं
येत असे । जनसंघ जरीहि सुदूर वसे ॥ १ ॥

धनदत्ता, तिच्या प्राप्तीसाठीं आलेल्या लोकांप्रमाणें मानमरातबानें रहाण्यासारखी जर माझी पैशासंबंधानें तयारी असती आणि मी तेथें गेलों असतों तर तिची प्राप्ति मला खात्रीनें होती. मी पूर्वी रत्नपुरास होतों तेव्हां ती मजवर अनुरक्त झाली होती असें कांहीं कारणांवरून मला खात्रीपूर्वक वाटत आहे.

धनदत्त–वसंता, तुला ठाऊक आहे कीं, माझी सर्व धनदौलत हल्लीं समुद्रावरील व्यापारांत अडकून राहिली आहे. सांप्रत मजजवळ कांहींही रोख रक्कम अगर विकून पैसे उभारतां येण्याजोगा मालही नाहीं. ह्मणून आतां माझ्या येथील पतीवरच रक्कम उभी केली पाहिजे. मृणालिनीच्या प्राप्तीसाठीं तुला रत्नपुरास जातां

यावें ह्मणून मणिपुरांतील माझ्या पतीवर जितकी तुला पाहिजे असेल तितकी रक्कम काढ. रक्कम कोठें मिळण्यासारखी आहे तें चौकशी करून मला कळीव. मीही त्याच कामासाठीं जातों.

वसंत–ठीक आहे. वाहवा ! हें पाहिलेंस का इकडे ?

[सैनिकू सैना०]

मार्गातें व्योमीं क्रमोनी क्रमें हा । अहा भानु अस्ताचलीं येत पाहा ॥ धृ० ॥ दिनभरी जे श्रमती जनखग वा ते । येती श्रमातें हराया स्वगेहां ॥ १ ॥ तरणिचंडातपीं धरणी बहु तापे । शांत अतां ही सुसंध्यावगाहा ॥ २ ॥

चला आपणही जाऊं. [जातात.]

प्रवेश दुसरा.

(स्थळ–रत्नपुर.)

(मृणालिनीच्या वाड्यांतील एक खोली–मृणालिनी व विशाखा बसल्या आहेत.)

मृणालिनी–विशाखे, या जगाचा मला अगदीं वीट आला आहे.

विशाखा–तो कां ताईसाहेब ? तुमच्यावर जो अगदीं सुखाचा वर्षाव चालला आहे तितकाच जर दुःखाचा होता तर एक तुमचें हें बोलणें शोभलें असतें. या तुमच्या बोलण्यावरून मला एवढें मात्र दिसतें कीं, एखाद्या भुकेबंगाल कंगाल मनुष्यापेक्षां लक्षाधीश मनुष्याची स्थिति विशेष सुखी नसते. तर मग

मध्यम स्थितींतील लोकांची स्थिति फार चांगली. ज्यावर लक्ष्मी-ची कृपा अतिशय असते व जो तिचाही मनमुराद उपयोग करितो तो लवकर वृद्ध होतो; परंतु जो मध्यम स्थितींत असतो तो दीर्घायु होतो.

मृणालिनी–वाहवा ! तुझीं हीं वाक्यें ह्मणजे उपदेशपर ह्मणीच ह्मणावयाच्या ! आणि तूं त्यांची योजनाही चांगली केली आहेस.

विशाखा–आणि त्यांच्या प्रमाणें जर आचरण ठेविलें, तर तीं विशेष चांगलीं दिसतील.

मृणालिनी–विशाखे, चांगलें वाईट समजण्या इतकेंच जर आच-रण ठेवणें सोपें असतें तर—

[क्यूं है देर लगाई प्यारो०]

सुखमय जग सारें हें होतें । सुखमय जग सारें हें ॥ धृ० ॥ दुःखदुरितगण अघहि सकल तें विलयास पहा जातें । देवहि जगता प्रेमें गाते ॥ सुखमय जग० ॥ १ ॥

या जगांत कृति करण्यापेक्षां उपदेश करणें फार सोपें असतें आणि बोलण्याप्रमाणें कृति करणें तर फारच कठिण. मनो-विकारांना आवरून धरण्यासाठीं मन कसेही नियम करो तरी उच्छृंखल मनोविकार त्यांना पार झुगारून देतात. तारुण्य हें एखाद्या चपळ सशाप्रमाणें आहे. आणि तें शहाणंपणरूपी कुंपणें ताडताड उडून जातें. पण या तत्त्वज्ञानाचा मला काय उपयोग ? सद्यःस्थितीकडे आपण वळूं या. विशाखे, मी खरेंच सांगतें–

[ही का देवी वनींची०]

अबलांसम हतभागी । नच कोणी जगतीं दुःखां

भोगी ॥ धृ० ॥ लवही स्वातंत्र्याचा । न कदा मिळतो त्यांतें साचा ॥ १ ॥ त्यांतुनि ललनावृंदीं । हतदैवा मजसम कोणी न कधीं ॥ २ ॥

विशाखा–आतांचे आतां हे तुमचे दुसऱ्यानें उद्गार. मी विचारितें कीं तुह्मी आपल्याला हतभागी कां ह्मणतां ? मला वाटतें कीं, तुमच्यासारख्या सुखी तुह्मीच. संपत्ति विपुल–आणि तुह्मी नाहीं ह्मणतां पण स्वातंत्र्यही तुह्माला आहेच.

मृणालिनी–विशाखे, हा तुझा केवळ भ्रम आहे. आई लहानपणींच परलोकवासी झाल्यामुळें मला आईचें सुख कसें तें मुळींच मिळालें नाहीं. बाबांचें सुख माझ्या नशीबीं बरेंच होतें, पण तेंही निष्ठुर दैवाला आवडलें नाहीं, दोन वर्षांपूर्वीं तेही मला सोडून गेले ! त्यांची विपुल संपत्ति माझ्या हातीं आली व तूं ह्मणतेस त्याप्रमाणें मी एकाअर्थीं स्वतंत्र झालें खरी. पण हें स्वातंत्र्य केवळ नांवाचेंच ! माझ्या लग्नासंबंधी बाबांनीं कांहीं अट घालून ठेविली आहे. ती अट जो कोणी पुरी करील त्यालाच माझ्या आवडीनावडीवर पाणी सोडून मला वरिलें पाहिजे. विशाखे, मला कोणालाही नाकारतां येत नाहीं, आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणें कोणालाही वरतां येत नाहीं, हें माझें दुर्भाग्य नव्हे का ? मला जें स्वातंत्र्य नको तें आहे ! आणि जें पाहिजे तें नाहीं !

विशाखा–पद्मराग महाराज सदा सुशील, सद्गुणी व धर्मनिष्ठ होते व अशा धर्मपरायण माणसांना मरणसमयीं ईश्वरी प्रेरणा होते असें ह्मणतात. तेव्हां तुमच्या बाबांनीं या तीन पेट्यांच्या निवडणुकीवर तुमच्या वराचा निर्णय व्हावा असें जें ठरविलें आहे तें उगीच नसेल. सोनें, रुपें व लोखंड यांच्या केलेल्या या तीन पेट्यांतून एक विवक्षित पेटी जो कोणी निवडील त्यालाच तुह्मीं वरिलें

पाहिजे अशी जी पद्मराग महाराजांनीं अट घातली आहे ती तुमचें कल्याण व्हावें याच हेतूनें घातली असेल. मला वाटतें कीं, तुह्माला जो अगदीं योग्य वर असेल, जो तुमच्यावर अगदीं निर्मळ प्रेम करील तोच ती पेटी निवडील. बरें, पेट्यांची निवडणूक करावयाला हे इतके लोक हल्लीं आले आहेत त्यांच्याविषयीं तुमचें काय मत आहे ?

मृणालिनी–या प्रश्नाचें उत्तर मी एकदम कशीं देऊं ? तूं प्रत्येकाचें नांव घेत चल. मग त्याविषयीं माझें ह्मणणें काय आहे तें मी सांगतें.

विशाखा–बरें, ते विलासपुरचे राजपुत्र नंदी ?

मृणालिनी–वः ! तो नंदी ह्मणजे खरोखरच नंदी–बैल मला वाटतो ! त्याला कोणाची पर्वाच वाटत नाहीं. जसा एखादा मस्त पोळ रस्त्यानें आपल्याच तोऱ्यानें चालत असतो, तसेच हे नंदिराज आपल्याच कुर्ऱ्यांत नेहमीं असतात ! त्याचें नंदी हें नांव ठेवण्यांत त्याच्या मातापितरांची मोठी चतुराई दिसून येते खरी !

विशाखा–वाः ताईसाहेब ! त्याचें आपण अगदीं हुबेहूब वर्णन केलेंत. बरें, ते दुसरे सुवर्णदुर्गचे सरदार मदनसिंह ?

मृणालिनी–वः तो ना–

[वाटे आडवा येतो०]

अंसे तरुण परि दिसे जरठसम सुवीर्य लवहि न तयीं वसे । सदा रुदनयुत गमे तदानन कदा स्थलहि तें मुदा नसे ॥ पिशाचही मज रुचेल वर परि तदीय दर्शन नको मला । प्रभो दयाघन, कुतापमोचन, कृपा करी पुरवि हेतुला ॥ १ ॥

ईश्वर करो आणि या दोघांपैकीं एकाबरोबरही माझा विवाह न होवो !

विशाखा–आणि ते मगधदेशचे राजपुत्र नंदन ?

मृणालिनी–ब्रह्मदेवानें त्याला मानव शरीर दिलें आहे ह्मणूनच मी त्याला मनुष्य ह्मणतें. विशाखे, आपण कोणाची कुचेष्टा करूं नये, हें खरें. पण अशा तऱ्हेच्या मनुष्याशीं संबंध आला ह्मणजे बोलल्याशिवाय रहावत नाहीं. मघाशीं त्या दोघांविषयीं जें वर्णन केलें तें त्यालाही लागू पडतें. शिवाय त्याचा स्वभाव अगदीं मासलेवाईक आणि लहरी ! आज एक तर उद्यां दुसरेंच ! भांडखोर पहिल्या प्रतीचा ! भांडावयाला त्याला कोणी नाहींच मिळालें तर तो आपल्या छायेशीं तरी भांडेल ! वीस जणांची तब्बेत सांभाळणें सोपें, परंतु याची एकट्याची तब्बेत संभाळणें कठिण ! मला जर त्यानें नाकारलें तर बरेंच झालें, नाहीं तर काम ठीक नाहीं. त्याच्यावर प्रेम बसणें कधींच शक्य नाहीं.

विशाखा–बरें, ते श्वेतपुरचे सरदार क्रूरसिंह ?

मृणालिनी–विशाखे—

[या तरुणा तांबुल०]

त्या पशुहुनी यमहि बरा वाटतो मनीं ॥ ध्रु० ॥
शारदेसि जो रिपुसम मानी, अरिसा तीहि तयाला ।
पशुचि खरा गमतो तो संचरतो कीं या भुवनीं ॥ १ ॥

आणि त्याचा पोषाक तरी किती विचित्र असतो ! जसा कांहीं नाटकांतील विदुषकच !

विशाखा-बरें, ते चंद्रपुरचे सरदार चंद्रकान्त ?

मृणालिनी–तो अगदीं भित्रा आहे. त्याच्यांत पाणी कसें तें नाहींच. परवां त्या क्रूरसिंहानें त्याला दोन ठोसे चढविले, परंतु तोंडाच्या बडबडीशिवाय त्याच्या हातून कांहीं झालें नाहीं !

तसेंच त्या नंदनानेंहीं त्याला यथास्थित चोप दिला, पण हा जाऊन पोरीप्रमाणें रडत बसला !

विशाखा–आणि शेवटचे वंगदेशाचे कांतिवर्म महाराज ?

मृणालिनी–तो कधीं तरी शुद्धीवर असतो का ?

[माडिवरी चलग गडे०]

अमितसुरापानरक्तनयन जो सदा ।
त्रुटितवाक्प्रलाप मुखिं यदीय सर्वदा ॥ धृ० ॥
सकलमहादोषनिधि विशाल जो निका ।
सौख्यलेश तरि मिळेल त्यासि वरुनि का ॥ १ ॥

एखादा पशु आणि तो सारखाच–मी त्याला कधींही वरणार नाहीं.

विशाखा–पण त्यानें तीच पेटी निवडली आणि तुह्मी जर त्याच्याशीं विवाह केला नाहीं तर बाबासाहेबांच्या इच्छेविरुद्ध नाहीं का हें होत ?

मृणालिनी-आणि ह्मणूनच सांगतें कीं, तो पेट्यांची निवड करावयाला येईल तेव्हां त्या नेमक्या पेटीशिवाय दुसऱ्या कोणत्याही पेटीवर सुंदर मदिरेनें पूर्ण भरलेला असा एक प्याला ठेवा ! ह्मणजे तो हटकून तीच पेटी निवडील ! अशा मनुष्याबरोबर विवाह करण्यापेक्षां जीव देणें बरें !

विशाखा–ताईसाहेब, ह्यांपैकीं कोणाचीही भीति तुह्माला बाळगावयाला नको. त्यांनीं परत जावयाचा निश्चय केला आहे हें मला आतांच कळलें. तुह्माला व्यर्थ त्रास देण्याची त्यांची इच्छा नाहीं. पेटीच्या निवडणुकीची जी बाबासाहेबांची अट आहे ती त्यांना मुळींच पसंत नाहीं. दुसरी एखादी अट पत्करण्यास ते तयार आहेत.

मृणालिनी–मी जन्मभर अशीच कुमारिका राहीन. पण बाबांची अट कधींही मोडूं देणार नाहीं. त्याच अटीवर माझा विवाह झाला पाहिजे. या ब्यादींची थोडक्यांतच समजूत पडली हें एक बरें झालें ! खुशाल जावोत बिचारे ! मला त्यांतील एकाविषयींही वाईट वाटणार नाहीं !

विशाखा–ताईसाहेब, बाबासाहेब असतानां सरदार विक्रमसिंहांबरोबर मणिपुरचे एक तरुण गृहस्थ आले होते. त्यांची आठवण आहे का तुह्माला ?

मृणालिनी–हा वेडे ! आठवण आहे का ह्मणून काय विचारतेस ! त्या दिवसापासून त्यांची मूर्ति माझ्या ह्या हृदयांतून एक क्षणभर ही दूर झाली नाहीं. पण करावयाचें काय ? माझें नशीब ! (मोठा सुस्कारा टाकते.)

विशाखा–तेच वसंतराज तुह्माला योग्य ! ताईसाहेब, आजपर्यंत मी तसा पुरुष कधींही पाहिला नाहीं. त्याचें विस्मरण कोणालाही होणार नाहीं.

मृणालिनी—होय, विशाखे,—

[यमन–त्रिवट]

नरवर तो हृदयीं या वसे । तन्मूर्ति विस्फुटा ती ठसे
॥ धृ० ॥ स्वरूपसौभाग्यें जो मदना । लाजवितो त्या
मृगांकवदना । सकलसुगुणगणसुंदरसदना । विसरावें गे मी कसें ॥ १ ॥

[एक सेवक येतो.]

कोरे–काय काम आहे ?

सेवक–ते सहाजण निघून जात आहेत. ते ताईसाहेबांचा जाव-

याला निरोप मागतात. आणि केरलराजाकडून एक दूत आला आहे, तो सांगतो कीं केरलराज आज रात्रीं येथें येतील. [जातो.]

मृणालिनी–ते सहाजण जात आहेत तों हा सातवा येऊन ठेपला. काय माझ्या नशीबीं असेल तें खरें ! विशाखे, तूं जा, मी येतेंच. [विशाखा जाते.] ते वसंतराज या अभागिणीला प्राप्त होतील काय ?–

[मूर्तिमंत भीति०]

काय होय नरवर तो प्राप्त मज कधीं तरी ।
राहि जो सदा सुबद्ध या मदीय अंतरीं ॥ ध्रृ० ॥
इष्टहेतुघातक तें दैव साह्य होइ का ।
मानसा विचार हा कंपयुत पहा करी ॥ १ ॥

[जाते.]

प्रवेश तिसरा.

(स्थळ–मणिपुर.)

[सराफ बाजारचा रस्ता. शक्तिनाथ व वसंत.]

शक्तिनाथ–तीन हजार मोहोरा ह्मणतां ? बरें.

वसंत–होय, आणि मुदत तीन महिन्यांची.

शक्तिनाथ–मुदत तीन महिन्यांची ! ठीक.

वसंत–आणि मी तुह्मांला सांगितलेंच कीं, हें कर्ज धनदत्ताचे नांवावर काढावयाचें.

शक्तिनाथ–धनदत्ताचे नांवावर ! ठीक, ठीक.

वसंत–मग तुमचें ह्मणणें काय आहे ? कर्ज देतां काय ?

शक्तिनाथ–तीन महिन्यांचे मुदतीनें तीन हजार मोहोरा–आणि धनदत्ताचे नांवावर–

वसंत–शक्तिनाथ, आमचें ह्मणणें तुह्माला कबूल आहे काय ? पैसे देतां काय ?

शक्तिनाथ–धनदत्त चांगला मनुष्य आहे काय ?

वसंत–ह्मणजे तो चांगला नाहीं असें कोठें तुह्मीं ऐकिलें आहे कीं काय ?

शक्तिनाथ–छे छे छे छे छे ! माझें बोलणें तुह्मी समजलां नाहीं. मीं विचारलें कीं, धनदत्त पैशाच्या बाजूनें चांगला आहेना ? ह्मणजे माझे पैसे बुडणार नाहींतना ? कारण धनदत्ताची धनदौलत सुरक्षितपणें त्याचे हातीं येईल असें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. त्याचीं गलबतें माल घेऊन सिंहलद्वीप, मोहद्वीप, बलभद्र, ब्रह्मराष्ट्र वगैरे दूरदूरचे देशांना गेलीं आहेत. आणि असला व्यापार धोक्याचा असतो. कारण जहाजें तीं जहाजेंच ! तीं कांहीं दगडाचीं मजबूत केलेलीं नसतात ! आणि त्यांच्यावरचे खलाशी, नाखवे वगैरे हाडामासांचीं मनुष्यें असतात; तीं कांहीं देव नव्हत. शिवाय चोर आहेत, चांचे आहेत; वावळें, खडक, वावटळी यांच्याशीं गलबतांचा प्रसंग; तेव्हां त्यांचा नाश व्हावयाचा फार संभव. तरीही धनदत्ताचे श्रीमंतीविषयीं संशय घ्यावयास नको. तीन हजार मोहरा नाहीं का ? हो, मी द्यावयाला कबूल आहें. धनदत्त रोखा लिहून देईल काय ?

वसंत–हो हो ! अगदीं खात्रीनें लिहून देईल.

शक्तिनाथ–आणि मीही तो खात्रीनें लिहून घेईन. पण जरा विचाराचें काम आहे. धनदत्ताची आणि माझी गांठ पडेल काय ?

वसंत–त्याच्याकडे आपण जेवावयालाच जाऊं या.

शक्तिनाथ–छे छे छे! अंहं! तुह्मी कट्टे वैदिकधर्मी आणि मी पक्का बौद्ध; तुमचें आमचें एकत्र भोजन ? छे छे ! अगदीं नांव घेऊं नका ! तुमच्याशीं मी देवघेव करीन, क्रयविक्रय करीन, बोलेन चालेन, पण तुमच्याशीं कधीं खाणार पिणार नाहीं. प्रभु सुगतानें अजूनपर्यंत तरी तशी मला बुद्धि दिली नाहीं. बाजारांतली कशी काय खबरबात ? पण हा कोण आला ?

[धनदत्त येतो]

वसंत–हा धनदत्त आला.

शक्तिनाथ–[स्वगत] कसा दिसतो आहे ! एखादा व्यापारी आपल्या गिऱ्हाइकाची खुशामत करतांना जसा आर्जवशील मुद्रा धारण करतो, त्याप्रमाणें याची मुद्रा नेहमीं असते. हा वैदिक धर्माचा आहे, ह्मणूनच मी याचा द्वेष करतों. मोठा अगदीं साधे-पणाचा डौल करतो ! हा लोकांना बिनव्याजी कर्ज देतो, ह्मणून या मणिपुरांत व्याजाचा दर हलका होऊन बसला आहे, आणि यामुळें माझें अतोनात नुकसान झालें आहे. हा एकदां माझ्या तडाक्यांत सांपडो मात्र, ह्मणजे पूर्वीच्या सर्व कृत्यांचा असा कांहीं सूड घेतों कीं, यानें जगाला ताबडतोब नमस्कारच ठोकला पाहिजे! ‘ अहिंसा परमो धर्मः ’ ‘ अहिंसा परमो धर्मः ’ ह्मणून आमच्या भगवान् बुद्धाचा उपदेश आहे. पण बुद्ध गेला निर्वाणाला आणि मी आहें येथें मणिपुरांत ! आह्मा बौद्धांचा हा धनदत्त मोठा द्वेष्टा आहे. बाजारांत मोठ्या व्यापाऱ्यांच्या, सावकारांच्या देखत हा माझी छी थू उडवतो आणि फजिती करीत असतो;

कां ? तर माझ्या श्रमाच्या पैशावर मी व्याज घेतों ह्मणून. या वेळेला मीं याला क्षमा केली तर बुद्धाशपथ मी नरकांत पडेन.

वसंत–शक्तिनाथ, मग काय विचार ठरला ?

शक्तिनाथ–सध्यां मजजवळ रोख रक्कम किती आहे याचा मी हिशेब करीत होतों. नक्की सांगतां येत नाहीं, परंतु या वेळीं मजजवळ तीन हजार मोहोरांची रकम शिल्लक नाहीं असें वाटतें. पण त्यांत कांहीं हरकत नाहीं. माझा जातभाई भैरव याजकडून मी तेवढी रक्कम घेईन. पण मुदत किती पाहिजे ह्मटलेंत ? (धनदत्तास) कसें काय महाराज, ठीक आहे ना ? आतांच तुमचें नांव निघालें होतें.

धनदत्त–मी कोणापासून व्याज घेत नाहीं व कोणालाही देत नाहीं. परंतु या माझ्या मित्राची गरज भागविण्यासाठीं मी माझी नेहमींची रीत मोडण्यास तयार आहें. (वसंतास) तुला किती रकम पाहिजे आहे हें याला कळलें आहे का ?

शक्तिनाथ–होय, तीन हजार मोहोरा.

धनदत्त–आणि मुदत तीन महिन्यांची—

शक्तिनाथ–होय, मी अगदींच विसरलों होतों. तीन महिन्यांची मुदत ह्मणून यांनीं मला सांगितलें होतें. पण रोखा पाहिजे. पण मी कधीं व्याज घेत नाहीं आणि देत नाहीं असें ह्मणालेत नाहीं का तुह्मी ?

धनदत्त–होय, व्याज कधीं द्यावयाचें नाहीं व आपण कधीं घ्यावयाचें नाहीं अशी माझी तर चाल आहे.

शक्तिनाथ–आमचे चक्रवर्ती महाराज अशोक, यांचे वडील बिंबसार, यांच्या राज्यांत विरोचन ह्मणून एक मेंढपाळ असे–

धनदत्त–विरोचनाचा येथें काय संबंध ? तो व्याज घेत असे कीं काय ?

शक्तिनाथ–तुह्मी ज्याला व्याज ह्मणतां तसें प्रत्यक्ष व्याज तो घेत नसे. पण मी काय सांगतों तें ऐका–विरोचनाचें आणि त्याच्या धन्याचें असें ठरलें कीं, त्याच्या मेंढरांना जीं पट्टेदार कोंकरें होतील तीं विरोचनानें घ्यावीं—

धनदत्त–[मध्येंच] बस कर. विरोचनाचा आणि व्याजाचा कांहीं संबंध नाहीं. सोनें आणि रुपें तूं मेंढ्याच समजतोस कीं काय ? मेंढ्यापासून कोंकरें होतात त्याप्रमाणें सोन्यारुप्याची कांहीं वृद्धि होत नाहीं. ह्मणून व्याज घेणें हा नैसर्गिक व रास्त मार्ग नव्हे.

शक्तिनाथ–व्याज घेणें रास्त असो किंवा नसो; मेंढरांप्रमाणें सोन्यारुप्याची वृद्धि मी करतों–पण ऐका–

धनदत्त–वसंता, पाहिलेंस ? आपल्या कृत्याचा चांगुलपणा स्थापित करण्याकरितां एखादा अति नीच व दुष्ट मनुष्य देखील मोठमोठे शास्त्राधार किंवा ऐतिहासिक पुरावे काढून दाखवितो. असे शास्त्राधार दाखविणारे नीच लोक वरून हसतमुखी पण आंतून अति दुष्ट असतात. यांना उपमा ह्मणजे वरून सुंदर दिसणारें, परंतु आंतून कुजून घाणेरडें झालेलें असें फळ. शिव शिव ! या जगांत असत्य वरून किती मोहक दिसतें !

शक्तिनाथ–तीन हजार मोहोरा ह्मणजे बरीच मोठी रकम ह्मणावयाची–आणि मुदत वर्षापैकीं फक्त तीन महिने–ह्मणजे व्याज जरा–पण व्याजाचें कसें काय ?

धनदत्त–व्याज पाहिजे तें ठेव; पण पैसे दे.

शक्तिनाथ–धनदत्त महाराज, भर बाजारांत मोठमोठ्या सावकारांच्या समक्ष मी व्याज घेतों ह्मणून मला तुह्मी किती तरी वेळ शिव्या दिल्या आहेत; परंतु त्या सर्व मीं निमुटपणें सोसून घेतल्या. आह्मी बौद्ध सदा असेच सहनशील असावयाचे. मला तुह्मी यवन तर ह्मटलेंत–गाढव, कुत्रा वगैरे शिव्या तर नेहमीच्याच ह्मणा–‘ अशा गाढवांच्या तोंडावर थुंकलें पाहिजे ’ असें तर तुह्मी नेहमीं ह्मणतां–आणि याचें कारण काय ? तर निढळाच्या घामावर मिळविलेल्या पैशांवर मी व्याज घेतों. आणि गरज पडली तेव्हां कर्ज पाहिजे ह्मणून मजकडे आलांत आणि मला शिव्या हांसडणोरे, माझ्या तोंडावर थुंकणारे तुह्मी सावकार “ आह्मांला कर्ज पाहिजे. देतोस का शक्तिनाथ ? ” ह्मणून तोंड वेंगाडतां ! “ तूं भिकारडा कुत्रा, तुला लाथेखालीं बडविला पाहिजे,” असें परवांच तुह्मी मला ह्मणालांत आणि आतां कर्ज मागावयाला येतां. आतां मी तुह्माला काय उत्तर देऊं ? “ गाढवाजवळ किंवा कुत्र्याजवळ तीन हजार मोहरा कोठून असतील ? ” असें उत्तर जर यावेळीं मीं तुह्माला दिलें तर तें योग्य आहे कीं नाहीं ? किंवा “ तुह्मी गेल्या शनिवारीं माझ्या तोंडावर थुंकलेत किंवा अमूक एक दिवशीं तुह्मीं मला लाथेनें बडवीन ह्मटलेंत किंवा अमूक एक वेळीं तुह्मीं मला गाढव, कुत्रा असें ह्मटलेंत, हे तुमचे महदुपकार फेडण्यासाठीं तीन हजार मोहोरा कर्जाऊ देतों ह्या घेऊन मजवर उपकार करा, ” असें उत्तर जर आतां मीं दिलें तर तुह्माला कसें वाटेल ?

धनदत्त–या तीन हजार मोहोरा मित्रत्वाचे नात्यानें न देतां इतरांप्रमाणें व्याज घेऊन मला दिल्यास तर यापुढेंही मी तुला शिव्या दिल्याखेरीज रहाणार नाहीं. मित्रापासून कोणीही कधीं व्याज

घेत नाहीं. मी तुझा शत्रु या नात्यानेंच तू मला कर्ज दे. जर तुझी मुदत चुकली तर उजळ माथ्यानें मला वाटेल ती शिक्षा तुला देतां येईल.

शक्तिनाथ–हे आतांच पहाना तुह्मी रागावून किती बेफाम झाला ते ? असे रागावूं नका. शांत व्हा. तुमची मैत्री संपादन करण्यासाठीं मी मागचें सर्व विसरून तुमच्या गरजेसाठीं या वेळीं तीन हजार मोहोरा बिनव्याजी देतों. व्याजाबद्दल तुह्मी मला एक छदामही देऊं नका. मग तर झालें ? मला वाटतें कीं आज तुमच्याशीं तरी मी बराच उदारपणा दाखवितों आहें.

बसंत–खरोखरच ही उदारता ह्मणावयाची.

शक्तिनाथ–चला तर लिहा एक कर्जरोखा. आणि मौजेनें अशी एक अट त्यांत घातलेली असूं द्या कीं, अमुक दिवशीं अमुक ठिकाणीं या कर्जरोख्यांत लिहिल्याप्रमाणें मोहोरा धनकोस न मिळाल्यास धनको ह्मणजे शक्तिनाथ यानें ऋणकोच्या ह्मणजे धनदत्ताचे शरीरांतील वाटेल त्या भागांतील बरोबर अर्धशेर मांस काढून घ्यावें.

धनदत्त–बस, ठरलें; ही अट मला मान्य आहे. या अटीवर शक्तिनाथानें पैसे देणें ह्मणजे त्यानें मोठाच उपकार केला असेंच मी समजतों–चला लिहा रोखा.

बसंत–हां हां धनदत्ता, हें काय ?–

[परज–कालंगडा–धुमाळी.]

हें साहस नच आदरीं । घेसि कां या तरी ।
संकटा तुजवरी । ओढुनीयां ॥ १ ॥
मज रुचे न धन हें असें । जीविता पाशसें ।
स्वीकरावें कसें । गरल जैसें ॥ २ ॥

यापेक्षां मला ती मृणालिनी नको आणि हें असलें धनही नको. मी आहे याच स्थितींत संतोष मानीन.

धनदत्त–मित्रा, अगदीं भिऊं नकोस. त्यांत कांहीं भीति नाहीं. माझ्याकडून मुदत बिलकुल चुकावयाची नाहीं. आणि दोन महिन्यांच्या आंतच ह्मणजे याची मुदत भरण्यापूर्वी महिनाभर या कर्जाच्या दसपट रकम माझ्या हातीं येईल.

शक्तिनाथ–भगवान् भगवान् ! कसे हे लोक आहेत ! यांचीं स्वतःचीं अंतःकरणें दूषित असल्यामुळें यांना दुसऱ्यांचींही अंतःकरणें दूषित दिसतात. बसंत, तुह्मी मला एवढेंच सांगा, कीं यांची मुदत चुकली आणि आतां सांगितलेली अट पुरी करून घेण्याचें मीं मनांत आणलें तर मला त्यांत काय मिळणार ? मनुष्याचें अच्छेर मांस घेऊन मला फायदा तो काय ? त्यापेक्षां बोकडाचें जर अच्छेर मांस असतें तर आमच्या घरीं तो खादाड मंगलक आहे त्याच्या तरी उपयोगी पडलें असतें. शिवाय 'अहिंसा परमो धर्मः' हें आमच्या धर्मांचें मुख्य तत्त्व आहे. धनदत्ताची मैत्री संपादण्याकरितांच केवळ या विनोदाच्या अटीवर मीं बिनव्याजी पैसे देण्याचें कबूल केलें आहे. आजपर्यंत माझ्या जन्मांत मीं कोणाला बिनव्याजी पैसे दिले नाहींत. तुह्माला कबूल असेल तर होय ह्मणा, नाहीं तर हा मी चाललों.

धनदत्त–शक्तिनाथ, तुझें ह्मणणें मला कबूल आहे. तूं ह्मणतोस तसा रोखा लिहून देण्याला मी अगदीं तयार आहें.

शक्तिनाथ–ठीक तर; माझ्या पेढीवर जरा वेळानें या. मीं तोंपर्यंत भैरवाकडून पैसे आणतों. मी जातों तर. माझें घर त्या उनाड मंगलकाचे ताब्यांत आहे. तो काय अनर्थ करील याचा नेम नाहीं. कांहीं वेळानें मी पेढीवर येतों.

धनदत्त–ठीक आहे तूं जा–(शक्तिनाथ जातो.) वसंता, हें कसें झालें बोवा ?–

[दिंडी.]

नवल वाटे बहु आजि मन्मनासी ।
वृत्ति दुष्टाची पालटली कैसी ॥
जयें निजतापें जनां तापवावें ।
चंड रवि तो शशिसाम्यतेसि पावे ॥ १ ॥

वसंत–तुला नवल वाटतें, पण–

[शोच समज नादान०]

चिन्ह गमे न बरें । मला हें । हृदय कांपवी मम जें पाहें ॥ धृ० ॥ विनोद अभिधा देइ जया हा, जाण खचित तें भयकर आहे ॥ १ ॥ दुष्परिणतिकर घातक वाटे गरल तीव्र हें धन कीं नोहे ॥ २ ॥

धनदत्त–तुझी ही भीति उगीच आहे. त्याची मुदत भरण्यापूर्वी निदान एक महिना अगोदर माझीं गलबतें येतील समजलास ? चल तर. (पडदा पडतो.)

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

[रत्नपुर—मृणालिनीच्या वाड्यांतील एक खोली.]

[तुताऱ्यांचा ध्वनि; केरलराज, त्याचे अनुयायी; मृणालिनी विशाखा व इतर दासदासी येतात.]

केरलराज—सुंदरि, तुला इतकीच विनंति आहे कीं—

[पुंडरीककमलावरती०]

मम कृष्णवर्ण जरि साचा। तरि मजासि न अनादरावें ॥ धृ० ॥ स्वाधीन सुगुण मनुजाचे । वर्ण जसा दिधला दैवें ॥ १ ॥ प्रिय गौरकृष्ण ईशातें । समसमान तुजला ठावें ॥ २ ॥ चाल ॥ जो कोकिल सुस्वर गाई । तो कृष्णवर्ण गे पाहीं । पारि मराल शुभ्रचि होई ॥ चाल ॥ निजरामकृष्ण अवतारीं । श्यामवर्ण धरिला देवें ॥ ३ ॥

तुला एवढें मात्र सांगतों कीं, कोणताही अतिशय गौरवर्णाचा मनुष्य येऊं दे; तो आणि मी दोघेही आपआपल्या शरीरांतील रक्त काढून दाखवितों. मग त्याच्या रक्तापेक्षां माझें रक्त अधिक तांबडें आहे अशी तुझी प्रत्येक परीक्षेवरून खात्री होईल, इतर

वैभवांत तर नाहींच, पण प्रेमवैभवांतही माझ्यापेक्षां श्रेष्ठ असा पुरुष तुला कोणी मिळणार नाहीं. सुंदरि, खरेंच सांगतों, या माझ्या चेहेऱ्याकडे पाहूनच समरांगणांत हजारों वीरांच्या हृदयांत धडकी भरते ! आमच्या देशांतील अतिलावण्यवती युवतीही मजवर अनुरक्त झाल्या आहेत. हा माझा काळा वर्ण जरी मला बदलतां आला असता तरी तो मी बदलला नसता; पण तुझी इच्छा असती तर मात्र खास बदलला असता.

मृणालिनी–महाराज, वराच्या आवडीनिवडीसंबंधानें माझ्या हातांत कांहीं नाहीं–

[जंगला–दादरा.]

नसेचि प्राक्तनीं मदीय अल्पही स्वतंत्रता । जरी
दिसें स्वतंत्र मी ना तरीहि तत्त्वतां ॥ धृ० ॥
आवडे मना जरी । योग्य वर अहा तरी । त्या वरा
वया शकें न नृवर विवशतायुता ॥ १ ॥

मीं आपणांस अगोदर सांगितलें त्याचप्रमाणें त्या पेट्यांच्या निवडीवरून माझ्या वराची निवड व्हावयाची. माझ्या पूज्य पित्यानें माझ्या विवाहाविषयीं अशी अट जर घालून ठेवली नसती तर आपलें म्हणणें कदाचित् मला कबूल करतां आलें असतें [एकीकडे] तसें असतें तर आपली एकदमच पाठवणी करण्यांत आली असती.

केरलराज–तर मग त्या पेट्या ठेवल्या आहेत तिकडे मला घेऊन चल. माझ्या नशीबाची परीक्षा पाहूं या. सुंदरि, माझा पराक्रम तुझ्या कानावर कदाचित् आला नसेल. या माझ्या तरवारीनें रणांगणांत मीं हजारों वीरांना यमसदनां पाठविलें आहे. पण तुझा मी सेवकच आहें. सुंदरि, तुझ्या प्राप्तीसाठीं मी काय करूं तें सांग–

[झिंजोटी–दादरा.]

वद दुर्घट कृति काय आचरूं त्वदर्थ मी ।
आज्ञापीं; त्वरित चरण दास हा नमी ॥ धृ० ॥
स्तनपानरता सिंहशावकासि ओढितों ।
मदमत्तमतंगजमदासि झणिं निवारितों ।
बहुबलयुत जरि अरि तरि तो वधुनि टाकितों ।
तव वचपालनिं किंकर हा रतचि नेहमीं ॥ १ ॥

परंतु नशीबावर हवाला ठेवावयाचा ह्मणजे बलवान् व पराक्रमी पुरुषाचा पराभव होऊन, निर्बल व पराक्रमहीन पुरुषाची सरशी होण्याचा बराच संभव असतो. कदाचित् पेट्यांच्या निवडणुकींत मी चुकण्याचा संभव आहे. आणि तसें झालें ह्मणजे मृत्यूशीच माझें लग्न लागेल.

मृणालिनी–पेट्यांची निवड करण्यापूर्वी आपण नीट विचार करावा. आपली निवड चुकल्यास सर्व जन्मांत कोणत्याही स्त्रीशीं आपणास विवाह करतां येणार नाहीं. आपणास तशी शपथ घ्यावी लागेल, ह्मणून सांगतें कीं, अगोदर नीट विचार करा.

केरलराज–मी नीट विचार केला आहे. मला मेहरबानी करून त्या पेट्या जेथें आहेत त्या स्थळीं न्या.

मृणालिनी–पहिल्यानें आमच्या देवमंदिरांत देवापुढें आपणास शपथ घ्यावी लागेल. भोजनानंतर आपल्या नशीबाची परीक्षा पहा.

केरलराज–ठीक आहे. त्यावेळीं दैव मला साह्य करो.

[तुताऱ्यांचा ध्वनि होतो; जातात.]

प्रवेश दुसरा.

(मणिपुर—एक रस्ता.)

[मंगलक एका झाडाच्या फांदीवर बसला आहे.]

मंगलक—या आमच्या खाष्ट धन्याची नोकरी सोडून पळून जाऊं नको ह्मणून आमची सुबुद्धि आह्माला उपदेश करते आहे बुवा ! पण कुबुद्धि ह्मणते " मंगलका, अरे बेट्या मंगलका, पुत्रका मंगलका, अरे बेट्या बघतोस काय ? हूं, चल जा पळून. " पण सुबुद्धि ह्मणते " हां, असा अविचार करूं नको. मंगलका, पुत्रका मंगलका, तूं प्रामाणिक आणि इमानी आहेस. पळून जाऊं नकोस. अशा रीतीनें पळून जाणें नीचपणाचें आणि बेमानपणाचें काम आहे " पण पुनः कुबुद्धि येते आणि सांगते " बेट्या, विचार कसला करतोस ? पाय उचल आणि ठोक धूम " पण ती सुबुद्धि कांहीं केल्या ऐकत नाहीं. ती माझ्या अगदीं गळ्यांत हात घालून ह्मणते " मंगलका, तूं इमानी बापाचा प्रामाणिक पुत्र आहेस. " पण अहं—" तूं इमानी आईचा प्रामाणिक पुत्र आहेस " कारण, बाबांची कांहीं खात्री सांगतां येत नाहीं. ते आपल्या तारुण्यांत मोठे रंगेल होते ह्मणतात. सुबुद्धि ह्मणते " पळून जाऊं नको " कुबुद्धि ह्मणते " जा. " मी सुबुद्धीला सांगतों " तुझें ह्मणणें योग्य आहे " आणि कुबुद्धीलाही सांगतों " तुझेंही ह्मणणें योग्य आहे ! " आतां काय करावें बुवा ? दोहोंकडून मोठी पंचाइत आली. सुबुद्धीचें ऐकावें तर त्या खाष्ट धन्याच्या घरीं राहावें लागणार; आणि त्याचें घर असें आहे कीं प्रत्यक्ष नरक पुरवेल, पण त्या थेरड्याचें घर नाहीं पुरवणार. कुबुद्धीचें ऐकावें तर ती बोलून

चालून कुबुद्धि ! तिचें ऐकून पापांत कसें पडावें ? तिचें ऐकलें तर पुढच्या जन्मीं नरकांत पडेन ! पण सुबुद्धीचें ऐकावें, तर या जन्मींच नरकयातना भोगाव्या लागतील ! कारण त्या बौद्धाचें घर ह्मणजे मूर्तिमंत रौरव नरक आहे ! सुबुद्धीनें तेथेंच रहा असें सांगणें ह्मणजे शुद्ध निर्दयता आहे. कुबुद्धीचा उपदेश मित्रत्वाचा आहे. हे कुबुद्धिमाते, मीं तुझ्याच सांगण्याप्रमाणें चालणार ! या दुष्ट सुबुद्धीचें मी बिलकुल ऐकणार नाहीं. त्या थेरड्या शक्तिनाथाची चाकरी सोडून मीं जाणार.

[मंगलकाचा ह्मातारा बाप पिंगलक हातांत लहानशी फळांची टोपली घेऊन येतो.]

पिंगलक–कोण आहे हो तेथें ? दादा, शक्तिनाथ सावकाराच्या घराला जावयाचा रस्ता कोणता हो ?

मंगलक–[स्वगत] अरे बापरे ! हे तर आमचे बाबा ! हे अगदीं पूर्ण अंध असल्यामुळें यांनीं मला ओळखलें नाहीं. बरें, आतां आपण यांची खूब मजा करूं.

पिंगलक–दादा, शक्तिनाथ सावकाराच्या घराकडे जावयाचा रस्ता कोणता हो ?

मंगलक–कांहीं वेळ सरळ चालून पुढें उजवीकडे वळा, नंतर पुनः उजवीकडे वळा, पुढें सरळ जाऊन डावीकडे उजवीकडे दोहींकडे वळा आणि मग सरळ जा. मग पुनः एकदां उजवीकडे डावीकडे वळलेत कीं गेलेतच त्या सावकाराच्या वाड्यांत.

पिंगलक–अरे देवा ! देवा ! हा कठिण रस्ता मला आंधळ्याला हो कसा निभावणार ? दादा त्या सावकाराकडे मंगळ्या ह्मणून

एक नोकर होता, तो हल्लीं त्याच्याकडेच आहे का? तुह्माला ठाऊक आहे का?

मंगलक-ते मंगलकराज होय? (एकीकडे) आतां डोळ्यांतून टिपें येत पर्यंत ह्मातान्याला चांगला घुमवतों. (उघड) ते मंगलक. राज ह्मणतात तेच कीं नाहीं?

पिंगलक-गरीब बिचाऱ्याला मंगलकराज कोण ह्मणतो आहे? तो आपला एका गरीब पण भल्या बापाचा गरीब मुलगा आहे. त्याला मंगळ्या ह्मणतात. फार तर मंगलक ह्मणत असतील.

मंगलक-त्याच्या बापाशीं आह्माला काय करावयाचें आहे? आह्मी त्याला मंगलकराजच ह्मणणार बस्स.

पिंगलक-दादा, तो मंगळ्या तुमचा मित्र आहे होय?

मंगलक-तुह्मी त्या मंगलकराजाविषयींच विचारीत आहांना?

पिंगलक-होय, त्या मंगळ्याविषयींच.

मंगलक-त्याला मंगलकराज असें आह्मी ह्मणणार. पण त्या मंगलकराजाचें आतां फक्त नांवच उरलें आहे. ईश्वराच्या ह्मणा, यमाच्या ह्मणा किंवा दैवाच्या ह्मणा, कोणाच्या तरी इच्छेनें तो मंगलकराज खरोखरचा स्वर्गस्थ झाला हो. अगदीं उघड उघड बोलावयाचें ह्मणजे तो मेला-मेला-मेला!

पिंगलक-[खालीं बसून] देवा! देवा! काय मी करूं आतां? तो मंगळ्या माझी ह्मातारपणची काठी होती-

मंगलक-ह्मणजे मी काठीसारखा बारीक दिसतों कीं काय? असेल बुवा! आपण गेल्या चार पांच महिन्यांत आरशांत ह्मणून कसें तें पाहिलें नाहीं! आणि त्यामुळेंच हें असें झालें-बाबा! तुह्मी मला ओळखतां काय?

पिंगलक–दादा, तुह्माला मी आंधळा कसा ओळखणार ? पण दादा, खरेंच सांगा हो. तो माझा मंगळ्या जीवंत आहेना ?

मंगलक–बाबा, तुह्मी मला ओळखीत नाहीं ?

पिंगलक–नाहीं ओळखीत. दादा, मी अगदीं आंधळा आहें. मला कांहीं दिसत नाहीं हो, मग मी तुह्माला कसा ओळखणार ?

मंगलक–खरोखर नाहीं ओळखीत ? जरी तुमचे डोळे शाबूत असते तरी तुह्मी मला ओळखिलें असतें कीं नाहीं कोण जाणे ? पोटच्या पोराला बाप ओळखीत नाहीं हें कसें बोवा ? बरें बाबा, तुमच्या मुलाची खरी बातमी मी तुह्माला सांगतों. [पायां पडून] बाबा, या पोराला आशीर्वाद द्या. सत्य कधीं तरी उघडकीस येणारच. ज्याप्रमाणें खून कधीं लपावयाचा नाहीं, त्याप्रमाणेंच सत्य कधींही लपत नाहीं.

पिंगलक–दादा, ऊठ तूं. तूं माझा मंगळ्या नव्हेस. तो मेला. [रडतो.]

मंगलक–बाबा, असें काय करतां हो ? मी आतां थट्टेनें बोलत नाहीं. मीच तुमचा मुलगा, पोरगा, पुत्र, लेंकरूं मंगलक. द्या मला आशीर्वाद–

पिंगलक–छेः, तूं माझा मुलगा आहेस असें मला वाटत नाहीं.

मंगलक–आतां काय करावें ? मीच तुमचा मुलगा. त्या शक्तिनाथाकडे नोकरीस आहें. आणि माझ्या आईचें नांव मदिरा.

पिंगलक–तिचें नांव मदिरा खरेंच. तर मग तूंच माझा मंगळ्या. [मंगलकाचे डोकीवरून हात फिरवून] मंगळ्या, तुला दाढी मिशी केवढीरे आली ही ! अरे, आमच्या चंपक घोड्याच्या शेंपटीच्या झुबक्यापेक्षांही तुझ्या दाढीचा झुबका मोठा आहे !

मंगलक–तर मग आमच्या चंपकाची शेंपटी आखूड आखूड होत चालली आहे ह्मणावयाची! मीं मागें त्याला पाहिलें होतें तेव्हां त्याची शेंपटी माझ्या दाढीमिशीपेक्षां खूब लांब होती. बाबा, तुह्मीं हातानें चांचपून पाहिलीत ती माझी शेंडी, दाढी नव्हे.

पिंगलक–मंगळ्या, तुझ्यांत हल्लीं बराच फेरबदल दिसतो आहे. तुझ्या धन्याचें आणि तुझें कसें काय पटतें? ही फळांची टोपली मी तुझ्या धन्याला नजर करावयाला आणली आहे.

मंगलक–बाबा, त्याचें माझें जुळत नाहीं. शक्तिनाथ सावकार निवळ मांग आहे. मी त्याची चाकरी सोडावयाचा निश्चय केला आहे. त्या मांगाला हा नजराणा द्यावयाचा! त्यापेक्षां त्याला फांसावर द्याना! बाबा, त्याची चाकरी करून ही माझी दशा कशी झाली आहे पहा. बाबा, तुह्मीं हाडांनीं चांचपून पहा ह्मणजे माझीं बोटें बोटें लागतील. पाहिलीत का माझी कशी दशा झाली आहे ती? बाबा, तुह्मी यावेळीं आलांत हें फार चांगलें झालें. येथें वसंतराज ह्मणून एक गृहस्थ आहेत, त्यांच्या नोकरीस रहावयाचा मी निश्चय केला आहे. ते आपल्या नोकरांना फार ममतेनें वागवितात. त्यांना सणावारीं चांगले चांगले पोषाक देतात. त्यांना ही टोपली नजर करा. [पाहून] वहावा! काय माझें सुदैव तरी! बाबा, ते पहा वसंतराजच हिकडे आले. त्यांना ही टोपली नजर करा. यापुढें जर त्या बौद्ध थेरड्याची नोकरी केली तर मी नरकांत जाईन.

(**वसंत, सारंग** व इतर सेवक येतात.)

वसंत–सारंगा, याप्रमाणेंच करावयाचें समजलास? भोजनाची तयारी लवकर करावयाला सांग. अरे, तुमच्यांपैकीं कोणी तरी

हीं पत्रें पोंचतीं करा. सर्वांनीं आपापले चांगले पोषाक घाला. (एका नोकरास) आणि तरंगाला मीं लौकर बिऱ्हाडीं बोलावलें आहे असें सांग जा. (सेवक जातो.)

मंगलक–यांना ही नजर करावयाची बाबा—

पिंगलक–सरकार, दंडवत करतों.

वसंत–मजपाशीं तुमचें काय काम आहे बाबा? माझ्याकडून होण्यासारखें असेल तर मी तें करीन.

पिंगलक–हा माझा गरीब पोरगा–

मंगलक–[मध्येंच] वः गरीब पोरगा कसला ! मी त्या श्रीमंत बौद्ध सावकाराचा नोकर आहें सरकार. बाबा काय तें सांगतीलच–

पिंगलक–याला त्या सावकाराची नोकरी सोडून–

मंगलक–खरोखरच, बाबांच्या बोलण्याचा भावार्थ इतकाच कीं, मी हल्लीं त्या बौद्ध सावकाराची नोकरी करतों, ती सोडून बाबा सांगतात त्याप्रमाणें–

पिंगलक–हा आणि याचा धनी यांचें पटत नसल्यामुळें–

मंगलक–थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे इतकेंच कीं, माझा धनी मला नीट रीतीनें वागवीत नाहीं आणि बाबा आपल्याला कथन करतात–

पिंगलक–सरकार, ही लहानशी फळांची टोपली आपल्याला नजर करावयाला आणली आहे, हिचा स्वीकार करावा आणि ही माझी विनंति–

मंगलक–थोडक्यांत सांगतों सरकार, ती विनंति मजविषयींच आहे असें तुह्माला माझ्या बाबांकडून कळेल–आमचे बाबा–

बसंत–अरे असें काय करतां? एकजण कोणी तरी स्पष्ट बोला. बोल, तुला काय पाहिजे ?

मंगलक–माझ्या मनांत आपल्या नोकरीवर रहावयाचें आहे.

पिंगलक–माझ्या सर्व बोलण्याचा भावार्थ हाच.

बसंत–इतकेंचना ? तुमची बिनंति मीं मान्य केली. शक्तिनाथ तुजबद्दल मजजवळ आजच बोलला होता. त्यानें तुला माझ्या हवालीं केलें आहे. पण श्रीमान् सावकाराची नोकरी सोडून माझ्यासारख्या गरीबाची नोकरी करणें तुला बरें वाटेल काय कोण जाणे ?

मंगलक–ब: असें कसें ह्मणतां सरकार ? तो ह्मातारडा मोठा खाष्ट आहे बघा. त्याची नोकरी सोडण्यानें मला मुलगा झाल्या-प्रमाणें आनंद होतो आहे पहा. [एकीकडे] पण शिंच्या बायको-चाच नाहीं ठिकाणा आणि मुलगा कोठला ?

बसंत-ह्मातारेबाबा, आपल्या मुलाला घेऊन जा. आणि तूं आपल्या पूर्वीच्या धन्याचा निरोप घेऊन ये. सारंगा, याला पोषाक फक्कड दे बरें का ?

मंगलक–बाबा, चला. मीं आपला दगड, ठोंब्या; मला कोठली नोकरी मिळणार? बाबा, कशी पटकावली नोकरी? (आपला हात पाहून) माझें नशिब सवाईशिकंदर दिसतें आहे. ही पाहि-लीत का बाबा आयुष्याची केवढी लट्ठ लांबलचक रेषा आहे ती? (एकीकडे) पण ब्राबांना दिसणार कोठून ? [उघड] बाबा, किती तरी बायका आहेत हो माझ्या नशिबीं ! अबब ! पंधरा तर नुसत्या लग्नाच्या आहेत-आणि मीं तीनदां मरणार आहें बाबा-अंहं बुडणार आहें-पण त्यांतून वांचणारही आहें! पण पराच्या

गादीतील एक पर खुपून माझा जीव जाण्याचा संभव आहे. एकंदरींत माझें नशीब उत्तम दिसतें आहे. बाबा, चला. त्या थेरड्या बौद्धाचा एका क्षणांत निरोप घेऊन येतों.

[पिंगलक व मंगलक जातात.]

वसंत–सारंगा, याची नीट काळजी घे. कोणाचें सामानसुमान आणशील तें नीट सुरक्षितपणें पोंचतें कर बरें. आज रात्रीं गाण्याचा बेत केला आहे. व्यवस्था नीट असूं दे. बरें, जा तर आतां.

सारंग–त्याबद्दल आपणाला तिळमात्र काळजी नको, सरकार.

[तरंग येतो.]

तरंग–अरे तुझा धनी कोठें आहे ?

सारंग–ते पहा तिकडे फेऱ्या घालीत आहेत. [जातो.]

तरंग–वसंता, कसें काय बोवा ?

वसंत–वः कोण ? तरंगा, आलास ? ठीक झालें !

तरंग–पण माझी तुला एक विनंति आहे.

वसंत–तुझी विनंति मीं मान्य केली—

तरंग-तूं मला नाहीं ह्मणूं नको. मी तुजबरोबर रत्नपुरास येणार.

वसंत–ये. नको कोणीं ह्मटलें? पण तरंगा, तुझ्या जिभेला लगाम ह्मणून कशी ती नाहींच ! बोलण्यांत आणि विनोदांत तूं नेहमीं फार बहकतोस आणि तुझें भाषणही आडदांडपणाचें असतें. आमच्या नेहमींच्या मित्रमंडळींत तुझें हें वर्तन सहज खपून जातें; पण जेथें आपली ओळखदेख नाहीं अशा ठिकाणीं हें असलें वर्तन लोकांना फाजीलपणाचें वाटतें. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक फार वाईट–

[रामारे मैतो पानियाको गई०]

रुचिर बहु परिमितता जनिं या ॥ धृ० ॥ सुखनिधि–

लाभसुसाधन होई यशहि तसें मिळवाया ॥१॥अति-
रेक परी लावितसे बहु दुःख नरा भोगाया ॥ २ ॥

ह्मणून सांगतों कीं, तेथें गेल्यावर अशा तऱ्हेनें न वागतां नीट सभ्यतेनें वाग. उच्छृंखळपणा सोड. नाहीं तर तुझ्या वर्तनामुळें माझ्याबद्दल लोकांचा वाईट ग्रह होईल आणि तेथें जाण्याचा माझा हेतु सफल होणार नाहीं.

तरंग-त्याबद्दल तुला बिलकूल काळजी नको. तेथें गेल्यावर मी असा कांहीं गंभीरपणाचा आव आणतों कीं, हा तरंग आहे कीं कोणी पोक्त, वयोवृद्ध असा दुसरा गृहस्थ आहे याचा तुला स्वतः-लाच संशय पडेल. विशेष कोणाशीं न बोलणें, मानेच्या खुणांनीं उत्तरें देणें, तोंडांतल्या तोंडांत पुटपुटत रहाणें वगैरे गंभीर-तेचीं लक्षणें मी तेथें अमलांत आणीन. असें वर्तन माझ्या हातून झालें नाहीं तर तूं पुनः माझ्यावर कधींही विश्वास ठेवूं नको.

वसंत-बरें, पाहूं आतां कसा काय वागतोस तो.

तरंग-पण आज रात्रीं नाहीं हो मी तसा वागणार. आज रात्रीच्या वर्तनावरून मी रत्नपुरासही तसाच वागेन असें मात्र समजूं नको.

वसंत-छे छे, आज तूं नेहमींप्रमाणेंच मौजेनें वाग. आज आपली सर्व मित्रमंडळी जमावयाची आहे, तेव्हां मी ह्मणतों कीं, तुझा हास्यविनोदाचा सांठा काय असेल तो आज रात्रीं सर्व बाहेर पडूं दे. बरें पण मला काम आहे, मी जातों आतां.

तरंग-मलाही कलहंसाला भेटावयाचें आहे. जेवणाच्या वेळीं तुला मी भेटेन. [जातो.]

वसंत-हें आजचें गाणें मंडळींचा आग्रहच पडला ह्मणून करावें

लागलें; नाहीं तर मला इतकी कोठली फुरसत? हें गाणें आटोपलें कीं तावडतोब कूच. पण इतकें करून ती सुंदरी मला प्राप्त होईल का? मला नेहमीं असें भासत असतें—

[आजवरी जनक देइ०]

राहि उभी मजसमीप लोकसुंदरी । नयनचापमुक्त-शरीं विद्ध मज करी ॥ धृ० ॥ स्वकरांबुज रमणीनें मम करीं दिलें । स्मित मनोज्ञ सखिमुखिं तैं मधुर शोभलें । स्वर्गसुखहि मजसि तदा तुच्छ जाहलें । सौख्यचित्र अनुभवीन हें कधीं तरी ॥ १ ॥

[जातो.]

प्रवेश तिसरा.

(मणिपुर—शक्तिनाथाच्या वाड्यांतील एक खोली.)

[सारिका प्रवेश करिते.]

सारिका—

[खमाज–गजल.]

मानसीं मम खेळते तन्मूर्ति ती सुमनोहरा । होइ दूर न ती कदा हृदयांतुनी पळही जरा ॥ धृ० ॥ सौख्यदा मज हो जशी । संतापदाहि पहा तशी । परिणाम हे सुविरुद्धसे मनिं काम तो सृजितो खरा ॥ १ ॥ दिन एक तो न दिसे जरी । तरि

होइं मी बहु बावरी । पळ वाटतें युग तें तदा अति
दीर्घसें मम अंतरा ॥ २ ॥

कलहंसजीच्या मैत्रीचा योग, त्यांची बहीण व माझी मैत्रीण चंद्रिका हिचे योगानें आला; आणि आजचा घाट तिच्याच युक्तीचें फळ आहे. आज रात्रीं वैदिक लोकांचा महोत्सव आहे. रात्रीं त्यांच्या देवाच्या रथाची स्वारी निघावयाची आहे आणि त्याच वेळीं आमचीही स्वारी निघणार आहे! भगवति प्रीतिदेवते, तुझ्याच बळावर बाबांच्या घरांतून पळून जाऊन कलहंसजीबरोबर गुप्तरीतीनें विवाह करण्याचा घाट घातला आहे. तो सिद्धीस जाऊं दे. पण यांत मी बाबांना फसवीत नाहीं का?

[हें काय बरें त्वां केलें०]

मी वंचितसें जनकातें ॥ धृ० ॥ जगतिं जयें मज
जन्मा दिधलें । रक्षुनि आजवरी बाढविलें । त्यातें
त्यागाया मी सजलें । विस्मरलें उपकारातें ॥ १ ॥

पण प्रेमाच्या साम्राज्यांत असें व्हावयाचेंच. (मंगलक येतो.) मंगलका, बाबांची नोकरी तूं सोडलीस असें मी नुकतेंच ऐकिलें. तूं ह्मणतोस त्याप्रमाणें खरोखरच आमचें घर ह्मणजे नरकलोक आहे. आणि तूं या नरकांतील एक विनोदी व गमती असें पिशाच होतास! तुझ्या करमणुकीमुळें येथें होणारा त्रास कांहीं कमी वाटत असे. असो; मंगलका, आजपर्यंत तूं माझी कामगिरी उत्कृष्ट रीतीनें आणि गौप्य न फोडतां बजाविलीस, याबद्दल हें घे तुला बक्षीस-[बोटांतील अंगठी देते.] हें पत्र घेऊन कलहंसजीकडे जा. ते तुला तुझ्या नव्या धन्याकडे भेटतील. कोणालाही न कळवितां हें पत्र त्यांना दे. जा जा लवकर, नाहीं तर बाबा येतील आणि कांहीं तरी संशय घेतील.

मंगलक–ताईसाहेब, माझ्यानें बोलवत नाहीं. या जिभेमुळें अश्रु चालत नाहींत. या गरीबाची आठवण असूं द्या. जातों तर आतां, नाहीं तर या अश्रूंमुळें माझें शौर्य मरून जाऊन थंडगार पडेल. [जातो.]

सारिका–हाय हाय ! ज्यांनीं लहानपणापासून माझें पालन-पोषण केलें त्या बाबांची मी मुलगी आहें, याबद्दल मला लाज वाटावी अं ! खरोखर मी हतभागी आहें. या प्रसंगीं माझी स्थिति फार चमत्कारिक झाली आहे. माझ्या मनांत परस्परविरोधी विचारांचें द्वंद्व माजून राहिलें आहे. काय करूं ?–

[तुजे मेरी कसम०]

मन्मना ओढिती तातदयित दोघेही ॥ ध्रु० ॥
सुचतें न अंतरीं कांहीं । सोडुनी शांति मज जाई ।
चिंताग्निमग्ना पडें मी विमोहीं ॥ १ ॥

कलहंस महाराज, घाट घातल्याप्रमाणें आपणाकडून व्यवस्था झाली म्हणजे मी या विचारकलहांतून सुटेन.

[जाते.]

प्रवेश चौथा.

(मणिपुर–एक रस्ता)

[तरंग, कलहंस, मेघकांत व मेघनाद येतात.]

कलहंस–आजचा बेत तुह्मांला माहीत आहेच. आज रात्रीं वसंताकडे गाणें आहे. आपला सावकार ह्मणून तो त्या थेरड्या बोंद्धाला बोलावणार आहे आणि तो थेरडा फुकटच्या गाण्याला

आल्याशिवाय रहावयाचा नाहीं ! शिवाय त्याच वेळेला लक्ष्मी-नारायणाच्या रथाची गांवांत धामधूम आहे ह्मणून सारिकेला पळ-वावयाचा बेत आजच अमलांत आणला पाहिजे. अशी संधि पुनः मिळणार नाहीं.

तरंग-पण सारिकेनें कसें काय ठरविलें आहे ? नाहीं तर आह्मी बेत करून काय उपयोग ?

कलहंस–आमच्या चंद्रिकेच्या मार्फत सर्व बेत अगदीं बरोबर झाला आहे. सारिका आजच यावयाला तयार आहे.

मेघकांत–पण वसंताकडे गाण्याचे वेळीं आह्मी नसलों ह्मणजे तें ठीक दिसणार नाहीं.

कलहंस–मी वसंताला पूर्वींच सांगून ठेविलें आहे. आमच्या या घाटाला त्याची अनुकूलता आहेच.

[मंगलक पत्र घेऊन येतो.]

मंगलका, काय खबर आहे ?

मंगलक–आपण हें पत्र उघडण्याची मेहरबानी कराल, तर तें आपणाला सर्व हकीगत सांगण्याची मेहरबानी करील.

मेघनाद–कोठचें बोवा हें पत्र ? कलहंसा, तूं तरी घाट बराच जमवून आणला आहेस. तुला पूर्णपणें यश मिळावें अशी माझी मनापासून इच्छा आहे.

कलहंस–कोठलें पत्र हें सांगावयाला का पाहिजे? त्याच सुंदरीचें पत्र हें ! अहाहा !

[पौष्टिक बलवीर्य०]

सुखकर बहुविध असती वस्तुभाव या जनीं । त्यांत

असे प्रियतम मज हीच योषितामणी ॥ धृ० ॥
भ्रमरीसम चित्तकमलिं मम रमणी ती रमे। दारुण-
संसृतिजनितहि ताप सर्व तैं शमे। व्याधि सकल
जाति लया प्रियनिजजनचिंतनीं ॥ १ ॥

तरंग-कलहंसा, एखादा महाकवि जसा आपल्या प्रतिभारूप पंखांनीं उंच भराऱ्या मारीत असतो, तसा तूंही कल्पनाकाशांत उडत असतोस!

मंगलक-सरकार, मी रजा घेतों आतां.

कलहंस-तूं कोठें जातो आहेस?

मंगलक-माझ्या नव्या धन्याकडे गाणें आहे, त्याला माझ्या जुन्या धन्याला बोलवावयाला जातों आहें.

कलहंस-बरें हें घे तुला बक्षीस. [कांहीं नाणें देतो.] सारिकेला हळूच सांग, कीं ठरल्याप्रमाणें सर्व व्यवस्था करावयाची. तूं तयार रहा ह्मणावें. पण हें कोणाला कळवावयाचें नाहीं, समजलास ना? जा. [मंगलक जातो]

मेघकान्त-बरें आह्मीही जातों.

कलहंस-कांहीं वेळानें तरंगाच्या येथें मला भेटा.

मेघनाद-ठीक आहे. [मेघकान्त व मेघनाद जातात.]

तरंग-कलहंसा, तुझी प्रिया पत्रांत काय ह्मणते?

कलहंस-विशेष कांहीं नाहीं. अमुक वेळीं यावें; मी तयार आहें; अमुक जवाहीर, अमुक रोख रकम मी बरोबर घेत आहें; हेंच या पत्रांत आहे. मित्रा, तिच्या त्या लोभी दुष्ट बापाला जर कदाचित् स्वर्गप्राप्ति होणार असेल तर ती याच सबबीवर कीं, ती सुंदरी त्याची मुलगी आहे. चल जाऊं. जातां जातां हें पत्र वाच.

[जातात.]

प्रवेश पांचवा.

(मणिपुर–शक्तिनाथाच्या वाड्यांतील एक खोली.)

[शक्तिनाथ व मंगलक येतात.]

शक्तिनाथ–मंगलका, तुला आतां अनुभव येईल. हा शक्तिनाथ व तो तुझा धनी वसंत यांच्यांत काय फरक आहे, हें लवकरच तुझ्या दृष्टीस पडेल. सारिके, अग सारिके–माझ्या घरीं असतांना जसा तूं खा खा खात होतास तसें तेथें तुला करावयाला मिळणार नाहीं, समजलास ?–ए सारिके, अग सारिके,–येथें कांहीं काम न करतां खुशाल घोरत पडत असस आणि चिरगूटपांघरुणें हवीं तशीं वापरून फाडीत असस–सारिके, अग सारिके–ही गेली तरी कोठें बोवा ?

मंगलक–अहो सारिका ताईसाहेब, अहो सारिकाबाई–

शक्तिनाथ–मूर्खा, तुला कोणीं हांका मारावयाला सांगितलें ?

मंगलक–आपण नेहमीं ह्मणत असां धनीसाहेब कीं, हा मंगलक सांगितल्या कामाचा, ठोंब्या आहे. याला स्वतःची अक्कल कशी ती नाहींच; ह्मणून आतां आपण सांगितल्याशिवाय ताईसाहेबांना हांका मारिल्या !

[सारिका येते.]

सारिका–बाबा, मला हांक मारली तुह्मीं ? काय काम आहे ?

शक्तिनाथ–त्या वसंताकडून मला गाण्याचें आमंत्रण आलें आहे. ह्या घे माझ्या किल्ल्या. नीट जपून ठेव. [स्वगत] पण मी गाण्याला काय ह्मणून जावें ? त्यांनीं मला कांहीं प्रेमानें बोलाविलें नाहीं; उलटा ते आह्मां बौद्धांचा द्वेष करतात. माझ्या

कडून कर्ज मिळालें आहे, ह्मणून या वसंतानें मला आमंत्रण केलें आहे. पण जावें हेंच बरें. कारण मीं दिलेला पैसा असा ख्यालीखुशालींत उधळला जात आहे, हें प्रत्यक्ष पाहून मला आनंदच होईल. तो मूर्ख धनदत्त माझ्या तावडींत आतां चांगला सांपडतो आहे. [उघड] बाळे सारिके, घराची नीट काळजी घे बरें. नीट जपून रहा. पण मला जाऊं नये असें वाटतें. माझें मन मला जा असें कांहीं सांगत नाहीं आणि काल रात्रीं स्वप्नांत मीं मोहरांच्या पिशव्या पाहिल्या !

मंगलक–धनीसाहेब, आपण गाण्याला आलेंच पाहिजे. आमचे धनीसाहेब आपल्या गमनाची वाट पहात बसले आहेत.

शक्तिनाथ–माझ्या गमनाची वाट पहात असेल खराच तो. मी मेलों म्हणजे त्यांना आनंदच आहे. पण आज कशाबद्दल गाणें आहे रे ?

मंगलक–आज आमच्या लक्ष्मीनारायणाच्या रथाचा दिवस नव्हे का ? त्या उत्सवासाठीं आजचें गाणें आहे. गेल्यावर्षी जेव्हां श्रावणी सोमवार मार्गशीर्षांतील बुधवारीं बरोबर बारा वाजतां पडला होता त्याच दिवशीं हा रथोत्सव झाला होता! आणि माझें नाक त्या रात्रीं गर्दीत कोठें गेलें तें अजून सांपडलें नाहीं! तुम्हाला सांपडलें तर आमच्या धनीसाहेबांकडे पाठवून द्या बरें का ? त्याबद्दल मी आपणाला गाढवाचे एक सोडून दोन लांब कान बक्षीस देईन !

शक्तिनाथ–चूप ! फाजील कोठचा ! एकूण आज रात्रीं रथोत्सव आहे. सारिके, नीट ऐकून घे. रथाची स्वारी निघेल तेव्हां आपल्या वाड्याचीं सर्व दारें, खिडक्या नीट लावून घे. नाहीं तर माडीवर जाऊन खिडकींतून तोंड बाहेर काढून मौज बघत बस-

शील. त्यांचीं वाद्यें वाजावयास लागलीं कीं, दारें, खिडक्या बंदोबस्तानें लावून घे. माझ्या पवित्र घरांत त्या अपवित्र वैदिक लोकांच्या वाद्यांचा ध्वनीसुद्धां येतां कामा नये. आणि त्या मूर्ख विधर्मी लोकांच्या रथाची स्वारीही तूं बघूं नकोस. बुद्धाशपथ, आज वसंताकडे गाण्याला जावेंच असें कांहीं मला वाटत नाहीं. पण फुकटचें गाणें तरी कां सोडा? मंगलका, तूं जा आतां. मी येईन असें आपल्या धन्याला सांग.

मंगलक–बरें जातों मी. ताईसाहेब, आमच्या रथाची स्वारी तुह्मी पहाच हो–[जातां जातां सारिकेला एकीकडे]–

सारिकेस कलहंस सांगतो ।
'पंजरस्थ तुज मुक्त सोडितों' ॥

आज दीडप्रहर रात्रीं– [जातो.]

शक्तिनाथ–काय पुटपुटत होता तो?

सारिका–कांहीं नाहीं बाबा; " जातों ताईसाहेब " एवढेंच तो ह्मणाला आणि कांहीं नाहीं.

शक्तिनाथ–हा मंगलक एकंदरींत बरा होता. पण शिंचा खादाड फार! सांपडेल तें खात सुटावयाचा आणि दिवसा झोंपावयाचा. रानमांजरें सुद्धां याच्या इतकीं झोंपाळू नसतील. फायद्याच्या कामांत याचा मागें पाय; आणि माझें नुकसान करण्यांत मात्र पाय पुढें. अशा आळशी आणि चैनी चाकराचा मला काय उपयोग? ह्मणून मी त्याला रजा दिली आणि माझ्याकडून कर्ज घेतलेलें द्रव्य लवकर संपावें ह्मणून याला त्या वसंताकडे लावला. बरें, सारिके तूं जा आतां. कदाचित् मी लवकर येईन. मी सांगितल्याप्रमाणें नीट व्यवस्था ठेव. दारें, खिडक्या नीट बंद

कर. हो, व्यवस्थित रीतीनें वस्तु ठेविली ह्मणजे ती सुरक्षित सांपडते, हें तत्त्व उत्कर्षेच्छु मनुष्यानें कधीं विसरतां कामा नये. [जातो.]

सारिका–खुशाल चला बाबा—आजच्या बेतांत जर कांहीं दुर्दैवानें घोंटाळा झाला नाहीं तर तुह्मी मला आणि मी तुह्माला मुकलें ! [जाते.]

प्रवेश सहावा.

(**मणिपुर**–शक्तिनाथाच्या वाड्याजवळील एक रस्ता.)

[**तरंग व मेघनाद येतात.**]

तरंग–याच घराजवळ उभें रहाण्यास कलहंसानें आपणांस सांगितलें आहे.

मेघनाद–पण त्याची ठरलेली वेळा तर टळून गेली.

तरंग–आणि त्याची वेळा टळून जाणें ह्मणजे आश्चर्य ह्मणावयाचें ? कारण, या प्रणयी लोकांची धांव सूर्यापुढें असते !

मेघनाद–खरेंच बोवा. प्रणयिजनांचे घडलेले संबंध योग्य रीतीनें पाळण्यांत मदत करण्यापेक्षां नवीन नवीन संबंध जुळवून आणण्यांत प्रीतिदेवता अधिक साहाय्य करते. तिची सर्व त्वरा काय दाखवावयाची ती येथें !

तरंग–हा नियम सर्वत्र दिसतो. मनुष्य भोजनाला बसतेवेळीं त्याची क्षुधा जितकी तीव्र असते तितकी जेवून उठतांना नसते. घोड्याला मंडळांत फिरण्यास शिकवीत असतां पहिल्यानें जी उत्कट उत्सुकता तो दाखवितो ती सर्व उत्सुकता नंतर मंद होते.

कोणत्याही वस्तूची प्राप्ति करून घेण्यांत लोक फार उत्कंठा दाखवितात आणि ती मिळाली ह्मणजे तिची किंमत त्यांना विशेष वाटत नाहींशी होते. बंदरांतून गलबत निघतेवेळीं वारा वगैरे अनुकूल असल्यामुळें तें किती डौलानें, भपक्यानें आणि त्वरेनें चालूं लागतें; परंतु परत येतानां वाऱ्यानें दुर्दशा उडविल्यामुळें, शिडें फाटलीं आहेत, दोरखंडें वगैरे तुटलीं आहेत, फळ्या फुटल्या आहेत अशा शोचनीय अवस्थेंत तें हळूहळू परत येतें !

मेघनाद–यासंबंधानें आपण मागाहून बोलूं. हा पहा कलहंस आला. (**कलहंस** येतो.)

कलहंस–मित्रांनो, मला विलंब लागला याबद्दल क्षमा करा. दुसऱ्या एका कामांत मी गुंतल्यामुळें मला थोडा वेळ लागला. (हंसून) याप्रमाणेंच तुमचीं प्रियपात्रें तुह्मांला पळवून आणावयाचीं असतील त्यावेळीं मी तुमच्याकरितां हवा तेवढा वेळ थांबेन. चला तर मग. या वाड्यांत आमचे भावी श्वशुर रहातात. [दार हळूच ठोठावून] आंत कोण आहे ?

(**सारिका** पुरुषाच्या वेषानें वर खिडकींत येते.)

सारिका–कोण आहे ? आवाजावरून बहुतेक समजलेंच आहे, तरी पण सांगा. कोण आहे तें ?

कलहंस–तुझा प्रियकर, कलहंस.

सारिका–(स्वगत) खरोखरच माझे प्रियकर, अहाहा !–

[प्रिया मुज प्राण छे०]

दयित मम हा मना शांति देई ।
रुचिर मुख पाहुनी भ्रांति जाई ॥ धृ० ॥
चंद्रदर्शनें तो सरितापति ।

उचंबळे जैसा मोदें अति ।
प्रियमुखविधु निरखुनि तैशी स्थिति ।
अनुभवा खास या स्वांतिं येई ॥ १ ॥

(उघड) खरोखरीच आपण माझे प्रियकर; पण मी आपली प्रिया आहें कीं नाहीं कोणाला ठाऊक ?

कलहंस–तुझ्यावर माझें प्रेम किती आहे हें त्या एका सर्वसाक्षी परमेश्वराला किंवा तुझ्या अंत:करणाला माहीत.

सारिका-बरें. हा करंडा घ्या, यांत बऱ्याच किंमतीचा माल आहे. पण मला बाई या पोषाखाची भारी लाज वाटते. रात्र काळोखी असती तर फार बरें झालें असतें; ह्मणजे माझा बदललेला वेष आपणाला दिसला नसता आणि माझी फजीतीही झाली नसती. पण त्यांत काय आहे !

[नंदगृहाच्या जवळि०]

प्रेम असे बहु अंध असें ते विबुध कथिति लोकीं ॥
सकलही ॥ धृ० ॥ प्रणयिजनांच्या करिं जे घडती ।
दोष तयांप्रति नच ते दिसती । रोष न ते परि
तोषचि देती । अनुभव हा जगतीं । येतसे ॥ १ ॥

कलहंस–सारिके, लवकर खालीं ये. उगीच वेळ लावूं नकोस.

सारिका–बरें ही पहा येतें झटकन. पण हा पोषाक काढला तर नाहीं का चालणार ?

कलहंस–छे छे, भलतेंच ! सगळा घाट फसवावयाचा आहे वाटतें तुझ्या मनांतून ? ही चांदणी रात्र, नेहमींच्या वेषानें आलीस तर तुला कोणीही सहज ओळखील. पण लवकर ये. रात्र भरभर निघून जात आहे आणि तुझा बाप लवकरच येईल.

सारिका–बरें, दारें–खिडक्या बंद करून बरोबर रोख रक्कम घेऊन येतें. [खिडकींतून जाते.]

तरंग–कलहंसा तुझी चैन आहे बुवा !

कलहंस–तरंगा, मी सांगितल्याप्रमाणें माझी प्रिया खरोखर शहाणी, धोरणी, सत्यवचनी आणि रूपवती आहे कीं नाहीं तूंच पहा. भगवंताच्या कृपेनें तिचा आणि माझा वियोग कधींही न होवो. [सारिका येते.]

सारिका–पण बाई या पुरुषाच्या वेषाची मला फार लाज वाटते. मी अगदीं वाईट दिसत असेन नाहीं ?

कलहंस–छे, बिलकूल नाहीं. सुंदर मनुष्य कोणत्याही वेषांत असलें तरी त्याचें सौंदर्य कधींही लपत नाहीं. तरंगा, मेघनादा, चला लवकर–(मेघनाद, सारिका व कलहंस जातात.)

[धनदत्त येतो.]

धनदत्त–कोण तो ?

तरंग–कोण, धनदत्त महाराज ?

धनदत्त–वहावा ! तरंगा बाकीचे दुसरे कोठें आहेत ? तुह्मांला शोधावयाला मी वीस पंचवीसजण पाठविले आहेत. तुझी तिकडे वाट पहात आहेत. आज गाणें झालें नाहीं. गवईबुवा आजारी आहेत. वसंत आतां दोन घटकांनीं रत्नपुराला जावयाला निघणार. चल चल लवकर.

तरंग–काय ह्मणतां ? वसंत आतांच निघणार ? आनंदाचीच बातमी ह्मणावयाची ! चला, हा मी तयार आहें.

[जातात]

प्रवेश सातवा.

(मणिपुर–एक रस्ता.)

[मेघनाद व मेघकान्त येतात.]

मेघनाद–होय, वसंत गेला तेव्हां मी तेथें होतों; तो व तरंग असे बरोबरच गेले. त्यांच्याबरोबर कलहंस नव्हता.

मेघकांत–तो थेरडा शक्तिनाथ ताबडतोब रात्रीचे रात्रीं महाराजांपाशीं फिर्याद घेऊन गेला आणि महाराजांनीं ताबडतोब चौकशी करावयाला फौजदाराला धनदत्ताकडे पाठविलें.

मेघनाद–फौजदार फार उशिरां आला. वसंत व तरंग अगोदरच निघून गेले होते. परंतु धनदत्त महाराजांना भेटला आणि वसंताबरोबर कलहंस गेला नाहीं, त्याच्या पूर्वींच कलहंस व सारिका अशीं दोघेंजणें दुसऱ्याच वाटेनें निघून गेलीं होतीं, अशी त्यानें महाराजांची खात्री करून दिली.

मेघकांत–पुढें काय मौज झाली ती विचारूं नको. तो थेरडा बौद्ध रस्त्यांतच बडबडावयाला लागला! मला वाटलें कीं त्याला भ्रम झाला असावा! कारण तो जें बोले तेंच मुळीं विचूक व गोंधळल्याप्रमाणें बोले! "माझी सारिका पळाली–माझे रुपये–माझी सारिका–एका विधर्म्याबरोबर गेली पळून!–सूड, रुपये, जवाहीर, मुलगी पळाली! मोहोरांची पिशवी आणि दोंन मोठ्या किंमतीचे हिरे गेले! काय करूं? पैसे गेले–मुलगी पळाली–या राज्यांत न्याय नाहीं. तिनेंच माझ्या मोहरा आणि रत्नें पळविलीं." असें सारखें तो बरळत सुटला होता!

मेघनाद–त्याच्यामागें येथील पोरांचा घोळका लागला आहे; तीं त्याचीच नकल करून त्याला वेडावीत आहेत.

मेघकांत–पण धनदत्तानें आपली मुदत मात्र आतां चुकवितां कामा नये. नाहीं तर त्याला फार जड जाईल.

मेघनाद–हो, बरी आठवण झाली. मला आतांच ते सिंहलद्वीपाहून आलेले नाखवे भेटले; त्यांनीं सांगितलें कीं, त्या रामेश्वराजवळ तुमच्या देशचें एक गलबत फुटलें. आंत फार किमतीचा माल होता. ही बातमी त्यांनीं सांगतांच धनदत्ताची मला आठवण झाली आणि मीं मनांत ह्मटलें कीं, तें गलबत धनदत्ताचें नसो ह्मणजे झालें.

मेघकांत–तूं काय ऐकलेंस तें धनदत्ताला कळीव ह्मणजे बरें. पण एकदम सांगूं नको हो; नाहीं तर त्याच्या मनाला एकदम धक्का बसेल !

मेघनाद–खरोखर धनदत्तासारखा अत्यंत दयाळु मनुष्य या जगांत कोणी नसेल. वसंतानें निघतेवेळीं ' मी लवकरच येईन, ' असें धनदत्ताला सांगितलें. पण धनदत्त त्यावर ह्मणाला 'वसंता, अशी उगीच घाई करूं नको; माझ्यासाठीं आपल्या कार्यांत व्यत्यय आणूं नको; तुझें काम चांगल्या रीतीनें होईपर्यंत इकडे येण्याचें करूं नकोस; त्या बौद्ध सावकाराच्या कर्जामुळें तुमच्या प्रेमांत मुळींच आडकाठी आणूं नका; त्या रोख्याबद्दल मनांत कांहींही काळजी करूं नको; आनंदानें रहा. तुझें सगळें लक्ष्य मृणालिनीच्या प्राप्तीकडे असूं दे' बोलतां बोलतां धनदत्ताचे डोळयांत अश्रुबिंदु चमकूं लागले; परंतु तोंड दुसरीकडे वळवून त्यानें ते हळूच पुसून काढले ! नंतर आलिंगन देऊन वसंतानें घोडा पिटाळला.

मेघकांत-त्या वसंताकरतांच तर या जगावर तो प्रेम करतो;

नाहीं तर त्याला काय करावयाचें आहे या जगाशीं ? चल, आपण जाऊन त्याचें दुःख थोडें हलकें करूं–

मेघनाद–चल तर.

[जातात.]

प्रवेश आठवा.

(**मणिपुर**–मृणालिनीच्या वाड्यांतील एक दिवाणखाना.)

[शिंगें वाजतात; **मृणालिनी, केरलराज** व त्यांच्या दासदासी येतात.]

मृणालिनी–तो पडदा एकीकडे सारा आणि महाराजांना त्या पेट्या दाखवा. महाराज, या पहा त्या पेट्या; यांपैकीं एक पेटी आपण निवडा.

केरलराज–ही सुवर्णमंजूषा हिजवर कांहीं लिहिलें आहे. [वाचतो.] " **इच्छिति जयास बहुजन तें तुजला मजमुळेंच लाभेल.** " ही दुसरी रौप्यमंजूषा–हिच्यावर लिहिलेलें आहे–"**जें तुज उचित असावें तें तुजला मजमुळेंच लाभेल.** " ही तिसरी घाणेरडी लोह-मंजूषा. ही दृष्टीला जशी घाणेरडी व दरिद्री दिसते, तसा तिच्या-वरचा लेखही पण घाणेरडा व दरिद्री आहे–" **तव विभव सकल दारुणसंशयगत मजमुळेंच होईल.** " पण मी पेटी निवडीन ती बरोबर आहे कीं नाहीं हें कशावरून समजेल ?

मृणालिनी–यांपैकीं एकींत माझें चित्र आहे, ती पेटी आपण ओळखून काढाल तर मी सर्वस्वी आपली आहें.

केरलराज–ईश्वर मला साह्य करो; या मंजूषांवरील लेख

आपण एकदां पुनः वाचूं. ही लोहमंजूषा काय ह्मणते ? " **तव विभव सकल दारुणसंशयगत मजमुळेंच होईल.** " आणि तें काय ह्मणून ? या भिकारड्या लोखंडाकारितां माझें सगळें वैभव मी संशयांत घालवून बसूं ? कांहीं तसाच फायदा असला तर मनुष्य आपल्या सर्व वैभवावर पाणी सोडण्यास तयार होईल. मोठ्या मनाचा कल भिकार वस्तूंकडे कधींही जावयाचा नाहीं. या दरिद्री लोखंडासाठीं माझ्या वैभवावर पाणी सोडण्यास मी तयार नाहीं. बरें ही निष्कलंक रौप्यमंजूषा काय ह्मणते ? " **जें तुज उचित असावें तें तुजला मजमुळेंच लाभेल.** " काय ? योग्य आहे तें मिळेल ? केरलराज ! जरा थांब. तुझी योग्यता काय आहे ती निःपक्षपातानें ठरीव. माझ्या मताप्रमाणें जर माझी योग्यता ठरवावयाची ह्मटली तर मला वाटतें ती बरीच होईल. पण ' बरीच ' ह्मणजे तरी काय ? कदाचित् ही ' बरीच ' योग्यता या सुंदरीच्या प्राप्तीला योग्य व पुरेशी होणार नाहीं. या रमणीच्या प्राप्तीला त्याहूनही अधिक योग्यतेची जरूर असेल. पण माझी योग्यता अशी कमी ठरवून घ्यावयाची ?-छीः-" **जें तुज उचित असावें-** " ! तर मग तें बक्षिस ह्मणजे ही सुंदरीच ! कुल, वैभव, मोठेपणा, सद्गुण व सर्वांपेक्षां माझें विमल प्रेम, या सर्वांमुळें ही सुंदरी मला खास खास योग्य आहे. बरें आपण हीच पेटी निवडली तर ? पण पुढें पाहूं. या सुवर्ण मंजूषेवरील लेख वाचूं या-" **इच्छिति जयास बहुजन तें तुजला मजमुळेंच लाभेल.** " ह्मणजे हीच सुंदरी ही-

[जन सारे मजला०]

जगिं वांछिति सकलहि ही रमणी ॥ धृ० ॥

अस्त्र जयद जी त्या मदनाचें ।

तेविं निर्बंधन सुगुणगणाचें ।
महासदनही बहुविभवाचें ।
तीस न इच्छिल कोण जनीं ॥ १ ॥

या देवीच्या वास्तव्यामुळें हें रत्नपुर महाक्षेत्र असें समजून चोहोंकडून हिच्या प्राप्तीसाठीं-निदान दर्शनासाठीं-लोकांच्या झुंडी-च्या झुंडी लोटत आहेत. पूर्वी ज्या भयंकर अरण्यांत सूर्यकि-रणांलाही मार्ग मिळत नसे, तेथें लोकांच्या रहदारीमुळें चांगले लांब रुंद मार्ग तयार झाले आहेत! हिच्या प्राप्त्यर्थ येणाऱ्या लोकांना वाटेवरील महानद्या क्षुद्र ओढ्यांप्रमाणें वाटतात! या तीन मंजूषांपैकीं एकींत या सुंदरीचें चित्र आहे. या लोहमंजूषेंत तें असेल का? छेः, असा विचारसुद्धां मनांत आणणें ह्मणजे मोठें पाप होय. कां कीं-

[साकी]

अतुलकांति बहुमूल्य मणि जगीं कवण आयसीं जडवी।
राज्ञीभूषण ताम्रमय असें कोण अहा तें घडवी ॥
प्रतिकृति रमणीची । असावी हींत कशी साची ॥ १ ॥

बरें, या रौप्यमंजूषेंत तें चित्र असेल का? छेः, सुवर्णापुढें रुप्याची महती ती काय? अगदीं संशयच नको. या सुवर्णमंजूषेशिवाय दुसऱ्या कोणत्याही पेटींत हिचें चित्र नाहीं. या पेटीची किल्ली मला द्या. हीच पेटी मी निवडतों. माझी कुलस्वामिणी मला यश देवो!

मृणालिनी-ही घ्या महाराज. तींत माझें चित्र असेल तर मी आपलीच आहें.

केरलराज-हा दैवा! हें काय हें येथें? हें चित्र तर पिशा-

चाचें आहे! आणि त्याच्या लांब लोळणाऱ्या जिभेवर कांहीं लिहिलें आहे. काय तें वाचूं या–

[भल्या माणसा दस०]

चकाकित दिसे वरुनि सकल तें सुवर्ण नसतें जाण मनीं। मूढचि तुजसम बाह्यरूप तें देखुनि फसती असे जनीं ॥ योग्य न तुज ही रमणी, असती सकल भामिनी तुज भगिनी। कृष्णमुखातें करुनि सुखें जा त्वरें मंदधि स्वस्थानीं ॥ १ ॥

हाय हाय! काय माझें दुर्दैव हें! मृणालिनि, येतों तर आतां. माझें अंतःकरण अगदीं दुभंग होऊन गेलें आहे. असो, काय नशीबीं असेल तें भोगिलें पाहिजे. [केरलराज व अनुयायी जातात.]

मृणालिनी–अविचाराचा शेवट असाच व्हावयाचा. प्रभो! माझ्या वसंतराजांखेरीज सर्वांचा शेवट असाच होवो.

विशाखा–ताईसाहेब, हे पहा अंगराजही शपथ घेऊन आपल्या दैवाची परीक्षा पहावयास इकडेच येत आहेत.

[शिंगें वाजतात; अंगराज, व त्याचे सेवक येतात.]

मृणालिनी–महाराज, त्या पहा मीं सांगितलेल्या तीन मंजूषा. त्यांपैकीं ज्यांत माझें चित्र आहे ती नेमकी पेटी जर आपण ओळखून काढाल तर आपणांस मी वरीन. पण आपली निवड जर चुकली तर आपणाला येथून ताबडतोब निघून जावें लागेल.

अंगराज–तीन गोष्टी करण्याबद्दल मीं शपथ घेतली आहे. पहिली गोष्ट–या तीन मंजूषांपैकीं मी कोठली निवडली तें कोणाला कधींही सांगावयाचें नाहीं. दुसरी गोष्ट–जर मी नेमकी

पेटी शोधून काढली नाहीं तर आमरण मी कोठल्याही स्त्रीशी विवाह करावयाचा नाहीं आणि तिसरी गोष्ट-जर माझी निवड चुकली तर ताबडतोब हें शहर सोडून जावयाचें.

मृणालिनी–या अभागिनीच्या प्राप्तीची इच्छा धरून जो कोणी येतो त्याला या शपथा घ्याव्याच लागतात.

अंगराज–या अटी समजून घेऊनच पेट्यांची निवड करावयाला मी आलों आहे. दैवा ! तूंच आतां मला साह्य कर. ही पेटी लोखंडाची–[वाचतो] " **तव विभव सकल दारुणसंशयगत मजमुळेंच होईल.** " असें काय ? भिकारड्या लोहा ! तूं जर यापेक्षां कांहीं चागलें दिसलें असतेंस तर तुझ्या या दरडावण्याला कोणी भीक तरी घातली असती. बरें ही सुवर्णमंजूषा काय ह्मणते ? " **इच्छिति जयास बहुजन तें तुजला मजमुळेंच लाभेल.** " बहुजन इच्छितात तें ! हे बहुजन ह्मणजे जगांत जे मूर्ख लोक भरले आहेत त्यांचा समूहच ह्मणावयाचा. या जगांत शहाण्यांपेक्षां मूर्खांची संख्या किती तरी पटीनें जास्त आहे. हे मूर्ख लोक नेहमीं बाह्य स्वरूपाला भुलणारे असतात. जें चर्मचक्षूंला दिसतें, त्याच्यापलीकडे कांहीं असेल असें त्यांना कधींच वाटत नाहीं. वस्तूच्या अंतरंगाकडे हे कधींहीं पहावयाचे नाहींत. वारा, पाऊस यांपासून भीति असतांही ज्याप्रमाणें पाकोळी आपलें घरटें उघड्यावरच बांधते, त्याप्रमाणेंच या मूर्ख बहुजनसमाजाचें वर्तन असतें. बहुजनसमूह ज्याची इच्छा करतो, तें कांहीं मला नको. त्यांच्याप्रमाणें वागून मूर्खत्व पदरीं बांधून घ्यावयाची माझी इच्छा नाहीं. बरें, ही सुंदर रौप्यमंजूषा काय ह्मणते ? " **जें तुज उचित असावें तें तुजला मजमुळेंच लाभेल.** " अगदीं बरोबर आहे. अंगांत गुण असल्याशिवाय दैवाला फसवून श्रेष्ठत्व

मिळविणें बिलकूल रास्त होणार नाहीं व कोणीही योग्यतेशिवाय श्रेष्ठत्व मिळविण्यास यत्न करूं नये. योग्यता व गुण अंगांत असतील तरच श्रेष्ठत्व व मानसन्मान मिळेल. खरोखर, या जगांत मानमरातब, हुद्दे मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या, वगैरे अन्यायमार्गानें न देतां, जर लोकांच्या योग्यतेप्रमाणें देण्यांत येतील तर किती बहार होईल ! ह्रल्लीं जे लोक अगदीं नीच व निकृष्ट स्थितींत आहेत, त्यांपैकीं किती तरी उच्च स्थितीला पोंचतील व जे तोऱ्यानें उच्च स्थिति भोगीत आहेत ते नीचावस्थेला येतील. असो; " **जें तुज उचित असावें तें तुजला मजमुळेंच लाभेल** " हेंच आपल्याला पसंत आहे. हीच पेटी मी निवडतों. हिची किल्ली मला द्या; ह्मणजे माझें दैव मजवर तुष्ट आहे कीं रुष्ट आहे हें पहातों. [रौप्यमंजूषा उघडतो.]

मृणालिनी–(एकीकडे) अरेरे ! आंतील चित्र पाहून बिचारा अगदीं निराश होईल.

अंगराज–अरेरे दुर्दैवा ! काय हें ? हें चित्र तर गाढवाचें आहे. आणि त्याच्या गळ्यांत बांधलेल्या कागदावर कांहीं लिहिलें आहे. काय तें वाचूं या. हाय हाय ! माझ्या सर्व आशा नष्ट झाल्या. " **जें तुज उचित असावें तें तुजला मजमुळेंच लाभेल.** " मग मला हें गाढवच योग्य काय ? माझी योग्यता हीच का ? या सुंदरीच्या प्राप्तीची आशा धरून आलों, तों हे गर्दभराज मला प्राप्त झाले ! दुर्दैव माझें !

मृणालिनी–आपण चुकीची निवड करावयाची आणि दैवाला दोष द्यावयाचा हें कांहीं ठीक नाहीं महाराज !

अंगराज–हें काय आहे तें वाचूं या– (वाचतो.)

[मृत्यु-भयातें दाखवितां०]

आभासातें वस्तु समजुनी तुजसम बहुजन ते फसती । सौख्य तयाचें भासमयहि तें; तेचि मूढधी जानें असती ॥ मूढा तुज नच उचित खचित ही ललनाचूडामणी कदा । मंदजनवरा सुखें गृहा जा असें योग्य तुज मीच सदा ॥ १ ॥

मी मूर्ख तर ठरलोंच. पण येथें जास्त वेळ राहिलों तर मी अधिकच मूर्ख ठरेन. मी आलों कोठल्या आशेनें, आणि परिणाम काय झाला ! मृणालिनि, मी जातों. घेतलेल्या शपथा पाळण्यांत मी कधींही अंतर करणार नाहीं. [अंगराज व अनुयायी जातात.]

मृणालिनी–ठीक झालें, आपली योग्यता न ओळखणारे असे लोक दिव्यावर झेंप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें असतात. यांना आपल्या ज्ञानाची घमेंड असते आणि ह्मणूनच ते असे तोंडघशी पडतात.

विशाखा–स्त्री मिळणें तरी नशीबावर आहे ताईसाहेब !

मृणालिनी–विशाखे, ते पडदे नीट करून ठेव; मी जातें.

[एक सेवक येतो.]

सेवक–बाईसाहेब कोठें आहेत ?

मृणालिनी–काय ह्मणतां बुवासाहेब ? ही मी येथें आहें.

सेवक–बाईसाहेब, मणिपुराहून एक जासूद आला आहे तो ह्मणतो कीं, आपले धनी मागाहून येत आहेत. त्यानें बरोबर फार मूल्यवान् नजराणा आणिला आहे. बाईसाहेब, असा दूत मीं अजूनपर्यंत कधींही पाहिला नाहीं. किती रूपवान् आणि तरुण

आहे तो ! ज्याप्रमाणें वसंत ऋतूचे अगोदर त्याचे दूत ह्मणजे सुंदर सुंदर पक्षी पुढें येऊन थडकतात त्याप्रमाणेंच त्या वसंतराजांचा हा दूत त्यांच्यापुढें आला आहे. बाईसाहेब, तो जर इतका सुंदर आहे, तर त्याचा यजमान किती सुंदर असेल ?

विशाखा–काय ह्मटलेंस तूं ? वसंतराज मणिपुरकरांचा दूत आला आहे ? खरेंच कीं काय ?

सेवक–होय.

मृणालिनी–काय वसंतराज येथें येणार ? देवा ! त्यांना यश दे. विशाखे, इतके दिवस मनांत धरलेला हेतु सफल होईल काग ? नाहीं तर तें निष्ठुर दैव अगोदर आशा दाखवून नंतर घात करणार असेल ! ओठाशीं प्याला नेणार तोंच हातचा गळून पडणार असेल ! देवा–

[दोलेरे जोबन मधु०]

फसत हृदय तरि काय भुलुनियां । मृग मृगजल तें
जेविं बघुनियां ॥ धृ० ॥ रुचिर मधुर आस प्रथम
दाखवुनी जाई दैव विनाश करुनियां ॥ फसत० ॥

(पडदा पडतो.)

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

(मणिपुर–एक रस्ता.)

[**मेघनाद व मेघकांत** येतात.]

मेघकांत–बरें, कांहीं कमीजास्त बातमी ?

मेघनाद–रामेश्वराजवळ फुटलेलें तें गलबत धनदत्ताचेंच शेवटीं ठरलें. तेथें अशींच नेहमीं गलबतें फुटतात. आजपर्यंत त्या खाडीनें किती गलबतांचे बळी घेतले असतील कोण जाणे !

मेघकांत–तर मग त्या सज्जन धनदत्ताचें फारच नुकसान झालें म्हणावयाचें. खरोखर तो धनदत्त किती सज्जन ! केवढा दयाळु ! किती उदार ! त्याच्या सुजनतेचें वर्णन करावयाला मी अगदीं असमर्थ आहें.

मेघनाद–खरोखरच तो एक अप्रतिम मनुष्य आहे. ईश्वर करो आणि यापुढें तरी त्याचें असें नुकसान न होवो !

मेघकांत–पण शकुन कांहीं चांगला दिसत नाहीं. हें पहा शक्तिनाथरूपी प्रत्यक्ष पिशाच इकडे येत आहे. [**शक्तिनाथ** येतो.] शक्तिनाथ, बाजारांत काय बातमी आहे ?

शक्तिनाथ–तुम्हाला माहीत आहेच. हो–तुमच्या इतकी बातमी कोणाला असणार ? माझी पोरगी पळून गेली तें तुम्हांला माहीत आहेच.

मेघनाद–होय, मला माहीत आहे. तुझ्या सारिकेला उडून जाण्याकरितां पंख कोणीं तयार केले हेंही मला ठाऊक आहे !

मेघकांत–शक्तिनाथानें सारिकेला पिंजऱ्यांत घालून बंदोबस्तानें ठेविली होती. संधि मिळतांच सारिका उडून जावयाचीच. तिचा तो स्वभावच आहे !

शक्तिनाथ–प्रत्यक्ष बापाला तिनें फसविलें ! तिचें कल्याण कधींही होणार नाहीं ! व तिला पळवून नेणारांचेंही कदापि अकल्याण झाल्याशिवाय रहाणार नाहीं !

मेघनाद–त्यांचें कल्याण अकल्याण आतां तुझ्या हातांत कांहीं राहिलें नाहीं. परमेश्वर काय करील तें खरें.

शक्तिनाथ–माझ्या पोटच्या पोरीनें माझ्याशीं असें बेमान व्हावें! माझ्या प्रत्यक्ष मुलीनें ! हाय ! हाय !

मेघकांत–तुझी ती मुलगी खरी, पण हस्तिदंत आणि कोळसा, सोनें आणि लोखंड, हंस आणि कावळा यांत जितका भेद असतो तितकाच तिच्यांत आणि तुझ्यांत भेद आहे. पण धनदत्ताचें गलबत फुटलें अशी बातमी आहे ती खरी का खोटी ?

शक्तिनाथ–हें पुनः माझेंच नुकसान ! तो दिवाळखोर धनदत्त–भिकारडा मोठ्या दिमाखानें सराफबाजारांत येऊन मला शिव्या देत असे. आतां म्हणावें सांभाळून रहा ! आपला रोखा आतां अगदीं नीट बघून ठेव. मला लोकांच्या माना मुरगळणारा सावकार असें तो म्हणत असे. आतां नीट सांभाळून रहा. आपलें औदार्य गाजवावयाला तो बिनव्याजी कर्ज देत असे. आतां म्हणावें माझ्या चांगल्या कचाट्यांत सांपडला आहेस !

मेघनाद–तुझ्या कर्जाची फेड जर धनदत्तानें मुदतीच्या आंत केली नाहीं तर त्याबद्दल त्याच्या शरीरांतील मांस घेणार तूं ? त्यांत तुझा काये बरें फायदा ?

शक्तिनाथ–फायदा काय ? माझा सूड भरपूर उगवून निघेल हाच फायदा ! त्यानें आजपर्यंत माझी किती फजीति आणि मान हानि केली आहे ? आणि पैशांकडून तरी माझें त्यानें किती नुकसान केलें आहे ? माझें नुकसान झालें ह्मणजे त्याला आनंद होत असे ! मी व्याज घेतों ह्मणून तो मला हंसत असे. आणि त्याबद्दल तो माझी फार टर उडवीत असे. आह्मा बौद्धांचा तो फारच द्वेष करीत असे. माझ्या धंद्याचें त्यानें किती नुकसान केलें आहे ? माझे मित्र होते त्यांना त्यानें माझे शत्रु केले ! आणि शत्रु होते त्यांना अधिकाधिक चिथविलें ! आणि हें काय ह्मणून ? तर मी बौद्ध आहें. बौद्ध लोकांना डोळे नसतात काय ? का त्यांना हात, पाय, इंद्रियें, लांबी, रुंदी, प्रेम, मनोविकार वगैरे नसतात ? तुह्मी वैदिक लोक जें अन्न खातां तेंच ते खातात. ज्या शस्त्रांनीं तुह्मांला दुखापत होते, त्यांनींच त्यांनाही होते; तुह्मांला जे रोग होतात तेच त्यांनाही होतात आणि ज्या औषधांनीं तुह्मांला गुण येतो त्याच औषधांनीं त्यांना येतो. उन्हानें तुह्मांला ताप होतो आणि त्यांना होत नाहीं असें नाहीं. पावसानें तुह्मी मात्र भिजतां आणि ते कोरडेच रहातात असें नाही. तुह्मीं आह्मांला शस्त्रानें टोंचलें, ही तर तुमच्याप्रमाणें आमच्याही अंगांतून रक्त येतें. आह्मांला गुदगुल्या झाल्या असतां तुमच्या प्रमाणेंच आह्मांला हसूं सुटतें. विषानें तुह्माप्रमाणेंच आह्मीही मरतों. मग तुह्मीं आमचा अपराध केला असतां आह्मीं तुमचा सूड कां घेऊं नये ? इतर सर्व बाबतींत तुमचें व आमचें साम्य आहे, तर याही

बाबतींत आह्मी तुमच्याप्रमाणेंच वर्तन करणार ! एखाद्या बौद्धानें वैदिक मनुष्याचा अपराध किंवा नुकसान केलें तर परिणाम काय होतो ? तो वैदिक मनुष्य त्या बौद्धावर चापून सूड घेतो. तर मग जर एखाद्या वैदिक धर्माच्या मनुष्यानें एखाद्या बौद्धाचा अपराध केला तर वैदिक लोकांचें अनुकरण करून त्या बौद्धानें काय करावें ? अगदीं बेलाशक यथेच्छ सूड घ्यावा. तुह्मींच आह्मांला हें शिकविलेंत, आणि तेंच मी करतों आहें. पण या प्रसंगीं शिष्याचा प्रसाद गुरूला बराच मिळेल.

(एक सेवक येतो.)

सेवक–आमचे सरकार धनदत्त महाराज, आपणा दोघांनाही घरीं बोलावीत आहेत. त्यांना तुमच्याशीं कांहीं बोलावयाचें आहे.

मेघनाद–आह्मी त्यानांच शोधित आहों.

(**भैरव** येतो.)

मेघकांत–हा याचा दुसरा ज्ञातिबांधव आला. दुष्टपणांत या दोघांच्या तोडीला तिसरा कोणीही मिळणार नाहीं.

(मेघकांत, मेघनाद व सेवक जातात.)

शक्तिनाथ–काय भैरवा, कांतिपुरची काय बातमी ! माझी सारिका सांपडली का तेथें ?

भैरव–जेथें जेथें ती आहे असें मला कळलें त्या त्या ठिकाणीं मी जाऊन आलों. पण सारिका कोठेंच सांपडत नाहीं.

शक्तिनाथ–अरे अरे अरे ! ती गेली त्याचें मला वाईट वाटत नाहीं ! पण माझे दोन अति मूल्यवान हिरे आणि दुसरीं रत्नें गेलीं, त्याचें मला फार वाईट वाटतें. त्यापेक्षां माझा प्राण चोरीस

जाता तरी पत्करलें असतें. त्या दोन हिऱ्यांना मी रोख पांच हजार मोहोरा मोजल्या होत्या आणि बाकीच्या रत्नांची किंमत त्या रकमेच्या तिप्पट असेल. ती कारटी येथें माझ्या पायांशीं मरून पडली असती आणि तीं रत्नें जर तिच्या अंगावर असतीं तर तीं मीं मोठ्या आनंदानें काढून घेतलीं असतीं! माझी रोख रक्कम तरी किती गेली! आणि त्याबद्दल कांहींच शोध लागत नाहीं ह्मणतोस? शिवाय या चोरीचा व पोरीचा शोध करण्याला किती खर्च लागला असेल कोण जाणे! एक नुकसान झालें नाहीं तोंच हें दुसरें नुकसान! चोरानें बराच किंमतीचा माल चोरला आणि त्याला शोधावयालाही बराच खर्च झाला आणि पुनः चोर सांपडत नाहीं; आणि सूडही उगवावयाला मिळत नाहीं तो नाहींच. आणि जीवालाही समाधान नाहीं! निष्ठुर दैव एकट्या मजवरच कसें कोपलें? सर्व जगांत एकट्या मजवरच दुःखाचा डोंगर कां कोसळावा?

भैरव—असें कां ह्मणतां? मीं कांतिपुरास ऐकिलें कीं धनदत्तावर दुःखाचा डोंगर—

शक्तिनाथ—काय ह्मणतोस? काय ह्मणतोस? धनदत्तावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे? तो कसा?

भैरव—रामेश्वरानजीक त्याचें एक गलबत बुडालें. मोहद्वीपाला गेलेलें त्याचें दुसरें गलबतही वादळांत सांपडून—

शक्तिनाथ—काय ह्मणतोस? ठीक झालें! ठीक झालें! पण ही बातमी खरी का?

भैरव—त्या वादळांतून निभावून आलेले कांहीं खलाशी मला भेटले, त्यांनींच हें सांगितलें.

शक्तिनाथ–शाबास शाबास भैरवा ! मोठ्या आनंदाची बातमी आणलीस. कोठें ऐकलेंस हें तूं ? कांतिपुरांत ? माझे कान आज तृप्त झाले !

भैरव–होय. आणि तुमच्या सारिकेनें कांतिपुरांत एका दिवसांत पांचशें मोहोरा उधळून टाकिल्या, असेंही पण मीं तेथेंच ऐकिलें.

शक्तिनाथ–अरे अरे ! माझ्या हृदयांत हा तूं खंजिरच खुपसलास! ! त्या मोहोरा पुनः माझ्या हातीं कधींही लागावयाच्या नाहींत ! एका दिवसांत पांचशें मोहोरा अं ? पांचशें मोहोरा !

भैरव–कांतिपुराहून मीं धनदत्ताच्या सावकारलोकांबरोबरच निघालों. ते म्हणत होते कीं, आतां धनदत्ताला दिवाळें काढल्या खेरीज गत्यंतरच नाहीं !

शक्तिनाथ–छान झालें ! उत्तम झालें ! आतां माझ्या कचाट्यांत तो पूर्णपणें सांपडला आहे ! आतां मागचा सर्व सूड यथास्थित उगवून घेतों. छान झालें ! मला मोठा आनंद झाला आहे !

भैरव–एका पोपटाबद्दल सारिकेनें दिलेली आंगठी मला एका सावकारानें दाखविली.

शक्तिनाथ–यापेक्षां ती कारटी जन्मतांच मेली असती तर फार बरें झालें असतें ? ती आंगठी मौल्यवान् माणिकाची होती. माझ्या प्रियेनें आपली आठवण रहावी म्हणून ती आंगठी मृत्युसमयीं मला दिली होती ! एक लाख पोपट मला कोणी दिले असते तरी त्याला ती आंगठी मीं दिली नसती !

भैरव–पण त्या धनदत्ताचा अगदीं पूर्णपणें विनाश झाला.

शक्तिनाथ–होय. हें तर खरेंच. मोठी मौज झाली ! भैरवा,

मुदत भरावयाला अजून पंधरा दिवस अवकाश आहे. पण फौजदारांना अगोदरच सांगून ठेव. मुदत चुकली कीं त्याचें काळीजच कापून घेतों ! हा धनदत्त मणिपुरांत नसता तर आज पर्यंत मला किती तरी फायदा झाला असता. ' अहिंसा परमो धर्मः ' हें आमच्या बौद्धधर्माचें आदितत्त्व तर या प्रसंगीं मला मुळींच मान्य नाहीं. भैरवा, तूं जा आतां. मग मला विहारांत भेट, समजलास ? [जातात.]

प्रवेश दुसरा.

(रत्नपुर—मृणालिनीच्या वाड्यांतील एक दिवाणखाना.)

[वसंत, मृणालिनी, तरंग, विशाखा, व सेवक.]

मृणालिनी—या दासीची एवढी विनंति ऐकावीच. पेटीची निवड आजच करूं नये—

[रुमक झुमक जोबना०]

विनति चरणिं किंकरी । करी ही । मान्य
करावी ती लवलाही ॥ धृ० ॥ साहसकरणीं
सिद्ध न व्हावें योग्य समय हा नच होई ॥ १ ॥

आपण कृपा करून एक दोन दिवस थांबावें. घाई करूं नये. आपली निवड जर चुकली तर आपल्या सुखकर संगतीला मी जन्मभर अंतरेन. ह्मणून हें साहस आजच करूं नये. आपला माझा वियोग होणार नाहीं असें मला कोणी तरी सांगत आहे. पण असें सांगते ती कांहीं प्रीति नव्हे. ती सांगणारी माझी मनोदेवताच होय. माझ्या

सारख्या कुमारिकेला याहून स्पष्ट बोलतां येत नाहीं. पण हें साहस करण्यापूर्वी आपण येथें आणखीं एक दोन महिने रहावें. माझ्या प्राप्तीचा खात्रीचा मार्ग मी आपणाला सांगितला असता, परंतु तें माझ्या पूज्य पित्याच्या इच्छेविरुद्ध होईल. आपणास माझ्या लाभाचा खरा खरा मार्ग न समजल्यामुळें माझा आपला वियोग होण्याचा बराच संभव आहे आणि वियोग झाला म्हणजे " पित्याची इच्छा मोडली असती तर बरें झालें असतें, " हा वाईट विचार माझ्या मनांत आणण्याचें पाप आपल्यास लागेल. मी कबूल करतें कीं, आपली मूर्ति पाहून--

[अनुभविक लोक जग०]

अति विवश होय मम मति लवभरी शक्ति ना
तियेतें । ती ॥ ध्रु०॥ गीतनाद सुमधुर जैसा गुं-
गवी मृगातें ॥ चित्तवृत्ति मम अपुली ही मूर्ति
तशि करीते ॥ अति विवश० ॥ १ ॥

(स्वगत) हाय ! हाय ! किती मी अभागी ! कीं जो वर माझ्या मनाला सर्वतोपरी आवडला तो मला वरतां येऊं नये ! (उघड) महाराज, आजच हें साहस करण्यास उद्युक्त होऊं नये.

वसंत–छे छे ! आजच मी पेटीची निवड करतों. या संदिग्ध स्थितीच्या यातना मला सहन करवत नाहींत. एकदम सोक्ष किंवा मोक्ष होऊन गेलेला बरा !

मृणालिनी–आपल्याला मजमुळें यातना होत आहेत, तर मग मजवर आपलें प्रेम अगदीं शुद्ध नाहीं. त्यांत दुसरे कांहीं तरी मनोविकार मिश्र आहेत.

वसंत–छे छे ! असें बिलकूल नाहीं. यावेळीं माझ्या हृदयांत शिरून तुला पहातां आलें तर तुला असें दिसेल कीं–

• [जालं अजब एक०]

प्रेमें हृदय पूर्ण । साहे मल न जाण ॥
शंका न मनिं आण । अणुमात्र कांहीं ॥ धृ० ॥
त्वन्मूर्ति सुखदायि । मधुरा सुतनु पाहिं ॥
मम या हृदयगेहिं । वसते सदा ही ॥ १ ॥
होई जलधि रिक्त । रवि हो समयिं शांत ॥
मत्प्रेम लवमात्र । न ढळे कधींही ॥ २ ॥

पण मी पेट्यांची निवड आजच करणार.

मृणालिनी–ठीक आहे. त्या तीन मंजूषा आहेत, त्यांपैकीं एका मंजूषेंत माझें चित्र आहे. मजवर आपली जर खरी निर्मल प्रीति असेल तर ती मंजूषा आपण ओळखाल. विशाखे, संगीत शाळेंत जाऊन नर्तकीगणास बोलावून आण आणि नृत्यगीत सुरू होऊं दे. यांना जर अपजय प्राप्त झाला तर या जगांत मी जीवंत रहाणें शक्य नाहीं ! आणि हें संगीत, पतिव्रता स्त्रिया सती जात असतां जीं मंगलवाद्यें सुरू असतात त्यांपैकींच समजावें म्हणजे झालें ! आणि माझ्या सुदैवानें जर यांना जय मिळाला तर नूतन राजाच्या राज्यारोहणप्रसंगीं राजनिष्ठ प्रजा जीं गाणीं गाऊन मंगलवाद्यें वाजवितात तशासारखेंच हें नृत्यगीत होईल. अथवा विवाहाच्या मंगल दिवशीं पहांटे ज्या मंगल वाद्यांच्या गजरानें वर जागा होतो तशासारखें हें संगीत समजावें. (स्वगत) अहाहा ! हा माझा प्रियकर त्या मंजूषांकडे जावयास निघाला. जानकीच्या स्वयंवराच्या प्रसंगीं श्रीरामचंद्र किंवा द्रौपदीस्वयंवराचे वेळीं

प्रतापशाली अर्जुन ज्या वीरश्रीनें पुढें सरसावले तीच वीरश्री आज माझ्या प्रियाच्या मुखकमलावर दिसत आहे. हे दयाघना देवा, तूंच या प्रसंगीं माझ्या प्रियकराला साह्य हो. [विशाखा नर्तकींसह येते.] (उघड) हूं, चालूं द्या. (नृत्यगीत सुरू होतें; वसंत मंजूषांसंबंधीं विचार करीत रहातो.)

नर्तकी.

[जावोजी जावो०]

गुणग्रहणपटु जन परिमित जनिं । बाह्यरूप जे
भुलति न देखुनि ॥ धृ० ॥ बघुनि न अंतर ।
अतितर सुखकर । नयनहृदयहर । बाह्यरूपिं
रति दिसत मूढगणिं ॥ १ ॥

वसंत–वस्तूंचें बाह्यरूप पुष्कळ वेळां सत्यस्वरूपाहून भिन्न असतें. भपकेदार अशा बाहेरच्या स्वरूपासच हें जग नेहमीं भुलतें. न्यायसभेंतील वकील लोक,व सभेंतील वक्ते आपल्या मोहक वक्तृत्वशक्तीच्या योगानें मुद्दा कितीही खोटा असला तरी तो खरा आहे असें भासवितात. धर्मसंबंधांतही पुष्कळ वेळां असेंच घडतें. एखादी गोष्ट वस्तुतः नीच व अधार्मिक असतां एखाद्या ढेरपोट्या दुष्टाचार्य शास्त्रांतील खऱ्या अर्थाची लटपट करून ती गोष्ट शास्त्रास मान्य आहे असें सिद्ध करून दाखवितो ! या जगांत बहुतेक दुर्गुण बाह्यतः सद्गुणांचें रम्य स्वरूप धारण करतात. खरोखर ज्यांचें अंतःकरण सशाच्या अंतःकरणाप्रमाणें अतिशय भित्रें असतें ते लोक वरून पृथापुत्र अर्जुनाच्या शूरत्वाची ऐट आणितात. परंतु त्यांचें अंतरंग शोधून पाहिलें तर तें सशाच्या अंतःकरणासारखेंच असतें असें दिसून येतें. पण वरून शौर्याची ऐट

आणून हव्या तशा वल्गना करण्यास ते कमी करीत नाहींत ! सौंदर्यासंबंधीं पाहिलें तरी हीच गोष्ट दिसून येते. कुरूप स्त्रिया आपण सुरूप दिसावें ह्मणून दागदागिन्यांनीं वगैरे स्वतःला शोभा आणण्याचा प्रयत्न करीत असतात ! पुष्कळ वेळां असें पहाण्यांत येतें कीं, जगांत दिसून येणारें सौंदर्य स्वाभाविक नसून कृत्रिम असतें. बाह्यरूप फसविणारें असतें ! भयंकर अगणाऱ्या समुद्राचें स्वरूप ज्या प्रमाणें शांत दिसणाऱ्या किनाऱ्यावरून समजून येत नाहीं त्या प्रमाणेंच वस्तूच्या बाह्यरूपावरून तिच्या अंतःस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होत नाहीं. तात्पर्य काय कीं—

[प्रणयतरंगासवें०]

बाह्यरूप मोहुनी । टाकितें मना क्षणीं । निरसुनी
टाकुनी सत्यरूप तत्क्षणीं ॥ धृ० ॥ विबुधमतिहि
यापरी । भ्रान्तितें पहा बरी । नवल याहुनी तरी ।
काय होय या जनीं ॥ १ ॥

ह्मणूनच हे चकाकणाऱ्या सुवर्णा, मी तुला भुलावयाचा नाहीं. हे रौप्या, तूं लोकांच्या देवघेवीचें साधन असल्यामुळें तूं आमच्या पूर्ण परिचयाचें झालें आहेस; तुला मी पसंत करीत नाहीं. ही लोहमंजूषा जरी मला भीति दाखवीत आहे, तरी ही आपल्या साधेपणामुळें माझें मन आपल्याकडे आकर्षण करून घेत आहे. हीच मंजूषा मी पसंत करतों.

मृणालिनी— [स्वगत] काय मी पहात आहें ? या वेळीं चिंता, भय वगैरे सर्व विकार जाऊन माझें अंतःकरण अगदीं प्रेममय झालें आहे. मृणालिनि, आज मात्र तूं धन्य झालीस—

[सखे कोइ शामसे०]

धन्य तूं नितांत जनीं होसि खरी ।
भाग्या तव खचित बघें ये न सरी ॥ धृ० ॥
घोर तपें जें प्राप्य न तुजसी, शत जनुही घेसि जरी ।
सुखनिधान तेंचि आजि येत करीं ॥ १ ॥

हृदया, सर्व जग तुला आज प्रियकरमयच दिसत आहे आणि

हर्षभरें तूं उचंबळसि बहु कुमुद जसें चंद्रकरीं ।
हृदया परि लवभरि तरि शांति धरीं ॥ २ ॥

प्रेमा, तुझा हा वर्षाव मला फार तीव्र वाटतो; तर त्याला थोडा आंवरून धर.

वसंत– [लोहमंजूषा उघडून] अहाहा ! हें या सुंदरीचें चित्र किती हुबेहुब साधलें आहे! हे चित्रकारा, खरोखर तूं धन्य आहेस!

[मज गमे ऐसा जनक०]

खचित तूं गमसी मानसीं । प्रतिविधाता ॥ धृ० ॥
निर्मुनियां ही लावण्यखनि । झाला विधि तो धन्य
त्रिभुवनिं । चित्रपटीं सखि-चित्र काढुनी । धन्य
तसा जगतीं तूं होसी ॥ १ ॥

हिच्या या डोळ्यांतील कृष्णवर्ण बुबुळें जणु काय फिरत असल्या प्रमाणें वाटत आहेत. हे रक्त ओष्ठ पूर्णपणें न मिटतां थोडे उघडे ठेवले आहेत. हिचा हा केशपाश किती मजेदार दाखविला आहे ! जणु काय लोकांचीं अंतःकरणें धरण्यास ब्रह्मदेवानें हें एक अमोघ जालच निर्माण केलें आहे ! हिचे हे नेत्र तर मोहकतेचें केवळ सारच आहेत. मला वाटतें, हिचा एक नेत्र लिहून झाल्यावर तो पाहून

चित्रकारास बराच वेळ दुसरा लिहिण्याचें भानच राहिलें नसेल! या सुंदरीचें केवळ हें चित्र, पण त्याचें यथायोग्य वर्णन करण्यास मी समर्थ नाहीं, तर प्रत्यक्ष सुंदरीचें वर्णन करण्याला मी कसा समर्थ होईन ? अहाहा! चित्रकाराची जर इतकी कुशलता तर ज्यानें हें स्त्रीरत्न निर्माण केलें त्या विधात्याची कुशलता किती असेल ?

[यत्रमारिबारेनुप्रिया०]

वर्णूं विधिकौशल्य कसें। वाग्देवीही क्षम त्या नच होइल ॥ ध्रु० ॥ यासम लावण्य कुणीं। देखिलें न कधिं नयनीं। जनिं विपिनीं ॥ १ ॥ रूप अतुल हें बघुनी। दर्प देति झणिं त्यजुनी। सुररमणी ॥ २ ॥

या पेटींत ही एक लिहिलेली चिठीही आहे! तींत काय लिहिलें आहे तें वाचूं या–

[पिलू–धुमाळी.]

"धन्य खरोखर अससी नरवर हंसचि होसि गुण-ग्रहणीं। मोहीं पडसि न मोहक सुंदर बाह्यरूप तें पाहोनी ॥ कन्या मम ही धन्या अन्या तुलना नाहीं जीस जनीं। महाभाग तुज वरी तिजसवें सुखें आयु जा आक्रमुनी ॥ १ ॥"

वडिलांची आज्ञा मला शिरसा मान्य आहे. जो मनो-रथ या अंतःकरणांत सतत वास करीत होता, तो आज भगवंताच्या दयेनें पूर्ण झाला. (मृणालिनीचा हात आपल्या हातांत घेऊन) अहाहा! सुंदरि–

[कालंगडा-दादरा.]

तव विमल रुचिर करसरोरुहास । स्पर्शितां गमे
मला अनुपमसुखनिचय सकल लाभलाचि खास
॥ ध्रु० ॥ काय पाहिं भूतलास । कीं नंदनवननि-
वास । करिं हें न कळे मनास । पुरली मम
सकल आस ॥ १ ॥

दोन मल्लांची कुस्ती लागली असतां, प्रेक्षकांच्या टाळ्या व उत्तेजनपर शब्द ऐकून आपण विजयी झालों, असें त्यांपैकीं एकाला वाटत असतें; परंतु आवेशाच्या भरांत टाळ्या आपणालाच मिळत आहेत किंवा काय याची त्याला खात्री नसते. त्याप्रमाणें हें मी पहात आहें ही सत्यसृष्टि आहे, कीं स्वप्नसृष्टि आहे याचा उलगडा तूं सांगितल्याशिवाय होणार नाहीं–

मृणालिनी—वसंतराज, ही सर्व सत्यसृष्टि आहे. वास्तविक मी आहें या स्थितींत संतुष्ट असतांही, आपणाशीं माझें कांहीं तरी साम्य दिसावें ह्मणून मी आहें त्यापेक्षां सहस्रपट सुरूप आणि सधन असतें तर फार बरें झालें असतें असें मला वाटावयास लागलें आहे. गुण, रूप, संपत्ति इत्यादिकांत मी आपल्या दासीची दासीही शोभणार नाहीं पण—

[उगिच कां कांता०]

तनुसि या चरणीं आपुल्या प्रेमें वाहीं ॥ ध्रु० ॥
शिक्षणीं न संस्कृत होई । अनुभवहि जगाचा नाहीं।
प्रेमपूर्ण दासी परि ही। लुब्ध चरणपंकजिं राही॥१॥

जरी मला कांहीं शिक्षण मिळालेलें नाहीं आणि मला अनुभवही नाहीं, तरी ही दासी आपणास आपले धनी, राजे, गुरु समजून

आपणापासून शिक्षण, अनुभव आणि सद्गुण संपादून घेण्यास तयार आहे. या क्षणापर्यंत हा वाडा, या दासदासी, संपत्ति इत्यादिकांची मी मालकीण होतें, परंतु मी व माझी सर्व संपत्ति आजपासून आपलीं झालों आहों. या सर्व संपत्तीबरोबर ही मुद्रिका आपल्या करांगुलींत घालतें; हिचा आपला कधींही वियोग झाला, अथवा ही हरवली किंवा आपण ही कोणाला दिली, तर आपली मजवरील प्रीति नष्ट झाली असें मी समजेन !

वसंत–सुंदरि, आनंदातिशयामुळें मला बोलवत नाहीं. एखाद्या लोकप्रिय राजाचें किंवा लोकनायकाचें सुंदर व महत्वाचें भाषण झाल्यानंतर श्रोतृसमूहांत प्रत्येकाचें बोलणें मिळून एक अस्फुट व अव्यक्त ध्वनि उत्पन्न होतो; परंतु सर्वांना संतोष झाला आहे; याशिवाय त्यापासून स्पष्ट असा कांहीं बोध होत नाहीं; त्याप्रमाणेंच माझ्या सर्व शरीरभर अवर्णनीय असा आनंद संचारत आहे, परंतु मला त्याचें कांहींही वर्णन करतां येत नाहीं. तुझ्या मुद्रिकेविषयीं तूं तिळमात्र काळजी करूं नको. मी तिला पंचप्राणांपलीकडेही जपेन

[तुम कौन बशर हो०]

मानोनियां ही प्रणयदेवता परम पूज्य भुवनीं ।
हिस विसंबेन नच पळहि कदा मी जागृतिं वा स्वप्नीं ॥
कधिं वियुक्त हो ही मुद्रा तव, या अंगुलिपासोनी ।
तत्क्षणिंच निमाली वसंतजीवज्योतिहि समज मनीं ॥ १ ॥

विशाखा–ताईसाहेब ! आपल्या मनांतील हेतु परमेश्वरानें पूर्ण केले याबद्दल आह्मां सर्वांना अतिशय आनंद झाला आहे. वंसतराजांबरोबर आपली संसारयात्रा पूर्ण सुखकर आणि निष्कंटक अशी होवो ! आणि परमेश्वर आपणां उभयतांला चिरायु करो !

तरंग–वसंता, ताईसाहेब, तुमच्यावर इष्ट सुखांचा वर्षाव होवो. तुमच्या या आनंदांत मला होणारा आनंद मिश्रित झाला अस्तां तुमचा आनंद द्विगुणित होईल. आतां स्पष्टच सांगतों. वसंता, तुमच्या विवाहसमारंभाच्या धामधुमींत माझाही विवाह उरकून घ्यावा अशी माझी इच्छा आहे.

वसंत–वहावा ! असें होईल तर मला फारच आनंद होईल. पण तुझ्या वधूची तजवीज कांहीं झाली आहे का ?

तरंग–हो हो ! झाली आहे ह्मणजे काय ? वसंता, तुझ्याप्रमाणें माझीही दृष्टि तीक्ष्ण आहे. तुझ्या दृष्टिपथांत धनीण आली, तर माझ्या दृष्टिपथांत तिची दासी आली. तुझें प्रेम जडलें, तसेंच माझें-ही जडलें. तुझें दैव ज्याप्रमाणें त्या मंजूषांवर अवलंबून होतें, त्या-प्रमाणें माझेंही दैव त्यांवरच अवलंबून होतें. लग्नासाठीं या विशाखे-ची संमति मिळवावयाला मी किती दिवस तरी श्रम करीत होतों. शपथा घेतां घेतां माझें तोंडसुद्धां सुकून जाई. अखेरीस हिनें एकदां मला वचन दिलें कीं, जर वसंतराजांनीं ताईसाहेबांचा पण जिंकला तर मी तुह्माला वरीन.

मृणालिनी–होय ग विशाखे ?

विशाखा–(लाजल्यासारखें करून) होय ताईसाहेब, पण आपली संमति असल्यास—

वसंत–आणि तरंगा, घेतलेल्या शपथा पाळावयाला तूं तयार आहेस ना ?

तरंग-होय.

वसंत–तर मग आमच्या विवाहसमारंभाची शोभा तुमच्या विवाहानें फारच वाढेल.

तरंग–पण हे कोण आले ? कलहंस, सारिका, आणि हा कोण ? वहावा ! हा तर आपला मेघनाद !

[**कलहंस. सारिका, व मेघनाद प्रवेश करतात.**]

वसंत–कलहंसा, मेघनादा, या असे. मृणालिनि, हे माझे मणिपुरांतील मित्र आहेत.

मृणालिनी–असें का ? महाराज, हें घर आपलेंच आहे असें समजावें.

कलहंस–वसंता, पूर्वी इकडे येण्याचा माझा बेत नव्हता. परंतु वाटेंत हा मेघनाद भेटला त्यानें इकडे यावयाचा फारच आग्रह केला. मग माझ्यानें नाहीं म्हणवेना.

मेघनाद–होय, मीं आग्रह केला व त्याला तसें कारणही होतें. कलहंस वाटेंत भेटल्यास त्याला घेऊन वसंताकडे जा, असें मला धनदत्तानें सांगितलें होतें; आणि त्यानें तुला हें पत्र दिलें आहे. [पत्र देतो.]

वसंत–हें पत्र उघडण्यापूर्वीच मला सांग–माझा धनदत्त खुशाल आहे ना ?

मेघनाद–त्याला शारीरिक यातना नाहींत एवढेंच ! पण त्या पत्रावरूनच त्याची स्थिति तुला कळून येईल.

तरंग–विशाखे, त्या सारिकेचें स्वागत कर. मेघनादा, मणिपूरची काय हकीगत ? सार्थवाह धनदत्त खुशाल आहे ना ? येथें आम्ही पूर्णपणें विजयी झालों हें ऐकून त्याला फार आनंद होईल. मेघनादा, आमच्या कामांत येथें आम्हाला पूर्ण यश आलें.

मेघनाद–आणि धनदत्ताला मणिपुरांत पूर्ण अपयश येत चाललें आहे.

वसंत—(स्वगत) झाला, आतां मात्र दुर्दैवाचा कडेलोट झाला. मी पूर्वी तर्क केल्याप्रमाणें आज संकटाची परमावधि झाली—

[कन्या ही अन्याची०]

सीमा दुर्दैवाची । प्राप्त जहाली ही साची ॥धृ०॥
व्यसनहुताशनिं अधमानें म्यां आहुति दिधली सन्मित्राची ॥ १ ॥

(सचिंत बसतो.)

मृणालिनी—(स्वगत) त्या पत्रांत कांहीं तरी अनिष्ट बातमी आहे. हाय हाय !

[जन खुळावले०]

हृदय कांपतें । विकल । परम तापतें ॥ धृ० ॥
प्रियतममुख हो विवर्ण । नयनहि हे बाष्पपूर्ण ॥ १ ॥
हाय पत्रिका अनिष्ट । करित तरी काय कथन ॥ २ ॥

छेः, आतां नाहींच धीर धरवत. (जवळ जाऊन) असें काय बरें करावयाचें ? त्या पत्रांत काय आहे तें मला कळवावेंच.

[सुटला पितृदिशेचा०]

सखया अर्धांगी मी अपुली । मति कां संकटिं ऐशी पडली । जें दुःखसौख्य वा अपुणा द्याया सजली । पत्रिका; तदर्ध न मदीय कां या कालीं ॥ १ ॥

वसंत-मृणालिनी, काय सांगूं ?-

[जंगला-धुमाळी.]

विकल करी बहु मज हें सखये पत्र अहा ॥ धृ० ॥

शद्व असति जे सृजिले जगिं या । त्यांतिल खरतम
हे या समया । सायकसे भेदुनियां हृदया जाति पहा
॥ १ ॥ अमृतसेवनीं रत जों होई । तों पडलों सहसा
विषडोहीं । हाय कशी निष्ठुरता विधिची चंड
महा ॥ २ ॥

सुंदरि, प्रथमभेटीच्या वेळीं मीं तुला सांगितलेंच आहे कीं, मजजवळ माझें उच्चकुल–व आत्मस्तुतीचा दोष आला तरी सांगतों–माझें सच्छील ह्यांशिवाय दुसरी संपत्ति कांहीं नाहीं. मजपाशीं संपत्ति नाहीं हें सागण्यांतही मीं बढाई मारीत होतों. त्या वेळींच मीं तुला सांगावयाला पाहिजे होतें कीं, मजपाशीं स्वतःची संपत्ति तर कांहीं नाहीच, परंतु उलटा मी दुसऱ्याच्या ऋणांत आहें ! तुझ्या प्राप्तीसाठीं मीं येथें आलों या सफरींच्या खर्चासाठीं मीं माझ्या प्राणप्रिय मित्राकडून–छे छे–त्या मित्राच्या कट्टया शत्रूकडून त्याच्या नांवावर बरीच रकम कर्जाऊ घेतली आहे, आणि या कृत्यांत त्या माझ्या मित्राची मान फांसांत अडकवून ठेवली आहे ! हें पहा त्याचें पत्र. हा कागद माझ्या मित्राचा जणुं देहच आहे असें मला वाटतें; आणि त्यांतील प्रत्येक अक्षररूपी जखम त्याच्या शरीरांतील जीवनहेतु अशा रक्ताच्या चिळकांड्याच्या चिळकांड्या बाहेर टाकीत आहे असें मला भासत आहे ! मेघनादा, हा सर्व वृत्तांत खरा कायरे ? धनदत्तानें व्यापारांत घातलेला सर्व पैसा एकदम बुडाला ? त्याचें एकही गलबत सुरक्षित परत आलें नाहीं का ? सिंहलद्वीप, मोहद्वीप, बलभद्र, ब्रह्मराष्ट्र इत्यादि देशान्तरीं गेलेलीं सर्वच गलबतें बुडालीं काय ? समुद्राच्या आणि खडकांच्या तडाक्यांतून एकही गलबत निभावलें नाहीं ?

मेघनाद–छे, एकही निभावलें नाहीं. आणि आतां धनदत्ताच्या हातांत पैसा येऊनही कांहीं उपयोग नाहीं. कारण तो दुष्ट बौद्ध आतां पैसा घेणार नाहीं. एखाद्या मनुष्याचा पूर्णपणें विनाश करण्यास अत्यंत उत्सुक असा मनुष्यरूपानें संचार करणाऱ्या प्राण्यांत तरी या शक्तिनाथासारखा कठोर व दुष्ट प्राणी दुसरा कोणी असेल असें मला वाटत नाहीं. तो थेरडा, पद्मनाभमहाराजांचें रात्रंदिवस डोकें उठवीत आहे. तो ह्मणतो कीं, " तुमच्या राज्यांत जर मला न्याय मिळाला नाहीं, तर मी इतर राष्ट्रांत जाऊन त्या बद्दल डंका पिटीन, आणि कोणत्याही मनुष्याला मणिपुरांत योग्य न्याय मिळेल असें जें वचन तुह्मीं इतर राष्ट्रांना दिलें आहे तें मोडलेंत असें चोहोंकडे सांगून तुमच्या राज्यावर संकट आणल्यावांचून कधींही राहणार नाहीं. " पुष्कळ मोठमोठे व्यापारी, मोठमोठे सरदार, कामगार व स्वतः महाराजही धनदत्तासाठीं मध्यस्थ पडले. पण तो कठिणहृदयाचा बौद्ध कांहीं केल्या ऐकत नाहीं. तो आपला न्यायच पाहिजे ह्मणून हट्ट घेऊन बसला आहे !

सारिका–बाबा त्या दिवशीं भैरवाजवळ ह्मणत होते कीं, कर्जाच्या वीसपट रकम जरी धनदत्तानें दिली, तरी ती मी घेणार नाहीं. त्याचें मांसच कापून घेईन. आणि मी पक्कें जाणतें कीं, कायद्यानें किंवा महाराजांनीं मनावर घेतलें नाहीं, तर धनदत्तांना फार फार कठिण जाईल.

मृणालिनी–अगबाई, हा सावकार तर अगदीं पाषाणहृदयी मांग दिसतो आहे–

[मज हर दे त्वरित०]

मम मन धरि हीच भावना । गमे खरा, नरदनुज

तो, अतुल यातना देइ जो जना ॥ धृ० ॥ काल
कराल जगत्संहरणा । कीं ही असियोजना । करुनि
करित शासना ॥ १ ॥

हे धनदत्त आपले मोठे स्नेही आहेत काय ?

बसंत–प्रिये, मोठे स्नेही म्हणून काय विचारतेस ? पदार्थ आणि त्याचे गुण यांच्यांत जितकी स्निग्धता असते, त्यापेक्षांही आम्हा दोघांत अधिक स्नेह आहे. त्याला उपमाच नाहीं. अहाहा ! सुंदरि, माझ्या मित्राची योग्यता तुला काय सांगूं ? मजवर त्याचें किती प्रेम !–

[महती प्रयासीं युद्ध०]

जो विषम तशा सम समयीं प्रेम सम करी ।
अर्पी मज सर्वकाल प्रणयमाधुरी ॥ धृ० ॥
जे सच्चरितीं भूषविती सुजन ही रसा ।
मन्मित्र शोभतो तयांत मुख्य हीरसा ।
निजकाय सदा झिजवितसे परहितोद्यमीं ।
तो विमल यशोद्युतिनें निज दशदिशा भरी ॥ १ ॥

मृणालिनी–त्या बौद्ध सावकाराची त्यांनीं किती रकम देणें आहे ?

बसंत–त्यांनीं कसली ?–मींच देणें आहे. तीन हजार मोहोरा.

मृणालिनी–एवढीच ना रकम ? त्याला सहा हजार मोहोरा द्या आणि तो रोखा फाडून घ्या. तेवढ्यानें तो ऐकत नसेल, तर त्याला बारा हजार द्या. माझ्या प्रियकरामुळें अशा तऱ्हेचा मित्र जर संकटांत पडत असेल तर त्या बौद्ध सावकाराला मूळ रकमेच्या दसपट वीसपटही रकम द्या.

(वसंतास) आपणास येथें रहाणें आतां योग्य होणार नाहीं. आजच्या आज विवाहाच्या अक्षता पडल्या कीं आपण तावडतोब मणिपुरास जावें. आपला मित्र प्राणसंकटांत पडला आहे, अशा स्थितींत आपण विलास आणि सोहाळे भोगावे, असें या मृणालिनीस कधींही वाटणार नाहीं. त्या क्षुल्लक कर्जाच्या वीसपट रकम आपल्या जामदारखान्यांतून घेऊन जावी आणि कर्जाचा निकाल लागतांच आपल्या त्या प्रियमित्राला घेऊन येथेंच यावें. विवाहाच्याच दिवशीं आपणाला जावें लागत आहे; पण त्याला उपाय नाहीं. मी अजाण अबला आपणाला आणखीं काय सांगणार ? पण धीर सोडूं नका एवढेंच सांगतें. परमेश्वर आपणाला पूर्ण यश देईल. पण आपण आपल्या मित्राचें पत्र वाचावें; त्यांत काय आहे तें मला ऐकूं द्या.

वसंत–(वाचतो) " मित्रा वसंता, माझीं सर्व गलबतें बुडालीं. माझे सावकार निर्दय झाले आहेत. माझी सांपत्तिक स्थिति अति नीच झाली आहे. आणि शक्तिनाथाचा रोखा मुदतीबाहेर गेला आहे. त्या रोख्यांतील अट मला आतां पुरी करणें भाग आहे; आणि ती अट पुरी करावयाची ह्मणजे मी परलोकाचा मार्ग धरावयाचा ! माझ्या अन्तसमयीं फक्त तुझें मला दर्शन झालें, ह्मणजे तूं माझें जें कांहीं देणें आहेस तें मला पोंचलें असें मी समजेन. परंतु तुझ्या सुखांत मी व्यत्यय आणावा हें योग्य नाहीं. तुला योग्य दिसेल तसें कर. या पत्रामुळें तुझ्या सुखांत व्यत्यय यावा असें मी इच्छित नाहीं. "

मृणालिनी–तर त्वरा करून आजच्या आज निघा.

वसंत–हें तूं मला सांगावयाला का पाहिजे !–

[साकी]

प्राणांहुनीही प्रियतर ऐसा मित्र संकटीं पडतां ।

प्रणयविलासादिक मज भामिनि रुचतिल कैचे आतां ।
शरसम जाउनियां । करितों दुःखविमुक्त तया ॥ १ ॥

[जातात.]

प्रवेश तिसरा.

(मणिपुर–रस्ता.)

[शक्तिनाथ, मेघकांत, धनदत्त व फौजदार येतात.]

शक्तिनाथ–फौजदार, याच्यावर चांगली नजर ठेवा. दयेचें अगदीं नांवसुद्धां काढूं नका. लोकांना बिनव्याजी पैसे देणारा तो हाच मूर्ख नव्हे का ? फौजदार, अगदीं सक्त नजर ठेवा बरें.

धनदत्त–शक्तिनाथ, माझें ह्मणणें ऐकून तर घे.

शक्तिनाथ–छे ! छे ! अगदीं बोलूं नकोस. मी रोख्यांतली अट पुरी करून घेणार ! मी तशी शपथ वाहिली आहे. कांहीं कारण नसतां तूं माझी निंदा करीत असस, मला कुत्रा ह्मणत असस, नाहीं का ? आतां हाच कुत्रा तुझी कशी दुर्दशा उडवून देतो तो पहा. फौजदार, तुह्मी तरी किती अडाणी अहां हो ? हा सांगतो आणि तुह्मी त्याला कैदेंतून इकडे आणतां; आणि हा पळाला तर ?

धनदत्त–शक्तिनाथ, माझें ह्मणणें तर ऐक–

शक्तिनाथ–मी रोख्यांतली अटच पुरी करून घेणार. तुझें बोलणें ऐकून घ्यावयाला मी येथें आलों नाहीं. मी माझी अटच पुरी करून घेणार. तुझ्या विनवणीचा मजजवळ कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, तुझी दया येऊन डोळ्यांतून पाणी काढणारा मनुष्य मी

नव्हे, समजलास ? तुझें बोलणें मी मुळींच ऐकून घेत नाहीं. मी माझी अटच पुरी करून घेणार. [जातो.]

मेघकान्त–या शक्तिनाथासारखा पाषाणहृदयी मांग या सगळ्या पृथ्वींत पाहूं जातां कोणी मिळणार नाहीं !

धनदत्त–जाऊं दे. त्याची व्यर्थ प्रार्थना करून तरी काय करावयाचें आहे ? त्याचा हेतु काय तो मला पूर्णपणें माहीत आहे. माझा जीव घेण्याचाच त्याचा निश्चय आहे. त्याच्या तडाक्यांत सांपडलेले दीन लोक मीं पुष्कळ वेळां सोडविले आहेत ह्मणून त्याच्या डोळ्यांत मी इतका सलतों आहें.

फौजदार–धनदत्त महाराज, आपल्यावर हा प्रसंग आणण्यांत माझ्या हातून या थेरड्या बौद्धाला मदत होते आहे, यापेक्षां मी आधींच मरून जातों तर फार बरें झालें असतें.

धनदत्त–फौजदार, तुह्मी आपलें कर्तव्य बजावीत आहां, यांत तुमच्याकडे काय दोष ?.

मेघकांत–आपले महाराजसाहेब याला ही भयंकर अट पुरी करून घेऊं देतील असें मला वाटत नाहीं.

धनदत्त–महाराज फारच दयाळु आहेत. परंतु त्यांचा तरी येथें काय उपाय ? माझ्यासाठीं त्यांना कायद्याचें उल्लंघन करतां येणार नाहीं. या मणिपुरांत परकीयांनासुद्धां योग्य तो न्याय मिळेल असें महाराजांचें इतर राष्ट्रांना वचन गेलेलें आहे. हें वचन जर मोडलें गेलें, तर दुसऱ्या राष्ट्रांत गवगवा होऊन मणिपुरच्या राज्याचा दुर्लौकिक होईल आणि इतर राष्ट्रांकडून मणिपुरच्या व्यापारास धोका आल्याखेरीज रहाणार नाहीं; आणि मणिपुर तर इतर देशांबरोबरच्या व्यापारावर बहुतांशीं अवलंबून आहे.

या व इतर चिंतेमुळें मी हलीं इतका निःशक्त झालों आहें कीं, शक्तिनाथानें अच्छेर मांस माझ्या शरीरांतून काढून घेतल्यावर मी जीवंत राहणें मुळींच शक्य नाहीं. मी मरणाला मुळींच भीत नाहीं; फक्त मरतांना माझ्या वसंताचें मुख पाहून मरावें एवढीच माझी इच्छा आहे–परमेश्वरा–

[गारा–दादरा.]

मित्रसन्निधींमधींच मरण ये मला जरी ।
मोक्षलाभ मानिन मी मजसि जाहला तरी ॥ध्रु०॥
प्रबलेच्छा हीच एक जगांतिं राहिली असे ।
किमपि मनोवांच्छित मम अन्य याहुनी नसे ।
मित्रकार्य साधनार्थ मरण मजसि येतसे ।
धन्य खरा मीच, दिव्यलोक काय मज दुरी ॥१॥

(जातात.)

प्रवेश चौथा.

(रत्नपुर–मृणालिनीच्या वाड्यांतील एक दिवाणखाना.)

[मृणालिनी, विशाखा, कलहंस, सारिका आणि मुकुल.]

कलहंस-ताईसाहेब, मी तुमच्यासमक्ष बोलतों आहें, म्हणून माझें बोलणें हांजीहांजीचें आहे असें मानूं नका. खरेंच सांगतों, धनदत्त आणि वसंत यांमधील अति विलक्षण व अपूर्व मैत्रीची कल्पना तुम्हाला व्हावी तशी योग्य तऱ्हेनें झाली आहे. आणि म्हणूनच विवाहाचेच दिवशीं तुमचे पतिराज त्वरेनें निघून गेले

असतांही हा वियोग तुम्हीं धैर्यानें सहन करीत आहां. ज्याच्या बचावासाठीं बसंताला एवढी मोठी रकम देऊन तुम्हीं मणिपुरास पाठविलें आहे, तो किती धीरोदात्त, उदार अन्तःकरणाचा पुरुष आहे, व त्याच्यांत आणि तुमच्या यजमानांत किती विलक्षण तऱ्हेचा प्रेमभाव वसत आहे, हें सर्व तुम्हाला समजेल तर इतर साधारण लोकांवर उपकार केल्यापासून जो तुह्माला आनंद होतो, त्यापेक्षां किती तरी आनंद या कृत्यानें तुम्हाला होईल, आणि अशा या कृतीबद्दल तुम्हाला अभिमानही वाटेल.

मृणालिनी—सत्कृत्यापासून मला नेहमींच आनंद होतो. धनदत्तांशीं जरी माझा मुळींच परिचय नाहीं तरी त्यांच्या स्वभावानें वगैरे मला अनुमान करतां येतें—कारण—

[मज बोध करी०]

जे मित्र असति बद्ध समप्रणयबंधनीं ।
अन्योन्यसंगमीं जयांस सौख्य हो मनीं ॥ धृ० ॥
ते स्वभावशीलरूपरुचिवयोगुणीं ।
समचि असति अनुभव हा होय या जनीं ॥ १ ॥

या न्यायानें, ज्या अर्थी धनदत्त माझ्या वल्लभाचे प्राणप्रिय मित्र आहेत, त्या अर्थी ते रूप, वय, स्वभाव इत्यादिकांत माझ्या प्रियकराप्रमाणेंच असले पाहिजेत. आणि म्हणूनच माझ्या प्रियांच्या मित्राला त्या नरकयातनांतून सोडविण्यासाठीं जी कांहीं मी मदत केली आहे ती फारच अल्प आहे. पण हें जवळ जवळ आत्मस्तुति केल्याप्रमाणें होत आहे; हें पुरें झालें आतां कलहंसजी, आपणास कांहीं मला सांगावयाचें आहे. मणिपुराहून मंडळी येईपर्यंत आपण व सारिकाबाई मिळून या वाड्यांतील सर्व

व्यवस्था पहावी. येथून चार पांच कोसांवर श्रीजगदंबिकेचें एक प्रसिद्ध जागृत स्थान आहे; तेथें जाऊन धनदत्तांची या संकटांतून मुक्तता व्हावी ह्मणून, मी व विशाखा मिळून देवीची सेवा करण्याचा संकल्प केला आहे. मणिपुराहून माझे प्रियकर यावयाच्या पूर्वींच आह्मी येथें येऊं; तोंपर्यंत आपण येथील व्यवस्था पहावी. ही माझी विनंति आपण अमान्य करूं नये. अगदीं जरूरच पडली ह्मणून ही तसदी आपणास देत आहें.

कलहंस–ताईसाहेब, आपली आज्ञा मी अमान्य कशी करूं ? येथील व्यवस्था पाहण्याचें काम मी आपणावर घेतों.

मृणालिनी–येथील सेवकांना मी सांगून ठेवलेंच आहे. ते आपणास माझ्या प्रियाच्या जागीं व सारिकाबाईस माझ्या जागीं मानतील. बरें, आह्मी जातों आतां.

सारिका–आपण कांहीं काळजी करूं नका. आपल्या मनाप्रमाणें सर्व कांहीं घडून येईल.

कलहंस-बरें तर आह्मी जातों. आपली व आपल्या प्रियकराची इच्छा पूर्ण होवो ! (सारिका व कलहंस जातात.)

मृणालिनी–मुकुला, आजपर्यंत तूं माझीं अनेक कामें इमानानें बजाविलीं आहेस, त्याप्रमाणेंच आतां मी एक सांगतें तें कर. हें पत्र घेऊन अतिशय त्वरेनें कांचनपुरास जा आणि तेथें उपेंद्रनाथ नांवाचें मोठे प्रसिद्ध वकील आहेत–ते माझे मामेभाऊच आहेत–त्यांना हें दे आणि ते मला पत्र व कांहीं जिनसा देतील त्या घेऊन त्वरेनें परत ये. मात्र एका प्रहराच्या आंत ये. मी तुझी अगदीं वाट पहात आहें. तूं येतांच मी माणिपुरास जावयाला निघणार आहें. होईल तितकी त्वरा करून लौकर परत ये. उगीच कोठें बोलण्यांत

वेळ घालवूं नको. जा, गाडी जोडून तयार असूं दे, ह्मणून खालीं हुकूम देऊन जा.

मुकुल–अगदीं त्वरेनें काम करून येतोंच सरकार. (जातो.)

मृणालिनी–विशाखे, मी एक बेत योजिला आहे. आपण आतांच आतां मणिपुराला निघावयाचें. चल तयारी कर.

विशाखा–पण वसंतराज काय म्हणतील ? आणि तेथें जावयाचें तरी कशाला ?

मृणालिनी–ते आपल्याला कांहीं ओळखणार नाहींत. तेथें जावयाचें तें पुरुषाच्या वेषानें जावयाचें समजलीस ? आपण दोघींनीं पुरुषाचा वेष घेतला तर आपणा दोघांत मीच चांगली दिसेन नाहींग ? आतां आपणांत जे गुण नाहींत ते आणले पाहिजेत. स्त्रीजातीला नैसर्गिक जी भीरुता ती आपणाला टाकली पाहिजे; आणि शौर्याची ऐट आणली पाहिजे. बोलण्यांत कर्कशता आणि घोगरेपणा आणला पाहिजे. व थेट पुरुषांसारखी भाषा बोललें पाहिजे. बोलण्याचालण्यांत शिथिलता उपयोगी नाहीं. मुग्धता टाकून वाचालता धरली पाहिजे. गजगमन सोडून देऊन ऐटीनें भराभर चाललें पाहिजे. " अमुक स्त्री मजवर अनुरक्त झाली होती पण तिला मी झिडकारलें; आणि त्यामुळें ती बिचारी कृश होऊन परलोकवासी झाली. " अशासारख्या लटक्याच थापा मारिल्या पाहिजेत ! याप्रमाणें आपण नेहमीं पुरुषांच्या आचरणांत पहातों त्या गोष्टी आतां आपणाला आचरिल्या पाहिजेत.

विशाखा–पण ताईसाहेब, पुरुषाच्या वेषानें तेथें जाऊन आपण करावयाचें तरी काय ?

मृणालिनी–माझा सर्व बेत मी तुला गाडींत बसल्यावर सांगेन.

तूं तयारी कर जा. [विशाखा जाते.] पण माझ्या प्रियाच्या मित्राची सुटका करण्यासाठीं योजलेला हा बेत सिद्धीस जाईल का ?

[जो पिया आयेना०]

धरिं जें कार्य तें। हातीं। जाइ काय सिद्धतें।
येइ चित्तीं। प्रदीप्तीं। अशी ती। शंका ॥ धृ० ॥
काय होइन क्षम मी कठिण अशा या कार्या।
नाहिं अनुभवही मजसी दुष्ट जगाचा या।
परि ईशातें। या समयातें। हृदिं वाहातें॥ १ ॥

हे दीनदयाळा प्रभुवरा,—

[तुजवांणें कुणाला०]

विनवीते तुला ही तव दीन कन्यका।
तूं असासि सदय दीनबंधु भुवनपालका ॥ धृ० ॥
पतिमित्र संकटीं पडे तयासि उद्धरीं।
समर्थ हें करावया असेल अन्य का ॥ १ ॥

(जाते.)

प्रवेश पांचवा.

(मणिपुर—कारागृह.)

(धनदत्त एकटा बसला आहे.)

धनदत्त—भयंकर अवर्षण पडून देशांत जिकडे तिकडे हाहाकार उडाला असतां लोक ज्या उत्कंठेनें पर्जन्याची मार्गप्रतीक्षा करीत असतात, त्यापेक्षां किती तरी अधिक उत्कंठेनें मी माझ्या प्रिय वसंताची वाट पहात आहें ! कामिजनांच्या विरहोत्कंठेचें वर्णन कवि

पुष्कळ वेळां अतिशयोक्तीनें करीत असतात. परतु माझ्या मनांत प्रतिक्षणीं जी उत्कंठा वाढत आहे, तिची अल्प कल्पना जर त्यांना आली तर त्यांना माझ्या स्थितीचें वर्णन कामी दंपत्याच्या विरहावस्थेच्या वर्णनापेक्षां किती तरी हृदयद्रावक करावें लागेल. बालपणापासून माझ्या प्रियमित्राचा वियोग मला फारसा ठाऊक नाहीं आणि त्यामुळेंच हा वियोग माझ्या हृदयास शल्यासारखा टोंचीत आहे. या जगांत मला आतां आजचाच दिवस काढावयाचा आहे. उद्यां तो शक्तिनाथ माझ्या शरीरांतील अच्छेर मांस काढून घेईल आणि उद्यांचा दिवस हा माझ्या आयुष्याचा शेवटचा दिवस होणार ! अंतसमयीं देखील माझ्या मित्राचें मुख मला दिसूं नये, असें मीं पूर्वजन्मीं कोणतें पातक केलें होतें ? हे दयाघना प्रभो–

[जोगी–धुमाळी]

कां करिसि विभो रोषा । निष्ठुर होसि कसा ॥ धृ० ॥
उचित असे का विभुवर तुजला कृति ही क्रूर नितांत ।
करुणावरुणालय तूं तात, मम कां अंत बघसी हा ॥ १॥
प्रियसुहृदंकीं निजशिर ठेवुनि सोडावे स्वप्राण । अंतिम
हेतु असे हा जाण, कांहिं न अन्य, पुरवी यास ॥ २ ॥

मला मरणाची भीति मुळींच वाटत नाहीं. यापुढें जगून मी काय पराक्रम करणार आहें ? आज नाहीं उद्यां, मला मरण हें येणारच. " जातस्यहि ध्रुवो मृत्युः " हें कधींही टळावयाचें नाहीं–

[हा सकल देह रक्तचंदनें०]

हे प्राण खचित एक दिनीं काल हरिल तो ।
जो सकल जन लोकीं समचि पाहतो ॥ धृ० ॥
मित्रकार्य साधाया । पडते मम ही काया ।

सुकृतपुण्य जगतीं या । अमित जोडितों ॥ १ ॥
श्रेयस्कर मनुजातें । मरण होय अन्य न तें ।
आयु शतावधि असतें । अधिक काय तों ॥ २ ॥

मेघनादाला रत्नपुरास पाठवून बराच कालावधि झाला. मग वसंताला यावयाला विलंब कां लागावा ? कदाचित् माझ्या उत्कंठेमुळें मला विलंब वाटत असेल. मी असा संकटांत पडलों असतां, तो तिकडे विलास भोगीत असेल असें प्रत्यक्ष परमेश्वरानें जरी सांगितलें, तरी मला तें खरें वाटणार नाहीं. वसंत आल्याबरोबर त्याला येथें पाठवून देतों असें मला फौजदारांनीं सांगितलें आहे. (वसंत घाईनें प्रवेश करतो.) वसंता, आलास ? आतां मात्र मी सुखानें मरेन.

वसंत–मित्रा, मित्रा, काय हें मी ऐकतों व पहातों आहें !–

[दृष्टि भरे जलभारें०]

काय स्थिति वपुची ही, पाही, तव होई,
लवलाही, तत्तेज न उरलें कांहीं ॥ धृ० ॥
या अधमानें स्वहितास्तव तुज लोटुनि
दिधलें दारुण दुर्गतिडोहीं ॥ १ ॥

धनदत्त–हां हां ! यांत तुझा कांहीं अपराध नाहीं–

[चाल सदर]

भालीं मम जें विधिनें लिहिलें, भोगितसें तें,
दोष लवहि तव नाहीं ॥ १ ॥

तुझी मी अगदीं चातकाप्रमाणें वाट पहात होतों.

वसंत–धनदत्ता, या तुझ्या नरकयातनेस मीच अभागी कारण आहें–

[स्वर्गी सर्व पितर०]

मित्रा क्लेश असे भोगिसि हे या अधमासाठीं। नीच असे का मजसम कोणी वितत अशा या धरणीवरती ॥ धृ० ॥ जन्मापासुनि मजवरि ज्याचे उपकार अहा अमितचि होती। त्या स्वजनोत्तम मित्रवरातें वधार्थ दिधलें दनुजाहातीं ॥ १ ॥ जन्मतांचि कां नाहीं हरिलें। या अधमातें अदयें कालें। मन्निधनानें नच कीं होती खचित जगाची हानिहि मोठी ॥ २ ॥

जें तो निर्दय काल करावयास चुकला, तें मी स्वतःच करून टाकतो पहा. [तरवार उपसून भोसकूं लागतो.]

धनदत्त– [तरवार धरून] हां हां! वसंता, इतका जीवावर उदार कां झालास? त्या शक्तिनाथाच्या द्वेषाला मी बळी पडलो तर त्यांत तुझा दोष काय? या रीतीनें नाहीं, तर दुसऱ्या रीतीनें आपला सूड तो घेताच घेता. बरें पण रत्नपुरचें काम फत्ते झालें ना?

वसंत–फत्ते झालें–पण–

धनदत्त-आतां मला मरण आलें तरी कांहीं चिंता नाहीं.

वसंत– [आवेशानें] हा वसंत जीवंत असतां तो शक्तिनाथ तुझा बळी घेणार?

[लो चोरी खुली०]

हें जीवित अर्पिन आधीं। त्वद्लकलघुलवनाशापूर्वीच। निश्चित हें मम मत ॥ धृ० ॥ तवोपकृतिभरनिबद्ध होई दास जाण सुहृदा हा संतत ॥ १ ॥

[पडदा पडतो.]

अंक चौथा.

प्रवेश पहिला.

(मणिपुर—न्यायसभा.)

[पद्मनाभ महाराज, इतर दरबारी, धनदत्त, वसंत, तरंग, मेघनाद, सेवक व इतर प्रेक्षक.]

पद्मनाभ–धनदत्त आहेत का येथें ?

धनदत्त–होय सरकार; हा मी येथें आहें.

पद्मनाभ–तुह्मासाठीं मला फार वाईट वाटतें. एका पाषाणहृदयी मांगाच्या, वाघाच्या जबड्यांत तुह्मी सापडलां आहांत. दयेचा, मायेचा लेशही त्याला कसा तो माहित नाहीं.

धनदत्त–मीं ऐकिलें कीं, सरकारानीं माझ्यासाठीं त्या बौद्धाजवळ फारच रदबदली केली. सरकार–

[बिलावल—दीपचंदी.]

उपकृति झाली नरवर अपुली अमिताचि दीनावरि
या । दया कराया मजवरि केली विनति प्रस्तरहृ-
दया । द्रवला नच परि कठिनहृदय तो; शासन
नच जरि टळतें । न्यायपथानें; भोगायातें सिद्ध
असें मी यातें ॥ १ ॥

पद्मनाभ–अरे कोणी तरी जाऊन त्या बौद्धाला घेऊन या.

मेघनाद–तो पहा. आलाच तो सरकार.

[शक्तिनाथ येतो.]

पद्मनाभ–वाट सोडा. त्याला आमच्या समोर उभा राहूं द्या. शक्तिनाथ, सर्व लोकांना, तसेंच मलाही वाटतें कीं, हा द्वेषभाव तूं विनोदानें दाखवीत आहेस. आणि आह्माला असेंही वाटत आहे कीं, जितक्या क्रौर्यानें हा द्वेषभाव तूं दाखवीत आहेस, तितक्याच मृदुलतेनें या सर्वस्वी हतभागी झालेल्या धनदत्तावर तूं दया करशील. आणि जो तूं आतां या गरीब बिचाऱ्या धनदत्ताचें अच्छेर मांस मागत आहेस, तोच तूं अखेरीस तें न घेतां, दयार्द्र होऊन याला अर्धें मुद्दलही सोडशील, अशी माझी खात्री आहे. हा धनदत्त सर्वस्वी दुर्दैवाच्या फेऱ्यांत कसा सांपडला आहे पहा. याचा व्यापार बुडून हा कंगाल स्थितीला येऊन पोंचला आहे ! जो पूर्वीं सार्थवाह धनदत्त ह्मणून गाजत होता, तोच आतां अकिंचन धनदत्त झाला आहे ! या सज्जनाची ही अशी दीनावस्था पाहून प्रत्यक्ष पाषाणालासुद्धां पाझर फुटेल, मग तूं तर हाडामांसाचा मनुष्य आहेस. तर आतां त्याच्यावर कृपा करणार ना तूं ?

शक्तिनाथ–मला काय पाहिजे आहे तें महाराजांना मीं पूर्वींच कळविलें आहे. आणि रोख्यांतील अटच पुरी करून घेण्याबद्दल आमच्या परम पवित्र बुद्धमहाराजांच्या पायांची शपथ मीं घेतली आहे. जर तुह्मी मला न्याय देणार नसाल, तर पुढील संकटें भोगण्याला तयार व्हा. इतर राष्ट्रांना दिलेलें वचन मोड-ल्याबद्दल मणिपुरच्या राज्यावर संकट आणल्याशिवाय मी कधींही राहणार नाहीं. तुह्मी मला विचाराल, कीं तीन हजार मोहोरा न घेतां मनुष्याचें मांस घेण्यांत तुला फायदा तो काय ? आणि तें तूं कां घेतोस ? माझी खुषी, हेंच या प्रश्नाचें उत्तर. माझी खुषी ह्मणून तीन हजार मोहोरांवर लाथ मारून याच्या शरीरांतील

मांसच मी घेणार. मिळालें उत्तर तुह्माला ? माझ्या घरांत उंदीर झाले, आणि मला ते त्रास द्यावयाला लागले, ह्मणून प्रत्येक उंदीर मारावयाला मी पांच पांच हजार मोहोरा दिल्या, तर तुह्मी मला विचारणार कोण ? माझी खुषी आहे. मिळालें उत्तर तुह्माला ? असे कांहीं मनुष्य आहेत, कीं त्यांना कावळ्याचें कावकावणें मुळींच सोसत नाहीं. दुसरे कांही असे आहेत, कीं त्यांनीं मांजर पाहिलें पुरे, कीं त्यांच्या पायांची तिडीक मस्तकापर्यंत जाते. मनुष्यांची आवड, किंवा द्वेष यांना कांहीं कारणच पाहिजे असें नाहीं. आतांच मीं सांगितलेल्या कांहीं मनुष्यांना कावळ्याचें कावकावणें कां सोसत नाहीं, किंवा मांजर दृष्टीस पडलें असतां दुसऱ्यांच्या पायांची तिडीक मस्तकापर्यंत कां जाते, याला जसें कांहीं नियमित कारण सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच या धनदत्ताचा मी कां द्वेष करतों व त्या द्वेषामुळें माझें नुकसान होण्यासारखी ही फिर्याद मी कां घेऊन आलों आहें, यालाही कांहीं कारण सांगतां येणार नाहीं, व मी सांगणारही नाहीं. मिळालें तुह्माला उत्तर ?

वसंत–निर्दया, तुझ्या क्रौर्याचें समर्थन होण्याजोगें हें उत्तर नव्हे.

शक्तिनाथ–तुझ्या मनाजोगीं उत्तरें देण्यास मी कांहीं बांधलेला नाहीं.

वसंत–मनुष्यांना आवडत नाहीं अशा वस्तूचा ते नाशच करतात काय ?

शक्तिनाथ–नाश करावा असें वाटत नाहीं त्या वस्तूचा कोणी द्वेष करतो काय ?

वसंत–प्रत्येक अपराध पहिल्यानें द्वेषमूलक असतोच असें नाहीं.

शक्तिनाथ–सर्पाकडून दोनदां चावून घेण्याची इच्छा कोणाला असते काय ?

धनदत्त–वसंता, तूं शक्तिनाथाशीं वाद करीत आहेस हें तुझ्या लक्ष्यांत असूं दे. त्याच्याशीं वाद करणारा तूं–

[नच दृष्टिस पडती०]

प्रभंजनें संक्षुब्ध सिंधु जो घोर गर्जना करी। तयातें
शांतविसी यापरी ॥ १ ॥ क्रौर्य-दुष्टता त्यागायातें
व्याघ्रा उपदेशिसी। दुष्करा कृति तूं स्वीकारिसी
॥ २ ॥ ॥चाल ॥ जे चंड पवन कांपवी वृक्ष गिरि-
वरी। मज गमे कथिसी तूं तयांप्रती सत्वरी।
"वृक्षहो, हालवा शिर, न करा रव परी" ॥ चाल ॥
सकलहि दुर्घट कृति आचरिसी एकवेळ तूं जरी।
यश तुज येइ न येथें तरी ॥ ३ ॥

आणि याच्या दयेची अपेक्षा कशाला ?–

साकी [धन ज्याजवळी स्त्री०]

वज्रविनिर्मितकठिनहृदय हा यातें करुणा कैची।
ईशावरि मम भार कशाला व्यर्थ याचना याची ॥१॥

वसंता, याला दया येण्याची आशा तूं सोडून दे. तुला माझी शपथ आहे. व्यर्थ आपणाला शीण करून घेऊं नकोस. त्याला आपली अट पुरी करून घेऊं दे. मी सर्व भार परमेश्वरावर ठेवून शासन भोगावयाला तयार आहें.

वसंत–शक्तिनाथ, तुझ्या तीन हजार मोहोरांबद्दल या सहा हजार घे.

शक्तिनाथ–त्या सहा हजार मोहोरांपैकीं प्रत्येक मोहोरेचे सहा

भाग केलेस आणि त्या प्रत्येक भागाबद्दल जरी तूं [illegible] एक एक मोहोर मोजलीस, तरी मी त्या घेणार नाहीं. मी माझी अटच पुरी करून घेणार !

पद्मनाभ–तूं जर लोकांवर दया करीत नाहींस तर परमेश्वर तरी तुजवर कधीं दया करील काय ?

शक्तिनाथ–पण मी जर कांहीं अन्याय करीत नाहीं आहें, तर मला दयेची अपेक्षा काय? तुमचे पुष्कळ विकत घेतलेले दास आहेत. आणि वाटेल त्या घाणेरड्या व नीच कामांत तुह्मी त्यांचा उपयोग करून घेतां. कां ? तर तुह्मी त्यांबद्दल रोख पैसे मोजले आहेत म्हणून. त्यांना दास्यमुक्त करून तुह्मी आपल्या मुलींशीं त्यांचीं लग्नें कां करून देत नाहीं ? त्यांना ओंगळ आणि जड श्रम करावयास कां लावतां? आपल्याचप्रमाणें त्यांनां ताटावरून पाटावर आणि पाटावरून ताटावर अशा चैनींत कां ठेवीत नाहीं ? त्यांना आपल्याप्रमाणें अन्नवस्त्र कां देत नाहीं ? तुम्ही म्हणाल, 'ते आमचे आहेत आणि आम्ही वाटेल तसा त्यांचा उपयोग करूं.' आणि हेंच उत्तर मी तुम्हाला देतों. या धनदत्ताचें अच्छेर मांस जें मी मागतों आहे, तें मीं बरीच रक्कम मोजून विकत घेतलें आहे. तें माझें आहे, तें मला पाहिजे, आणि मी त्याचा वाटेल तो उपयोग करीन. तें तुम्ही मला नाकारीत असाल, तर पुढील परिणाम भोगण्यास सिद्ध व्हा. मणिपुरच्या राजाच्या वचनाची किंमत उकिरड्यावरील कचऱ्याइतकीच मग समजली जाईल. मला न्याय पाहिजे आणि त्या करतांच मी आलों आहें. बोला, मला तुम्ही न्याय देतां कीं नाहीं ?

पद्मनाभ–या भानगडीचे खटल्याचा न्याय करावयाला कांचनपुरचे जगद्विख्यात वकील उपेंद्रनाथ यांना मीं बोलाविलें आहे;

ते येईपर्यंत खटल्याचा निकाल मला कांहीं सांगतां येणार नाहीं.

मेघनाद–कांचनपुराहून उपेंद्रनाथ वकिलकांहून पत्र घेऊन आलेला मनुष्य बाहेर उभा आहे.

पद्मनाभ–त्याला आंत बोलावा. पत्र काय आहे तें पाहूं. [मेघनाद जातो.]

वसंत–धनदत्ता, असा भितोस काय?–

[भूप-झंपा.]

धैर्य हृदयीं धरी विकल मन आवरी ।
होउं दे लवभरि न वृत्ति तव बावरी ॥ धृ० ॥
व्यसननग मेरुसम चंड जरि कोसळे ।
धीरमति अणुहि नच चंचला हो तरी ॥ १ ॥
विषमसमयांतरिंच धीर धैर्या धरुनि ।
संकटें सकलहि वारितो बहु दुरी ॥ २ ॥

माझ्याकरतां तुझ्या शरीरांतील रक्ताचा एक बिंदु पडण्यापूर्वी या वसंताचें सर्व शरीर विच्छिन्न होईल.

धनदत्त–असें कां म्हणतोस? तुझ्यापेक्षां मरणाला मीच योग्य आहें. तुला अजून स्त्रीपुत्रसुखादि भोगवयाचें आहे. माझें काय? मी जीवंत राहिलों काय आणि मेलों काय? एकच. त्यांतल्या त्यांत तुजसारख्या मित्रासाठीं मला मरण येत आहे, हे मी ईश्वराचे उपकारच मानितों. वृक्षावरील निःसत्त्व व कुजकें फळ अगोदर पतन पावतें; या न्यायानें मलाच अगोदर मरण योग्य आहे. माझ्या पाठीमागें तूं सुखानें आपल्या प्रियेसह संसारयात्रा करावीस एवढेंच तुला माझें सांगणें आहे.

(विशाखा वकिलाच्या कारकुनाच्या वेषानें येते.)

पद्मनाभ–तुम्ही कांचनपुराहून उपेंद्रनाथ वकिलांकडून आलांत काय ?

विशाखा-होय सरकार. उपेंद्रनाथांनीं हें पत्र दिलें आहे. (पत्र देते.)

तरंग–(शक्तिनाथास) तो हातांतला सुरा अगदीं मोठ्या उत्सुकतेनें कशाला पाजळतो आहेस ?

शक्तिनाथ–त्या भिकारड्या धनदत्ताच्या शरीरांतलें मांस कापून घ्यावयाला. समजलास ?

तरंग–शिव शिव ! तूं मूर्तिमान् निर्दयता आहेस. तुझा तो धर्म " अहिंसा परमो धर्मः " " अहिंसा परमो धर्मः " म्हणून मोठ्यानें रडतो आहे, त्याकडे कांहीं लक्ष दे. तुझ्या द्वेषापुढें प्रत्यक्ष अग्नि शीतल वाटेल. तरवारीची धारही तुझ्या क्रौर्यापेक्षां कमी तीक्ष्ण भासेल. तुझ्या कठिण हृदयाला पाझर फोडणारे शब्दच अस्तित्वांत नाहींत काय ?

शक्तिनाथ–खरोखरच नाहींत. त्यांतून तुजपाशीं तर मुळींच नाहींत. माझ्या व्यवहारांत मी धर्माची पर्वा मुळींच करीत नाहीं समजलास ?

तरंग–तूं राक्षस आहेस का कोण आहेस ? तुला जीवंत ठेवण्यांत न्यायदेवता खरोखरच अन्याय करीत आहे. तुझें हें क्रूरपणाचें वर्तन पुनर्जन्माचें तत्त्व सिद्ध करून दाखवीत आहे. नीच श्वापदांनाही दुसऱ्या जन्मीं मनुष्यत्व येतें असें जें ह्मणतात, तें अगदीं खरें आहे, असें तुझ्याच उदाहरणावरून माझ्या पूर्ण निदर्शनास आलें. तुझा अघोर आत्मा मागील जन्मीं लांडग्याच्या

शरीरांत होता. सर्व जन्मभर क्रौर्याचीं कृत्यें केल्यावर त्या लांडग्याच्या आत्म्याला मनुष्यरूपानें संचार करण्याची इच्छा झाली. आणि तोच आत्मा या तुझ्या शरीरांत आहे. कारण, तुझें क्रौर्य लांडग्याचे किंवा वाघाचे क्रौर्यासारखेंच भयंकर आहे.

वसंत–नीचा, तूं अधमाधम आहेस–

[चापा स्मर धरी व्यर्थ०]

होसी सर्वथा निंद्य साचा ॥ धृ० ॥
तुजपुढें सकल खल । गमति ते विगतबल ।
स्वकृतिनें भासविसि निरयसा भूमितल ।
काय अवतार तूं राक्षसाचा ॥ १ ॥

शक्तिनाथ–ओरडा ! ओरडा ! अगदीं घसा कोरडा होईपर्यंत ओरडा ! कांहीं केलेंत तरी या रोख्यांतली अट कांहीं सुटत नाहीं. पुढें कांहीं आवेशाचीं भाषणें बोलावयाचीं असतील, तर नीट तयारी करून ठेवा; नाहींतर तीं नीट वठावयाचीं नाहींत. मी अट पुरी करून घेणारच.

पद्मनाभ–उपेंद्रनाथ या पत्रांत लिहितात कीं, एक विद्वान् वकील आपल्याकडे पाठविले आहेत. पण ते वकीलसाहेब आहेत कोठें ?

विशाखा–ते बाहेर उभे आहेत. आपण उपेंद्रनाथांबद्दल त्यांना येऊं देतां किंवा नाहीं याबद्दल त्यांना शंका होती.

पद्मनाभ–वहावा ! असें कसें होईल ? उपेंद्रनाथांनीं त्यांना पाठवून दिल्यावर आम्ही त्यांचा अनादर कसा करूं? अरे, तुह्मांतून कांहीं मंडळी त्यांच्या स्वागतार्थ जा आणि त्यांना सन्मानानें

आंत घेऊन या. तोंपर्यंत उपेंद्रनाथांकडून आलेलें पत्र हे कायस्थ सभेला वाचून दाखवितील.

कायस्थ–[वाचतो] "राजाधिराज पद्मनाभ महाराज, सेवेशीं–प्रणतिपूर्वक विज्ञापना विशेष–महाराजांकडून आलेली आज्ञापत्रिका पावली. परंतु या प्रसंगीं मी फार आजारी आहें. म्हणून मला महाराजांची सेवा करण्याचा हा सुप्रसंग दवडावा लागत आहे. महाराजांची पत्रिका पोंचली त्यावेळीं चंपावतीचे एक महाविद्वान् तरुण वकील मला भेटावयास आले होते. त्यांचें नांव अरविंद असें आहे. त्यांना महाराजांकडे जाण्याची विनंति केली. बौद्ध सावकार शक्तिनाथ व सार्थवाह धनदत्त यांच्या खटल्याची मीं त्यांनां चांगली माहिती करून दिली आहे. आम्ही दोघांनीं या खटल्यासंबंधीं पुष्कळ वादविवाद केला. आणि या दाव्याचे संबंधानें माझें मत काय आहे तेंही मीं अरविंदांना सांगितलें आहे. माझ्या मताला आपल्या विलक्षण विद्वत्तेची भर घालून ते या खटल्याचा योग्य तो निकाल करतील. अरविंदांसारखे महाविद्वान् वकील मी कोठेंच पाहिले नाहींत. त्यांच्या विद्वत्तेचा महाराजांना अनुभव येईलच. माझ्या अत्याग्रहावरूनच ते तिकडे जात आहेत. ते वयानें अगदीं तरुण आहेत, परंतु विद्येनें वृद्ध आहेत. इतक्या अल्प वयांत इतकी विद्वत्ता संपादन करणें म्हणजे मोठें आश्चर्य होय. त्यांच्याकडे या कज्ज्याच्या न्यायाचें काम महाराजांनीं खुशाल सोंपवावें. ते निकाल देतील त्यावरूनच त्यांची योग्यता सर्वांना कळेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना–महाराजांचा दासानुदास–

–उपेंद्रनाथ–"

पद्मनाभ–उपेंद्रनाथांचें पत्र सर्वांनीं ऐकलेंच आहे आणि हे पहा तेच तरुण वकील आले.

[मृणालिनी वकिलाचे वेषानें येते.]

या वकीलसाहेब, आपणाला उपेंद्रनाथांनीं पाठविलें काय ?

मृणालिनी-होय सरकार.

पद्मनाभ-या बसा असे. आजच्या या खटल्याच्या स्वरूपाची आपणास माहिती आहे ना ?

मृणालिनी-होय महाराज. उपेंद्रनाथांनीं मला पूर्ण माहिती करून दिली आहे. बरें, यांपैकीं धनदत्त कोणते आणि तो बौद्ध सावकार कोणता ?

पद्मनाभ-धनदत्त ते पहा. शक्तिनाथ असा पुढें ये.

मृणालिनी-तुझें नांव शक्तिनाथ होय ?

शक्तिनाथ-होय. माझें नांव शक्तिनाथ.

मृणालिनी-तूं आणलेल्या फिर्यादीचें स्वरूप चमत्कारिक आहे. परंतु तुझी फिर्याद कायद्यानें नाकारतां येणार नाहीं. धनदत्त, तुम्ही या शक्तिनाथाच्या कचाट्यांत सांपडले आहां म्हणावयाचें.

धनदत्त-होय. असें खरें.

मृणालिनी-तुम्ही रोखा कबूल करतां काय ?

धनदत्त-होय. मीच तो रोखा लिहून दिला आहे.

मृणालिनी-तर मग शक्तिनाथानें तुमच्यावर दयाच केली पाहिजे.

शक्तिनाथ-ती कां ? मला सांगा. दया करावयाला मी कांहीं कोणाचा बांधलेला नाहीं.

मृणालिनी-अरे दया कोठें बलात्कारानें येत असते काय ?-

[अरे अरे ओ बाकेमिया०]

करुणा ही बळें कधीं नच येते । ती अंतःकरणीं

स्वयेंचि रे उद्भवते ॥ १ ॥ नभांतुनी शीकरवृष्टी
जैशी । करुणा ही मधुरा शीतल बर्षे तैशी ॥ २ ॥
शुभद असे करुणा कारि जो त्यातें । तैशीच तयातें
सुदया ज्यावरि घडते ॥ ३ ॥ ईशाचें सौम्य रूप ती
गमते । तल्लीला जगतीं पाहुनि सन्मन रमतें ॥ ४ ॥

करुणा ही बलाढ्यांत बलाढ्य आहे. तिची योग्यता तुला काय सांगूं. !

[नंदनवनदेवीनें माझा०]

सार्वभौमनृपशिरकमलीं जो मुकुट महार्घ वसे ।
त्याहुनिही ही दया तयाला शोभा अर्पितसे ॥ धृ०॥
बहुबलवैभवगौरवचिन्हचि राजदंड साचा ।
करुणाप्रभाव अधिक तयाहुनि काय वदे वाचा ॥१॥
भूपहृदय हें तत्सिंहासन, राज्य विशाल तिचें ।
वंद्य दया ही नरपतिवृंदा, रूपचि ईशाचें ॥ २ ॥
न्यायीं आश्रय मिळे दयेला तरि समता येई ।
नृपसत्तेला जगिं ईशाच्या सत्तेची कांहीं ॥ ३ ॥

शक्तिनाथ, म्हणून सांगतों, कीं जरी तुला तंतोतंत न्याय पाहिजे आहे, तरी एवढेंच लक्ष्यांत घे कीं, प्रत्येकाला ईश्वरानें कांहीं दया न करतां तंतोतंत न्यायानें वागविलें तर बहुतेक सर्व लोकांच्या नशीबीं अक्षय नरकवासच येईल. परमेश्वरानें आपल्यावर नेहमीं दयार्द्र असावें असें आपण त्याला विनवितों; त्याप्रमाणेंच इतरां-बद्दल आपलेंही अंत:करण दयाकुलच असलें पाहिजे. तूं आपला तंतोतंत न्याय मिळण्याबद्दलचा आग्रह सोडावास यासाठीं मी

इतकें बोललों. तो आग्रहच जर तूं पुढें चालविशील तर या बिचाऱ्या धनदत्ताच्या विरुद्ध आम्हाला न्याय द्यावा लागणार.

शक्तिनाथ–माझ्या सर्व पापांचें ओझें माझ्या मस्तकावर मी तें वाहण्यास तयार आहें. मला फक्त तंतोतंत न्याय आणि ती रोख्यांतील अटच पाहिजे. दुसरें तिसरें मी कांहीं जाणत नाहीं.

मृणालिनी–धनदत्त रोख्यांतील रकम देण्यास समर्थ नाहींत काय ?

बसंत–ही रकम येथल्या येथें तयार आहे. दुप्पट रकमही देण्यास आम्हीं तयार आहों. तितक्यावरही भागत नसल्यास, कर्जाऊ घेतलेल्या रकमेच्या दसपट रकम देण्यासही मी तयार आहें. हें वचन मी न पाळल्यास शक्तिनाथानें माझें हात, पाय, शरीर छिन्नविच्छिन्न करून मला देहांत शिक्षा द्यावी ! इतक्यानेंही पुरें पडत नसेल, तर यावरून एवढें स्पष्ट दिसतें कीं, द्वेषभावाचा पगडा सत्यावरही बसूं शकतो. महाराज, एकवेळ कायदा मोडून या राक्षसाची ही दुष्ट इच्छा हाणून पाडा–

[गमपसाधप०]

जरि लाभते । सुकृती महा ते । लघु दुष्कृतें । तरि
काय होतें ॥ धृ० ॥ प्रबला रुजाला । निरसाव-
याला । कटु औषधीला । बुध योजिती ते ॥ १ ॥

मृणालिनी–छे छे ! असें करतां येणार नाहीं. एकदां असें उदाहरण घडलें, म्हणजे पुढें तें फार जड जाईल. या उदाहरणानें पुढें राज्यांत पुष्कळ गुन्हे घडतील. एकदां कायदा मोडला कीं, पुनः पुनः त्याचें उल्लंघन करण्याचे प्रसंग येतील. हें आपलें सांगणें मला बिलकुल मान्य करतां येत नाहीं.

शक्तिनाथ–वाहवा, शाबास! न्यायाचे कामांत आपण प्रति-अशोक महाराज आहां. आपले मी किती गुणानुवाद गाऊं!

मृणालिनी–बरें, तो कर्जरोखा मला पाहूं द्या.

शक्तिनाथ–हा पहा—हा पहा. आपण प्रतिअशोक अहांत!

मृणालिनी–शक्तिनाथ, तुझ्या रकमेच्या दुप्पट रकम तुला हे देत आहेत.

शक्तिनाथ–पण मी शपथ घेतली आहेना? ती मोडून मी नरकांत पडूं काय? दुप्पट रकम काय, परंतु हें सर्व मणिपुर मला मिळालें तरी मी माझी शपथ मोडणार नाहीं.

मृणालिनी–या रोख्यांत लिहिलेली मुदत टळून गेली आहे खरीच. आणि धनदत्तांच्या हृदयांतील अच्छेर मांस शक्तिनाथाला मिळणें रास्त व न्याय्य आहे. पण शक्तिनाथ, याच्यावर दया कर आणि–

[श्रीरमणीवल्लभा०]

धरी नच आग्रहा ! करि अनर्थाचि जो महा ॥ धृ०॥
दयापराङ्मुख बनोनि पातकसुतुंगनग जोडिसी कसा
हा ॥ १ ॥ मुमूर्षु टाकुनि सुधेसि, सेवनिं विषाचिया
दाविसी रति पहा ॥ २ ॥

तिप्पट रकम घे आणि हा रोखा मला फाडूं दे.

शक्तिनाथ–अंहं! त्यांतली अट प्रथम मला पुरी करून घेऊं द्या, मग तो रोखा खुशाल फाडा. महाराज आपण अपक्षपाती न्यायाधीश अहां. न्यायदेवतेचे आपण प्रधान अहां. आपलें कायद्याचें ज्ञान अगाध आहे, हें आपल्या विवरणावरून सर्वांच्या निदर्शनास

आलेंच आहे. आपण काय तो निकाल द्या. प्रभु सुगताची शपथ घेऊन सांगतों कीं, माझ्या निश्चयापासून मला परावृत्त करलि असा एकही मायेचा पूत या जगांत नाहीं. मी ती अट तंतोतंत पुरी करून घेणार !

धनदत्त–निकाल काय आहे तो न्यायाधीश महाराजानीं लवकर सांगावा, अशी त्यांना माझी मनःपूर्वक विनंति आहे.

मृणालिनी–मी हाच निकाल देतों कीं, शक्तिनाथानें धनदत्तांच्या हृदयांतील अच्छेर मांस कापून घ्यावें.

शक्तिनाथ–वहावा ! शाबास ! न्यायाधीश असावा तर असा असावा. महाराज आपण धन्य अहां !

मृणालिनी–या रोख्यांत लिहिलेली व मीं सांगितलेली शिक्षा कायद्याला मान्य आहे. शक्तिनाथानें मांस कापून घ्यावें.

शक्तिनाथ–वहावा ! अगदीं योग्य निकाल ! आपण अगदीं अपक्षपाती अहां. वयानें आपण लहान दिसतां, परंतु विद्येनें व कृतीनें आपण वृद्धच अहां.

मृणालिनी–धनदत्तांनीं आपली छाती उघडी करावी.

शक्तिनाथ–होय. अगदीं अस्सें रोख्यांत लिहिलें आहे ! नाहीं न्यायाधीश महाराज ? ‘ हृदयाजवळचें ’ असेंच त्यांत लिहिलें आहे.

मृणालिनी–होय. पण मांस वजन करावयाला कांटा आणला आहे ना ?

शक्तिनाथ–हा पहा तयार आहे.

मृणालिनी–शक्तिनाथ, तुझ्या खर्चानें येथें एक कुशल वैद्य आणून ठेव. मांस काढून घेतल्यावर त्याच्या जखमा शिवून

टाकिल्या पाहिजेत. नाहीं तर गरीब बिचारा व्यर्थ प्राणास मुकेल.

शक्तिनाथ–वैद्य आणावा असें या रोख्यांत लिहिलेलें कोठें दिसत नाहीं.

मृणालिनी–रोख्यांत लिहिलेलें नाहीं हें खरें. पण ह्मणून काय झालें ? तुझा उदार स्वभाव त्या योगानें दिसून येईल.

शक्तिनाथ–या रोख्यांत कांहीं तसें लिहिलेलें नाहीं; आणि रोख्याच्या बाहेर एका अक्षरानेंही मी जावयाचा नाहीं.

मृणालिनी–धनदत्त, तुह्माला कांहीं सांगावयाचें आहे ?

धनदत्त–कांहीं विशेष नाहीं. मी शिक्षा भोगावयाला तयार आहें. वसंता, तुलाही विशेष सांगावयाचें आहे असें नाहीं.–

[कानडा-त्रिवट.]

मनिं सुहृदा करि नच शोका । देह पडे हा त्वदर्थ ह्मणुनी स्थल न कदा हृदयीं दे दुःखा ॥ धृ० ॥ विपत्तियुत भोगाया मृतितें । लावी निर्घृण दैव नरातें । देउनि मरणा यापरि करि तें । कृपा न मजवरि का ॥ १ ॥

आणि तुला खरेंच सांगतों–

[निजमख रक्षाया०]

दुःख मदीय मनीं । अल्पहि नाहीं । मृति ये मज ह्मणुनी ॥ पूतचरित जीवन हें क्रमुनी सौख्यें जातों जगता त्यजुनी ॥ धृ० ॥ प्रियनिजदयितेतें । कथि

अपुल्या या । विमल स्नेहातें ॥ सौख्यानंदें तिजसह
राहा जा न कधीं परि मज विस्मरुनी ॥ १ ॥

माझें विस्मरण तुह्माला झालें नाहीं ह्मणजे मी परलोकीं आपल्याला धन्य मानीन.

वसंत–धनदत्ता, माझा विवाह झाला आहे आणि–

[कालंगडा–दादरा.]

प्रियकर अतितर मजसी होइ खचित भामिनी ।
प्राणचि मम जाण दुजा रमणी ती या जनीं ॥ धृ० ॥
परि जगती, जीवित मम, सकलदयित गेहिनी ।
प्रिय न कांहिं तुजसमान सुहृदा मनिं मी गणीं ॥ १ ॥
मुक्तता त्वदीय व्हावयास संकटांतुनी ।
सकलहि तीं बलि अर्पिन राक्षसासि या क्षणीं ॥ २ ॥

मृणालिनी–तुमची पत्नी येथें असती, आणि तुमचें हें भाषण तिनें ऐकिलें असतें, तर तिला तें खास आवडलें नसतें.

तरंग-माझाही विवाह झालेला आहे; आणखी माझी प्रिया मला प्राणापेक्षां प्रिय आहे. परंतु या अधमाधम राक्षसाला धनदत्ताची कांहीं तरी दया येऊं दे, अशी ईश्वराची प्रार्थना करावयाला मी तिला मोठ्या आनंदानें स्वर्गाला पाठविली असती.

बिशाखा–तुह्मी आपल्या बायकोच्या पाठीमागें हें बोलत अहां ह्मणून ठीक आहे. ती येथें असती तर मोठी खडाजंगीच उडाली असती.

शक्तिनाथ–[मनांत] भगवान् सुगता ! हें पहा वैदिक लोकांचें

आपल्या बायकांवरील प्रेम ! माझ्या कारटीला या नीच वैदिक लोकांतीलच एक वर आवडला ! आह्मा बौद्ध लोकांत जणु काय तिच्याजोगता कोणी नवराच नव्हता ! [उघड] उगीच वेळ जात चालला आहे. उशीर कां आतां ?

मृणालिनी–धनदत्तांच्या हृदयाजवळचें अर्ध शेर मांस तुझ्या मालकीचें आहे. तें नाकारावयाला कायद्याला अधिकार नाहीं. तें तूं खुशाल कापून घ्यावेंस.

शक्तिनाथ–शाबास महाराज ! आपण खरे न्यायाधीश अहां.

मृणालिनी–शक्तिनाथ, पण पुनः एकदां तुझी विनवणी करतों कीं—

[मी गरलमुखी फणा०]

हो सकरुण अंतरीं । उग्रभाव विसरुनि मम चरण
धरुनि विनति करीं ॥ धृ० ॥ स्थिति यदीय बघुनि
करुण । उपलहृदय हो विदीर्ण । त्यावरी कां धरिसि
कठिण । क्रौर्य हें तरी ॥ १ ॥

दसपट रकम घे–आणि—

शक्तिनाथ–एकदां सांगितलें ना कीं मी शपथ घेतली आहे ह्मणून ? मला मांसच पाहिजे.

मृणालिनी–तर मग घे कापून; त्यावर न्यायानें तुझीच सत्ता आहे.

शक्तिनाथ–शाबास– ! याला ह्मणावें न्याय ! चल धनदत्ता, तयार हो. [सुरा परजतो; वसंत तरवार अर्धी म्यानाबाहेर काढून पुढें सरसावतो.]

मृणालिनी–पण जरा थांब. शक्तिनाथ, तुला आणखींही कांहीं सांगावयाचें आहे. या रोख्यांतल्या अटीप्रमाणें बरोबर अच्छेर मांसच घेण्याचा तुला अधिकार आहे. पण रक्ताचा एकही बिंदु तुला मिळणार नाहीं. " बरोबर अच्छेर मांस " एवढेच या रोख्यांत शब्द आहेत. रोख्यांतील अट तूं बेलाशक पुरी करून घे–तूं अच्छेर मांस कापून घे–परंतु तें कापून घेण्यांत या धन-दत्तांच्या रक्ताचा एक बिंदूही जर पडेल, तर कायद्याप्रमाणें तुझी सर्व स्थावर जंगम मिळकत सरकारांत जप्त केली जाईल. (शक्ति-नाथाच्या हातांतील सुरा व कांटा एकदम खालीं पडतात.)

तरंग–शक्तिनाथ, न्यायाधीश असावा तर असाच असावा, नाहीं बरें ? आतां कसा काय न्यायाधीश आहे ?

शक्तिनाथ–असा कायदा आहे काय ?

मृणालिनी–तुला तंतोतंत न्याय पाहिजे आहे–तुला रोख्यांतील अटच पाहिजे आहे. तुला पाहिजे त्यापेक्षांही अधिक तंतोतंत न्याय तुला मिळेल.

तरंग–शक्तिनाथ, " याला म्हणावें न्याय " नाहीं का ? आतां कसा काय न्याय आहे ?

शक्तिनाथ–तर मग मी तिप्पट रकम घेऊन फिर्याद काढून घ्यावयाला कबूल आहें.

वसंत–ही रकम तयार आहे.

मृणालिनी–थांबा जरा. अशी घाई करूं नका. शक्तिनाथाला पूर्ण न्याय मिळेल. त्यानें आपली अटच पुरी करून घेतली पाहिजे !

तरंग–आतां न्यायाधीशसाहेबांचे गुणानुवाद गा. मघाशी अगदीं तयार होतास.

मृणालिनी–मांस कापून घ्यावयाला तयार हो. पण मांस कापून घेतांना रक्ताचा एक थेंबही बाहेर येतां कामा नये; किंवा अगदीं बरोबर अच्छेर मांसापेक्षां कमी किंवा जास्ती कापतां कामा नये. अच्छेरापेक्षां कापून घेतलेल्या मांसाचें वजन एका गुंजेच्या एक शतांशानेंही जर कमी अथवा अधिक भरलें–कांटा एक केंसभर जर कलला–तर तुझी सर्व मिळकत जप्त होऊन तूं मेलास असें समज.

तरंग–कसे आहेत तुझे अशोक महाराज ? नीचा, आतां तूं आमच्या चांगल्या तडाक्यांत सांपडला आहेस.

मृणालिनी–शक्तिनाथ, आतां कां थांबतोस ? विलंब नको. आपली अट पुरी करून घे लौकर.

शक्तिनाथ–मला फक्त माझें मुद्दल तरी द्या. मग मी आपला जातों.

वसंत-तें द्यावयास मी अगदीं तयार आहें, हें घे.

मृणालिनी–अं हं ! मघाशीं भर सभेंत मुद्दल घेत नाहीं म्हणून त्यानें साफ सांगितलें. आतां त्याला तंतोतंत न्यायाशिवाय कांहीं मिळाव[illegible]हीं. त्याला आपली अटच पुरी करून घेऊं द्या.

तरंग–कसा आहे आतां अशोकमहाराजांचा निःपक्षपाती न्याय? हेच ना तुझे प्रतिअशोक महाराज ? काकतालीयन्याय, अंधपरंपरान्याय, इत्यादि न्याय मला ठाऊक होते, पण आज तूं मला अशोकन्याय शिकविलास याबद्दल मी तुझे आभार मानतों.

शक्तिनाथ–तर मग मला माझें निवळ मुद्दलही मिळणार नाहीं काय ?

मृणालिनी–नाहीं. तुझ्या अटीशिवाय तुला आतां कांहीं एक

मिळावयाचें नाहीं. ती अट पुरी करून घ्यावयाची तयारी कर आणि ताबडतोब स्वतः निर्वाणाला जावयाचीही तयारी कर.

शक्तिनाथ—तर मग तें त्यालाच लखलाभ होवो. मीं त्याला तें दान देतों आणि फिर्याद काढून घेतों.

[जाऊं लागतो.]

मृणालिनी—थांब; थांब चाललास कोठें ? एवढ्यानेंच तूं सुटलास असें समजूं नकोस. मणिपुरच्या कायद्यांत असा एक नियम आहे कीं, कोणी परकीय मनुष्यानें येथील रहिवाशाचा जीव घेण्याचा प्रयत्न प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें केला, असें जर सिद्ध झालें, तर त्याची सर्व संपत्ति जप्त होऊन, ज्याचा प्राण घेण्याचा त्यानें प्रयत्न केला होता, त्याला त्यापैकीं निम्मी संपत्ति मिळते व निम्मी सरकारखजिन्यांत जमा होते; आणि त्या अपराधी मनुष्याला देहान्त शिक्षा देणें किंवा न देणें हें फक्त महाराजांच्या मर्जीवर अवलंबून राहते. आणि हा अपराध तुजवर सिद्ध होत आहे. कारण तूं या धनदत्तांचा प्राण घेण्याचा प्रयत्न प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीनेंही केला होतास, असें याच खटल्यावरून उघड सिद्ध झालें आहे. ह्मणून मी आतांच सांगितलेली शिक्षा तुला देण्यांत येत आहे. जीवदान पाहिजे असेल तर महाराजांचे पाय धर आणि त्यांची क्षमा माग.

तरंग—क्षमा कसली मागतोस ? गळफांस लावून जीव देण्याची परवानगी माग. तुझी सर्व संपत्ति जप्त झाली असल्यामुळें गळफांस लावून जीव द्यावयाला दोरीही तुला मिळणार नाहीं; ह्मणून सरकारी खर्चानें तुला फांशी द्यावा लागणार !

पद्मनाभ—शक्तिनाथ, तूं क्षमा मागावयाचे पूर्वींच मी तुला क्षमा

करून जीवदान देतों. यावरून आम्ही वैदिकधर्माचे लोक आणि तुम्ही बौद्धधर्मानुयायी लोक, यांत फरक काय असतो, हें तुझ्या चांगलें निदर्शनास येईल. तुझ्या संपत्तीपैकीं अर्धी संपत्ति धनदत्तांची आहे आणि अर्धी सरकारांत जमा होईल. पण जर तूं पुढें नम्रतेनें वागशील, तर सरकारांत जमा झालेल्या मिळकतींपैकीं बराच भाग तुला सूट देण्यांत येईल.

मृणालिनी–पण धनदत्तांचे भागांपैकीं सूट मिळणार नाहीं.

शक्तिनाथ–माझा प्राण घ्या म्हणजे सुटलेत. मला जीवंत तरी कशाला ठेवतां ? माझ्या चरितार्थाचें साधन माझी संपत्ति हिरावून घेतल्यावर तुम्ही माझा जीव घेतल्याप्रमाणेंच झालें. घराचे खांब काढून घेतल्यावर घर मोडल्याशिवाय राहील काय ?

मृणालिनी–धनदत्त, तुम्ही या शक्तिनाथावर दया करतां काय?

धनदत्त–सरकार, आपली अनुमति असेल तर अशी व्यवस्था व्हावी. याच्या संपत्तीपैकीं जो भाग सरकाराकडे आला आहे, तो सरकारांनीं याला सोडावा बाकीचा भाग याच्या मरणोत्तर याच्या जांवयाला व मुलीला मिळण्यासाठीं मी आपल्या ताब्यांत ठेवितों. दुसरी अट–यानें ताबडतोब बौद्धधर्म सोडून वैदिकधर्म स्वीकारावा. तिसरी अट–याचे मरणाचे वेळीं जी संपत्ति याजपाशीं असेल, ती याच्या जांवयाला म्हणजे कलहंसाला व याच्या मुलीला मिळावी, अशा तऱ्हेचें यानें येथें करारपत्र करून द्यावें.

पद्मनाभ–हें सर्व यानें कबूल केलेंच पाहिजे; नाहीं तर मघाशीं मीं जें त्याला जीवदान देण्याचें वचन दिलें आहे, तें मी माघारी घेतों.

मृणालिनी–शक्तिनाथ, या सर्व अटी तुला कबूल आहेत ना ? तुझें कांहीं म्हणणें आहे ?

शक्तिनाथ–मला या सर्व अटी कबूल आहेत.

मृणालिनी–[विशाखेस] वंजुला, या अटीचें करारपत्र तयार कर पाहूं.

शक्तिनाथ–माझ्यानें आतां येथें रहावत नाहीं. मला बरें वाटत नाहीं. करारपत्र माझ्याकडे पाठवून द्या. मी त्यावर घरीं सही करून देईन. सरकार, कृपा करून मला घरीं जावयाची परवानगी द्या. ह्या वेळीं माझी प्रकृती बरी नाहीं.

पद्मनाभ–बरें, कांहीं हरकत नाहीं, तूं जा.

तरंग–काय करूं रे ? बराच सुटलास. माझ्या हातांत असतें तर मी तुला खात्रीनें सुळावरच चढविला असता.

[शक्तिनाथ जातो.]

पद्मनाभ–वकीलसाहेब, आज भोजनाला वाड्यांतच चलावें.

मृणालिनी–महाराजांचें मन मोडणें माझ्या अगदीं जीवावर येतें. कांचनपुरास जावयाला आज मला निघालेंच पाहिजे. मी हा असाच निघतों; ह्याबद्दल महाराजांनीं मला क्षमा करावी.

पद्मनाभ–आपल्याला फुरसत नाहीं ह्मणून मला फार वाईट वाटतें. धनदत्त, यांनीं तुह्माला काळाच्या जबड्यांतूनच ओढून काढिलें आहे. तुमच्यावर यांचे फार उपकार आहेत. यांच्या श्रमाबद्दल यांची चांगली संभावना करण्याची तजवीज तुह्मी करालच.

[महाराज व अनुयायी जातात.]

वसंत–महाराज, आपल्या उपकारांचे आह्मी उतराई कसे होणार ?

[कालंगडा–त्रिवट.]

बहु उपकृति नरवर जाहली । सकलसुजनगणगुण-

साराची मूर्ति गमे ही आपुली ॥ धृ० ॥ कालमुखां-
तुनि मम सुहृदाची तनु ओढुनियां काढिली । ऋण-
भारा या फेडायातें शक्य न आह्मा भूतलीं ॥ १ ॥

आपल्या उपकारांचे पूर्णपणें उतराई होण्याकरतां नव्हे. परंतु फूल नाहीं फुलाची पाकळी या न्यायानें, शक्तिनाथाचें आह्मी देणें होतें, त्या ह्या तीन हजार मोहोरा कृतज्ञता बुद्धीनें आपणाला अर्पण करितों. आपल्या श्रमाच्या मानानें हें पारितोषिक कांहींच नव्हे, हें आह्मी जाणून आहों. परंतु आपण याचा स्वीकार करावा अशी विनंति आहे.

धनदत्त—आपले मजवर अनंत उपकार आहेत. आपली आमरण सेवा केली तरी ते फिटणार नाहींत.

मृणालिनी—छे छे ! यांत उपकार कसचे !—

[बेहाग–त्रिवट.]

उपकृतिसंज्ञा कर्तव्यातें देतां नच तें उचित गम-
तें ॥ धृ० ॥ तृप्ति फल असे जया श्रमाचें । श्रम ते
विलया जाती साचे । प्रमोदभर जणुं हृदयीं नाचे ।
श्रममूल्यहि तैं सकल पावतें ॥ १ ॥

शिवाय पारितोषिकाच्या आशेनें मी मुळींच येथें आलों नाहीं. उपेंद्रनाथांच्या अत्याग्रहावरून मी येथें आलों. मी आतां जातों. माझी आपल्याला इतकीच विनंति आहे कीं, पुनः आपल्या भेटीचा कधीं योग आला, तर मला ओळखा तरी. माझें विस्मरण पडूं देऊं नका.

वसंत—महाराज, आपल्याला अत्याग्रहानें दोन प्रार्थना करतों.

त्यांचा अनादर करूं नका. आमची आठवण रहावी ह्मणून आह्मां-पासून एक एक कांहीं तरी वस्तु मागून घ्या, ही एक प्रार्थना; आणि या प्रार्थनेचा अनादर करूं नका ही दुसरी प्रार्थना.

मृणालिनी–तुमचा अत्याग्रहच पडला ह्मणून मी नाहीं ह्मणत नाहीं. [धनदत्तास] आपला हा शेला मी मागून घेतों आणि [वसंतास] आपण ती बोटांतील मुद्रिका मला द्या. असा हात मागें घेऊं नका. मी हिच्याशिवाय कांहीं एक घेणार नाहीं; आणि आपणही मुद्रिका मला देण्याला अनमान करूं नये.

वसंत–ही भिकार आंगठी ! अशी हलकी वस्तु आपणासारख्या गृहस्थाला देणें मला शोभत नाहीं.

मृणालिनी–मला तीच आंगठी आवडली आहे. तिच्यावरच माझें मन बसलें आहे. मला तीच आंगठी पाहिजे. दुसरें कांहीं मी घेणार नाहीं.

वसंत–द्रव्यदृष्टीनें हिचें मूल्य विशेष आहे असें नाहीं, पण दुसऱ्या एका दृष्टीनें हिचें मूल्य फार आहे. या मणिपुरांत जी अति मूल्य-वान् आंगठी असेल ती दंवडी पिटवून आणवितों आणि ती आपल्याला अर्पण करतों. परंतु ही आंगठी मला कांहीं कारणा-करितां कोणालाही देतां येत नाहीं. याबद्दल आपण मला क्षमा करावी.

मृणालिनी–आपण वचनदातृत्वांत कर्णापेक्षांही उदार दिसतां; परंतु प्रत्यक्ष हातानें कृति करण्यांत कृपणाहून कृपण दिसतां. कांहीं तरी वस्तु घेण्याबद्दल तुह्मींच मला विनंति केली आणि आतां मी ही मुद्रिका मागितल्यावर, एखाद्या भिकाऱ्याला उत्तरें द्यावीत त्या प्रमाणें मला देतां. मोठें आश्चर्य आहे बुवा !

वसंत–महाराज, ही आंगठी माझ्या प्रिय पत्नीनें मला दिली

आहे; आणि ही देतांना, ही मी कधीं कोणाला देणार नाहीं व कधीं-ही हरविणार नाहीं. अशी शपथ तिनें मजकडून घेवविली आहे; ह्मणून मी असें बोललों.

मृणालिनी–द्यावयाचें मनांत नसलें, ह्मणजे पुष्कळ लोक अशींच कांहीं तरी कारणें सांगतात. बरें, तुमचें कारण अगदीं खरें आहे असें मानूं. पण आंगठी कोणाला दिली, त्याची योग्यता काय, त्याच्या श्रमाची योग्यता काय, हें सर्व जर तुह्मी आपल्या प्रियेला नीट समजावून सांगितलेंत, तर ती रागावून बसण्याइतकी वेडी असेल असें मला वाटत नाहीं. आणि रागावलीच तर कांहीं जन्म-भर रागावून बसत नाहीं. बरें तर आह्मी जातों. [मृणालिनी व विशाखा जातात.]

धनदत्त–मित्रा वसंता, दे झालें ती आंगठी त्यांना. त्यांची योग्यता, श्रम, आणि माझें प्रेम हीं मनांत आणून तुझ्या पत्नीचा राग कसा तरी सहन कर.

वसंत–तरंगा, जा. ही आंगठी घे आणि त्यांना गांठून ही त्यांच्या स्वाधीन कर आणि ते आल्यास त्यांना धनदत्ताच्या वाड्यांत घेऊन ये. जा लवकर. [तरंग जातो.] चल, आतां घरींच जाऊं आणि प्रहर रात्रीच्या सुमारास रत्नपुरास जावयाला निघूं. [जातात.]

प्रवेश दुसरा.

(मणिपुर–रस्ता.)

[मृणालिनी व विशाखा.]

मृणालिनी–विशाखे, शक्तिनाथाचा वाडा कोठें आहे त्याचा

शोध कर. त्याच्याकडे हें करारपत्र घेऊन जा आणि याच्यावर त्याची सही करून घे. आपण आज सायंकाळींच निघूं आणि त्यांच्या पूर्वीच एकदोन प्रहर अगोदर पोंचूं. कलहंस आणि सारिका यांना हें करारपत्र फारच अवडेल, नाहीं बरें ?

[**तरंग** येतो.]

तरंग–बरे भेटलांत बोवा. वसंतानें अधिक विचार करून ही आंगठी आपणाला दिली आहे. आणि भोजनालाही बोलाविलें आहे.

मृणालिनी–छे, भोजनाचें जमणार नाहीं. मुद्रिकेचा मात्र मी आनंदानें स्वीकार केला असें त्यांना सांगा. आणि कृपा करून या माझ्या कारकुनाला शक्तिनाथाचा वाडा दाखवा.

तरंग–ठीक आहे, दाखवितों.

विशाखा– [मृणालिनीस एकीकडे] ताईसाहेब, तुमच्याप्रमाणें मीही साधल्यास यांच्याकडून आंगठी काढून घेतें. यांनींही कोणाला आंगठी न देण्याबद्दल मजपाशीं शपथ वाहिली आहे.

मृणालिनी– [विशाखेस एकीकडे] घेच काढून. हे घरीं आल्यावर आपण मोठी मौज करूं, आणि आपुल्या प्रणयमुद्रिका कोणाला तरी देऊन टाकल्याबद्दल त्यांच्याशीं प्रणयकलह करूं, आणि त्यांना अगदीं गांगरवून सोडूं. [मोठ्यानें] जा लवकर. कोठें यावयाचें तें तुला ठाऊक आहेच.

विशाखा–चला. मला त्या शक्तिनाथाचा वाडा दाखवितांना ?

तरंग–चला असे. [तरंग व विशाखा जातात.]

मृणालिनी–वहावा ! येथपर्यंत तर ठीक झालें–

[मुक्तता करीतें॰]

हेतु सफल केले । परमेशें, सकल सुघटित झालें ॥ धृ॰॥

आणि आतां ? आतां काय ?—

मुद्रिकानिमित्तें। सहविनोदचित्तें। पतिसह मी कलहा सजलें ॥ १ ॥ दावुनी स्वरूपा। हरिन कांतकोपा। तोषवोनि अचिरें कालें ॥ २ ॥

[पडदा पडतो.]



अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

(रत्नपुर-मृणालिनीचें उद्यान.)

[कलहंस व सारिका.]

कलहंस-प्रिये, पहा जिकडे तिकडे कसा आनंदी आनंद होऊन राहिला आहे तो-

[छायानट—त्रिवट.]

रम्य ही बहु गमे यामिनी । अतुलमोदपरितोषदा-
यिनी । होय या जनीं इंदुकामिनी ॥ धृ० ॥ मृदु
पवनें चुंबित विटपावलि । लवभरि रव परि होइ न
भूतलिं । सुमसौरभयुत जगती जाहलि । स्थल वाटे
हें नंदनवन मनिं ॥ १ ॥

सारिका-आणि हा रजनीकांत चंद्रमा जणु काय पृथ्वीवर शीतल अमृताचाच वर्षाव करीत आहे असें वाटतें !

[किती कोमल तनु०]

बहु मोहक ही चंद्रकला गगनिं डोलते ॥
रजतरसीं वसुधा जणु सकल बुडविते ॥ धृ० ॥

कलहंस—

प्रबल तमोराशि हरुनि । किरणीं दिग्भाग भरुनि ।
निजतेजाप्रति गगनीं अतुल मिरविते ॥ १ ॥

सारिका—

उज्ज्वलशा तारातति । निजतेजें लोपवि ती ।

कलहंस—

सबल हरवि निर्बलांस नियम दावितें ॥ २ ॥

सारिका—

संसृतिसंकटमाला । त्रस्त करी बहु ज्यांला ।

क्षणभरि तद्हृदयांला शांति अर्पिते ॥ ३ ॥

या चंद्रकलेच्या वर्णनांत मी आपणास खात्रीनें हरवीन; पण ता पहा कोणाचीं तरी पावलें ऐकूं येत आहेत.

[नंद येतो.]

कलहंस–कोण तो ? एवढ्या रात्रीं येथें कोण आला आहे तो ?

नंद–आपलाच मनुष्य आहे सरकार !

कलहंस–आपलाच मनुष्य खरा; पण त्या आपल्या मनुष्याला कांहीं नांवगांव आहे किंवा नाहीं ?

नंद–मी आपला नंद आहें. पाहांटेच्या पूर्वीच ताईसाहेब येथें येऊन पोंचतील, हें आपणाला कळवावयाला आलों आहें. श्री-जग दंबिकेच्या देवळांतील त्यांचें काम झालें. त्या लवकरच येऊन पोंचतील.

कलहंस–पण त्यांच्याबरोबर कोणी आहे का ?

नंद–विशाखेशिवाय कोणी नाहीं. बरें, पण मणिपुराहून धनी-साहेब आले का ?

कलहंस–अजून ते आले नाहींत, आणि त्यांच्याकडून कोणी निरोपही घेऊन आलेला नाहीं. प्रिये, आपण आंत जाऊं या आतां.

ताईसाहेब इतक्यांत येतील. त्यांच्या स्वागताची कांहीं तरी तयारी करूं या.

(मंगलक येतो.)

मंगलक–फों, फों, फों,–कोणी आहे का तिकडे ! फों फों—

कलहंस–हा कोण वेड्यासारखा ओरडत येत आहे !

मंगलक–कलहंसजी आणि आमच्या पळपुट्या सारिकाताई कोठें तुह्मी पाहिल्यात का ?

कलहंस–हे आह्मी येथेंच आहों; कोण तो ! मंगलका !

मंगलक–पण येथें ह्मणजे मंगलकानें कोठें समजावयाचें ! हा चंद्र तरी मोठा द्वाड बुवा ! एकदां डोळे उघडतो, एकदां मिटतो. कलहंसमहाराज, धनीसाहेबांकडून एक मनुष्य आला आहे. मोठा चहाडखोर दिसतो आहे तो ! त्याच्या तोंडांत कांहीं रहातच नाहीं. आल्याबरोबर स्वारीनें पहिले शद्ब उच्चारले ते काय ? तर " धनीसाहेब धनदत्तमहाराजांना घेऊन इतक्यांत येथें येतील." [जातो.]

कलहंस–प्रिये, आतां आपण आंत जाऊं या. आणि वसंत आणि ताईसाहेब यांच्या स्वागताची नीट तयारी करूं-पण नको-आपणालाच जावयाला नको. नंदा, तूं आंत जाऊन सगळ्यांना ताईसाहेब व वसंत यांच्या आगमनाची वर्दी दे आणि संगीतशाळेंत जाऊन नर्तकींना पाठवून दे. [नंद जातो.] या सर्व आनंदी आनंदांत संगीताचें मिश्रण झाल्यावर मग फारच बहार होईल. आपण येथेंच बसून संगीत ऐकूं. ही अपूर्व शांतता व ही परम रमणीय रजनी जणुं काय एकांत एक गुरफटून गेली आहेत असें वाटतें. प्रिये, ही पाहिलीस का मौज !

[प्रिये कशी दैवाची०]

गमे मना अंबर हें सुंदर बहु सुवितत वितानसें ॥धृ०॥
तारागण मणिसम हे । रुचिरोज्ज्वल गे पाहे ॥
खचित तयीं व्योम वहे । सौंदर्यहि फारसें ॥ १ ॥
निखिलभुवनपति सुंदर । सुदयाघन परमेश्वर ।
उडुगण हे परम रुचिर । स्तविति असें गमतसे ॥ २ ॥

प्रिये, हें तारकांचें ईशस्तवन व अंतरिक्षांतील गंधर्वांचें गायन हीं अगदीं गुरफटून जात असतील. [नर्तकी येतात.] गंधर्वांचें नांव घेतल्याबरोबर या पहा गंधर्वांगनाच जणु काय आल्या. नर्तकींनो, आपल्या नृत्यगीतानें आपल्या ताईसाहेबांना असतील तेथून आकर्षण करून आणा—चालूंद्या तुमचें संगीत—

नर्तकी— [तननतों तननतों तों०]

प्रणति भावें स्मरातें । अविरत अधिकृती करित जो
भुवनांवर । वश करि अतितर अमरदनुजनर ॥धृ०॥
जिंकि जो सदा कृती । विष्णुविधिहरांप्रती । तोचि
रतिपति । काय करी स्थिति । इतरिं नच कथवतें ॥१॥

सारिका—संगीत ऐकल्याबरोबर माझें मन अगदीं संक्षुब्ध होऊन जातें.

कलहंस—त्याचें कारण हेंच कीं, तुझी चित्तवृत्ति संगीताशीं अगदीं एकतान होऊन जाते. एखादा वन्यपशूंचा कळप, आपल्या उच्छृंखल स्वभावानुरूप मोठमोठ्यानें गर्जना करीत इकडून तिकडे उड्या मारीत असतां, जर एखाद्या तुतारीचा ध्वनि किंवा संगी-

ताची लकेर त्या पशूंच्या कानीं आली, तर ते एकदम थबकून एकमेकांकडे पहात राहतात; त्यांची क्रूर दिसणारी दृष्टि शांत झाल्यासारखी वाटते. हा केवळ संगीताचा प्रभाव ! खरोखर हें संगीत—

[नाहीं कोणीही हुंगीलें०]

मनुज–विहंग–पशूंस विमोही । मानसताप हरी
लवलाही । जगतीं स्वर्गसुखा दे पाहीं । गीत सुधा
मधुराचि गमे हें ॥ १ ॥

मनुष्य कितीही कठिण हृदयाचा किंवा कोपी असो, परंतु संगीत त्याला निदान त्या वेळीं तरी अगदीं मृदु बनवितें आणि–

[चाल सदर]

संगीत श्रुतिसुंदर ऐकुनि । जाइ न जो नर मोहुनियां
मनिं । अधम कठोर कुटिलवर तो जनिं । खचित
विशंक जनें समजावा ॥ १ ॥

असा मनुष्य पापाचरणालाच योग्य आहे असें समजावें. त्याची चित्तवृत्ति अमावास्येप्रमाणें कृष्णवर्ण असते. ऐक संगीत पुनः सुरू झालें. [संगीत सुरू होतें.]

[मृणालिनी व विशाखा येतात.]

मृणालिनी–तो प्रकाश आमच्या दिवाणखान्यांतील दिव्याचा आहे. हा प्रकाश अंधकारांत किती दूरवर पसरला आहे तरी !

[पांडुनृपति जनक०]

दुष्टकुजनपूर्ण असे । जग जेथें तिमिर वसे ।
त्यांत सुकृत विमल असें । तें प्रकाशतें ॥ १ ॥

विशाखा–मघाशीं चंद्रप्रकाशामुळें हा दिवा आपल्याला दिसला नाहीं.

मृणालिनी–अग असेंच आहे–

[चाल सदर]

विमल महोत्तर यश तें । दाहि दिशा जें भरितें ।
लघुकीर्तिस लोपवितें । याच रीतिनें ॥ २ ॥

राजा जवळ नसतांना त्याचा प्रतिनिधि फार शोभतो; परंतु ज्याप्रमाणें नदीचें सर्व जल सागरांत मिळून जातें, •त्याप्रमाणें राजा सन्निध असल्यावर, त्या प्रतिनिधीचें सर्व तेज राजतेजांत मिळून जातें. पण ऐक—मधुर संगीतध्वनि ऐकूं येत आहे.

विशाखा–ताईसाहेब, हें संगीत आपल्या संगीतशालेंतील नर्तकींचें आहे असें वाटतें.

मृणालिनी–यावरून एवढेंच अनुभवास आलें कीं, वस्तूचा चांगुलपणा तुलनेशिवाय कळून येत नाहीं. दिवसापेक्षां रात्रींच हें संगीत गोड लागतें.

विशाखा–ताईसाहेब, रात्रीच्या शांततेमुळेंच हें इतकें गोड लागत आहे.

मृणालिनी–कावळा आणि भारद्वाज यांचें गायन कोणी ऐकत नसतें, तेव्हां सारखेंच मधुर असतें. दिवसास इतर लहान सहान पक्ष्यांचा कर्कश किलकिलाट चालू असतां, जर साळुंकी आपलें मधुर गायन सुरू करील तर गायनांत तिची योग्यता जवळ जवळ काकाकुव्याइतकीच मानिली जाईल. गोष्ट योग्य कालीं घडली असतां तिची योग्यता आणि मधुरता फार वाढते. हां-पुरे करा–हा

निशानाथ चंद्रमा निद्रासुख अनुभवीत आहे. त्याला जागृत करूं नका. [संगीत थांबतें.]

कलहंस–हा ताईसाहेबांचा स्वर जर नसेल तर मात्र मी खास फसलों.

मृणालिनी–कावळ्याच्या कर्कश स्वरावरून त्याला अंध मनुष्यही ओळखतो, त्याप्रमाणें तुह्मीं माझा स्वर ओळखलात !

कलहंस–या ताईसाहेब, कधीं आलांत ? ही अयोग्य उपमा आपली पूर्ण शालीनता दाखविते.

मृणालिनी–श्रीजगदंबिकेच्या मंदिरांतील आमचें काम संपल्या-मुळें आम्ही आतांच येत आहों. पण मणिपुराहून मंडळी आली का?

कलहंस–नाहीं ताईसाहेब. पण ते येत आहेत असें सांगावयाला एक दूत नुकताच आला होता.

मृणालिनी–विशाखे, वाड्यांत जाऊन, आह्मी येथून गेलों होतों, हें मंडळीला न सांगण्याबद्दल सर्वांना ताकीद दे. कलहंसजी, आपण त्यांना कांहीं कळवूं नका बरें का? सारिकाबाई, तुह्मीही नका कळवूं. [शिंग वाजतें.]

कलहंस–ही मंडळी आलीच–आतांच शिंग ऐकूं आलें. ताईसा-हेब, तुह्मी अगदीं भिऊं नका–आह्मी त्यांना कांहीं सांगणार नाहीं.

मृणालिनी–अहाहा ! दिवस रुग्णावस्थेंत असावा, त्याप्रमाणें ही रात्र दिसत आहे. ही दिवसाप्रमाणेंच, परंतु जराशी फिकट दिसते; किंवा वर्षाऋतूंतील सूर्य मेघाच्छादित असलेल्या दिवसाप्रमाणें ही निशा वाटत आहे.

[वसंत, धनदत्त, तरंग व इतर सेवक येतात.]

वसंत–प्रिये, पाताललोकीं या वेळीं दिवस असेल. परंतु येथें रात्र असतांही तेथल्याप्रमाणेंच दिवसांचा भास होत आहे !–

[दिंडी]

तेथ सविता स्वप्रभाप्रभावें तो ॥
हरुनि तिमिरावलि सुखद दिन करीतो ॥
येथ रजनिध्वांत तें निरसुनी गे ।
टाकिसी तूं निजकांतिनें शुभांगे ॥ १ ॥

मृणालिनी–यावें, यावें ! आज स्तुतिपाठकाची दीक्षा घेतली आहे वाटतें ?

वसंत–यांत मी स्तुति काय केली ? सत्य बोलणें ह्मणजे स्तुति करणें नव्हे. पण तें असूंदे. हा माझा प्रियमित्र धनदत्त. याचा मी जन्मापासून फार ऋणी आहें.

मृणालिनी–खरोखर, आपण यांचे अतिशय ऋणी असलें पाहिजे. मी ऐकिलें कीं, आपल्यासाठीं यांनीं आपला जीवही गहाण टाकिला होता.

धनदत्त–छेः, कांहीं नाहीं. त्या भयंकर संकटांतून माझी सुटका झाली ! आतां त्या गत गोष्टींचें नांवही काढूं नका.

मृणालिनी–धनदत्तमहाराज, आपले आह्मांवर अपार उपकार आहेत. हें आपलेंच घर आहे असें समजा; परंतु आपला पाहुणचार शब्दांपेक्षां कृतीनें झाला पाहिजे, ह्मणून मी याविषयीं कांहीं जास्त बोलत नाहीं.

तरंग– [विशाखेस] मी त्या चंद्राची शपथ घेऊन सांगतों कीं, मी ती त्या वकिलाच्या कारकुनाला दिली. तूं आपला कांहीं तरी भलताच समज करून घेतला आहेस !

मृणालिनी–हें भांडण कसलें मध्येंच ? झालें तरी काय ? अजून संसाराला प्रारंभ झाला नाहीं, तोंच भांडणें व्हावयाला लागलीं कीं काय ?

तरंग–कांहीं नाहीं ताईसाहेब. हिची एक भिकारडी लहानशी आंगठी होती, तिच्याबद्दल हिनें एवढी कटकट चालविली आहे ! तिची किंमत ह्मटली तर—

विशाखा–तिच्या किंमतीशीं आणि भिकारडेपणाशीं तुह्माला काय करावयाचें आहे ? पण मी जेव्हां ती तुह्माला दिली तेव्हां "आमरण मी हिला विसंबणार नाहीं. हिचा आणि माझा वियोग एक मृत्युच करील," अशा आणाशपथा आपण घेतल्या आहेत, त्यांची कांहीं आठवण आहे का ? माझ्याकडे नाहीं, पण आपल्या त्या मोठमोठ्या शपथांकडे पाहून तरी ती आंगठी कोणाला देऊन टाकावयाची नव्हती ! आणि वकीलाच्या कारकुनाला ती दिली ह्मणून खोटेंच सांगतां ? तर मग तो तुमचा कारकून असा असला पाहिजे, कीं त्याला जन्मांत कधींच मिशी फुटावयाची नाहीं !

तरंग-ती कां ? तो मोठा पुरुष झाला ह्मणजे—

विशाखा–तो पुरुष कसचा ? ती खचित बायको होती आणि ह्मणूनच तिला तुह्मी ती आंगठी देऊन टाकलीत !

तरंग–चल चल, तुझा आपला कांहीं तरी विलक्षण संशय ! तो कारकून अगदीं पोरगेलासा होता. उंचीनें तो तुझ्या एवढाच होता.

त्याला या हातानें मी ती दिली. त्यानें ती मजपाशीं मागितली आणि मग मला नाहीं ह्मणवेना. उगीच भलते सलते संशय काढूं नकोस.

मृणालिनी– मी तुह्माला स्पष्ट सांगतें कीं, या बाबतींत तुह्मीच दोषी अहां. तुमच्या प्रियेनें मोठ्या भक्तीनें आणि प्रेमानें दिलेल्या आंगठीचा तुह्मी असा उपयोग केलात ? शिवाय त्या आंगठीचा आणि आपला वियोग कधींही होऊं देणार नाहीं अशी तुह्मी शपथ ही घेतली होती, ती क्षुल्लक कारणावरून मोडून टाकिलीत. मग विशाखेला विषाद वाटून राग कां येणार नाहीं बरें ? मींही माझ्या प्रियतमाला तशीच एक मुद्रिका दिली आहे आणि ती कोणाला कधीं न देण्याबद्दल मी त्यांच्याकडून शपथही घेवविली आहे. आणि जरी सर्व जगांतील संपत्ति त्यांना मिळाली, तरी माझी मुद्रिका त्यांजपासून कधींही वियुक्त होणार नाहीं अशी माझी खात्री आहे. तरंग, तुह्मी आपल्या या कृत्यानें आपल्या प्रियेला फार दुःख दिलेंत. माझ्या संबंधीं असें कांहीं झालें असतें, तर मी शुद्ध वेडीच झालें असतें !

वसंत--ज्याला मी भीत होतों, तोच प्रसंग शेवटीं येऊन ठेपला ! हा माझा हात तोडून, तो चोरांपासून आंगठीचें संरक्षण करतां करतां तुटला, असें जरी मी हिला सांगितलें असतें तरी फार बरें झालें असतें !

तरंग–त्या वकिलानें ती आंगठी मागितल्यावरून वसंतालाही ती त्याला द्यावी लागली. आणि त्याच्या विलक्षण चातुर्याच्या, अत्यंत श्रमाच्या व कार्याच्या महत्वाच्या मानानें ती त्याला देणें अगदीं योग्य होतें. त्याच्या त्या पोरगेल्या कारकुनानें माझी आंगठी मागितली आणि तो वकील आणि त्याचा कारकून हे

दोघेही त्या दोन आंगठ्यांशिवाय कांहींच घेतना; त्यांना त्याच आंगठ्या आवडल्या ! त्याला काय करावयाचें ?

मृणालिनी– [वसंतास] कोठली आंगठी आपण त्याला दिली? मीं दिलेली नाहींना दिली त्याला ?

वसंत–अपराध करून तो छपविण्यासाठीं खोटें बोलण्याचें पातक मी करीत नाहीं. या माझ्या बोटांत ती प्रिय मुद्रिका नाहीं, यावरून तुला समजेलच, कीं ती मु–द्रि–का–गेली–

मृणालिनी–तुह्मी पुरुष ह्मणजे असलेच बेमानी–

[अवचित गेलें किंकर०]

अनृतवारिवारिधि नर असती। कुटिलहृदय मधु
बोल बोलुनी स्त्रीजन वंचिति ॥ धृ० ॥ कूप तृणें
आच्छादित पाहुनि जैसे पशु ते मोहीं पडती। सरल-
वृत्ति ललनाहि तशा विश्वसुनिच फसती ॥ १ ॥

ती मुद्रिका मला मिळेपर्यंत मी आपल्याशीं भाषणसुद्धां करणार नाहीं.

विशाखा–[तरंगास] आणि मीसुद्धां आपल्याशीं बोलणार नाहीं.

वसंत–प्रिये, मला क्षमा कर—

[मोरे गलिया जारे०]

कटु वचनीं कां गे। भेदिसि या ॥ धृ० ॥

मृणालिनी–

प्रणयातें वारे जरी दावियलें परि, कपट हृदीं
वागे। समायें या ॥ १ ॥

वसंत-

विपरीता मति धरी नच मानिनि मनिं, च-
रणिं तुझ्या लागें । करि दया ॥ २ ॥

मृणालिनी-वाळूचा बांध ज्याप्रमाणें पोकळ, त्याप्रमाणेंच तुह्मा पुरुषांची प्रीतिही तशीच असते आणि तुमच्या—

[तरुणिंचरा करुणा०]

मधुरा गिरा वदनीं वसे ।
विषा तीव्रशा अन्तरीं होइ थारा ॥ धृ० ॥

पण अधिक बोलण्यांत अर्थ काय ?

जिथें अल्पही स्थान नाहीं नयाला ।
तिथें व्यर्थ भारी वदावें कशाला ॥ १ ॥

वसंत-प्रिये मृणालिनि, इतका कोप तुला योग्य नाहीं ! मीं तुझी मुद्रिका कोणाला दिली, कोणासाठीं दिली, कां दिली, किती नाखुषीनें दिली, आणि दिली ती अगदीं गत्यंतर नव्हतें ह्मणूनच दिली, हें सर्व जर तूं ऐकून घेशील, तर तुझ्या या कोपाची तीव्रता बरीच कमी होईल.

मृणालिनी—तसेंच ती मुद्रिका कोणाकडून मिळाली होती, त्या मुद्रिकेची व जिनें ती आपल्याला अर्पण केली तिची योग्यता काय, हें सर्व जर आपण लक्षांत आणिलें असतें, तर ती आपण कधींही कोणाला देऊन टाकिली नसती ! आणि हें सर्व आपण नीट सम-जावून सांगितलें असतांही, अशी प्रेमाची पवित्र आणि जपून ठेविलेली खूण हट्टानें मागून घेण्याइतका मूर्ख व मद्द मनुष्य कोणी

असेल असें मला वाटत नाहीं. आणि ही विशाखा ह्मणाली तेंच खरें. आपण ती आंगठी कोणा तरी स्त्रीलाच दिली खचित!

बसंत–शिवशिव! असला ह्या घाणेरडा आरोप तूं मजवर करावास?

[होय एकाकि जगिं०]

होय अपराधशत मम करीं जरि रमणि।
दे क्षमा मजसि तरि याचितों तुज नमुनि ॥ धृ० ॥
कुपथ कधिं आजवरि। सेविं नच अणुभरी।
विमल कमलापरी। चरित मम जाण मनिं ॥ १ ॥
देवतेसम धरी। तुजसि जो अंतरीं।
रमण तव यावरी। कोप का उचित जनिं ॥ २ ॥

प्रिये मृणालिनि, तुजशिवाय इतर स्त्रिया मला मातेसारख्या आहेत. ती आंगठी मला एका वकिलाला द्यावी लागली. मीं त्याला तीन हजार मोहोरा देऊं केल्या असतांही त्यानें त्या नाकारून ती आंगठीच मागितली. परंतु त्या वेळीं मीं ती त्याला दिली नाहीं; आणि तो हिरमुसला होऊन निघून गेला. माझ्या प्राणप्रिय मित्राच्या प्राणांचें रक्षण ज्यानें केलें, त्याला मीं ती आंगठी तुझ्या शपथेमुळें प्रथम दिली नाहीं. परंतु तो तसाच गेल्यामुळें मला ती त्याच्या मागोमाग पाठवावी लागली. त्याच्याशीं मला कृतघ्नपणाचें लज्जास्पद वर्तन करवेना. यांत तुला माझा अपराध वाटत असेल, तर मी तुझी क्षमा मागतों! पण एवढे मात्र तुला मी खात्रीनें सांगतों, कीं त्या प्रसंगीं जर तूं तेथें असतीस, तर ती आंगठी त्या वकिलाला देण्याबद्दल तूंच मला आग्रह केला असतास.

मृणालिनी–मी तेथें असतें तर काय केलें असतें हें सांगवत

नाहीं. पण येथें तरी आपणाशी मी कांहीं झालें तरी भाषण म्हणून करणार नाहीं.

बसंत–तर मग मी अभागी आहें–

[मारि कोळू अनू०]

शून्य जन गमे । चारुगात्रि हा । दारुण बहु ॥ धृ० ॥
रोषा टाकोनी । तोषा घे रमणी । श्लेषा देई जवें ॥ १ ॥
जरि नयन मिटीत नलिनी दयित मधुप दीन होय ।
सखये स्थिति तेविं । मम या क्षणिं होई । लोपें रोष तमें ॥ २ ॥

मृणालिनी–माझी अत्यंत आवडती अशी मुद्रिका आपण त्या वकिलाला देऊन टाकिली; जर तो कदाचित् येथें आला, तर मीही आपल्याप्रमाणेंच उदारता दाखवीन. त्याला मी आपलें सर्वस्व वाहीन. तो आणि मी जणु काय एकच आहों, अशा रीतीनें मी त्याच्याशीं वागेन.

धनदत्त–या सर्व कलहाला कारण मी! मी कपाळकरंटा जन्मलों तरी कशाला?–

[याहुनी गुरुतर०]

जन्म मिळे तारि कां मजला ॥ धृ० ॥
हतभागी जगिं मजसम कोणी आजवरि न झाला ॥ १ ॥
अनर्थ मोदें अनुसरती बहु मज हतभाग्याला ॥ २ ॥

मृणालिनी–महाराज, आपल्याला विषाद मानण्याला कांहीं कारण नाहीं. आपण स्वस्थ असावें.

वसंत–मृणालिनि, एवढा अपराध मला क्षमा कर. या मित्रवर्गासमोर या तारकांची शपथ घेऊन सांगतों कीं, तुझा शब्द मी पुनरपि कधींही मोडणार नाहीं.

धनदत्त–मृणालिनि, एकदां मी या वसंताकरितां माझें शरीर गहाण टाकिलें होतें, आणि ज्यानें तुझ्या पतीची आंगठी मागून घेतली, त्यानें जर आपल्या चातुर्यानें मला सोडविलें नसतें, तर तें पूर्णपणें विनाश पावलें असतें; पण या प्रसंगीं माझे प्राणही जामीन ठेवून तुला वचन देतों कीं, वसंत आपली शपथ पुनः कधींही मोडणार नाहीं.

मृणालिनी–आपण यांना जामीन रहातां ? तर मग त्यांना ही मुद्रिका द्या; आणि पूर्वींच्या मुद्रिकेप्रमाणें हिला मी आमरण विसंबणार नाहीं, अशी त्यांच्याकडून शपथ घेववा.

धनदत्त–वसंता, ही घे मुद्रिका आणि शपथ व्हा.

वसंत– [भैरवी–त्रिवट.]

करितील प्राण वसति जों देहीं । अंतरिता ही मुद्रा
कधिंही तोंवरि सुतनु न होई ॥ ध्रु० ॥ प्रभुन-
यनचि जो हा रजनीपति आण तयाची वाहीं ॥ १ ॥

पण त्या वकिलाला मीं दिली तीच ही मुद्रिका !

मृणालिनी–मला ती त्यानेंच दिली. महाराज, असे विस्मयांत कां पडलां ?—

[तरुणीस ही सखे०]

अपराधिनी खरी । ही किंकरी ॥ ध्रु० ॥ युष्मदीय
मानसा । मार्दवीं मृणालशा । दुखवियलें, जनिं ।

लज्जा सोडुनि । सारि ॥१॥ पुरुषवेष सेवुनी । भ्रमविलें जनां मनीं । कालमुखांतुनि । सुजनबलि क्षणिं । वारिं ॥ २ ॥

हें पत्र घ्या आणि फुरसतीनें वाचा. कांचनपुरच्या उपेंद्रनाथ वकिलांकडून हें आलें आहे. यावरून तुह्माला कळून येईल कीं, ही मृणालिनीच 'अरविंद' वकील झाली होती आणि विशाखा माझा कारकून झाली होती. आपल्या अगोदर आह्मी निघालों आणि आपल्यापुढें आतांच आह्मी येऊन पोचतों आहों. अजून वाड्यांत आह्मी गेलोंच नाहीं. धनदत्त, आपल्याला एक आनंदाची बातमी सांगतें. हें पत्र फोडा. त्यांत तुह्माला फार आनंदाची बातमी आढळेल. आपलीं मौल्यवान् मालानें भरलेलीं तीन गलबतें मणिपुरच्या बंदरांत सुरक्षित येऊन पोंचलीं आहेत. मला हें पत्र कसें मिळालें हें मी आतां आपणास सांगत नाहीं.

धनदत्त–मी तर विस्मयानें अगदीं थक्क झालों आहें !

वसंत–प्रिये, तूं वकिलाच्या वेषानें आलीस आणि मी तुला कसें ओळखिलें नाहीं ? वकीलसाहेब, माझी प्रिया आपणाला सर्वस्व वहाणार आहे, त्याचा आपण खुशाल स्वीकार करावा !

धनदत्त–मृणालिनि, तुझे उपकार मी कसे फेडूं ? तूं मला जीवदान दिलेंस, इतकेंच नाहीं तर तूं मला वित्तदानही दिलेंस. कारण तूं दिलेल्या या पत्रांत तूं सांगितलेलें वृत्तच लिहिलें आहे. माझीं गलबतें मणिपुर बंदरांत सुरक्षित आहेत. ईश्वरी लीला अगाध आहे !

मृणालिनी–कलहंसजी, माझा कारकून तुह्मालाही एक आनंदाची बातमी कळवील–

विशाखा–आणि तुह्मी त्याबद्दल मला कांहींसुद्धां बक्षीस देऊं नका. हें करारपत्र शक्तिनाथानें तुमच्या आणि सारिकाबाईच्या नांवानें लिहून दिलें आहे. त्याच्या पश्चात् त्याची सर्व संपत्ति तुह्माला मिळणार आहे.

कलहंस–वकीलसाहेब, बुभुक्षितास आपण पंचपक्वान्नांचेंच भोजन घालीत अहां !

मृणालिनी–बहुतेक रात्र सरून प्रभातकाल आलाच. आपणा सर्वांना अजून साद्यंत हकीगत कळली नसल्यामुळें ती ऐकण्याची उत्कंठा लागून राहिली असेल. आतां आपण सर्व वाड्यांत जाऊं या. मग तेथें मी आपणाला सविस्तर वृत्तांत सांगेन.

तरंग–चला, आजपासून कानाला खडा लावून घेतला ! जगांत प्राणापेक्षांही जपून ठेवण्याची वस्तु ह्मटली ह्मणजे या विशाखेची आंगठी, हें तत्त्व आज माझ्या पूर्ण अनुभवास आलें.

धनदत्त–वसंता, तुझें आणखी जगदीशानें कोणतें प्रिय करावें ?

वसंत–माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत. परंतु जगदीश-कृपेनें हें होवो—

[सपनोंमे तेरि तजबीर०]

भारतीयललनाबुद्धि विकासा पावो।
स्त्रीनरोद्यमानें देश वैभवा घेवो॥
जगिं कुटिल जनांचा परिभव संतत होवो।
सज्जनगण सकलहि नित्य जयातें सेवो ॥ १ ॥

धनदत्त–तथास्तु.

[पडदा पडतो.]

ईशस्तुति.

[सुद बिसर गइ०]

तव रूपगुणगानिं । जाती प्रभो शिणुनि ।
श्रुति ' नेति ' संवचनिं । अबल निज कथिति जनिं ॥ ध्रु० ॥
मी ज्ञान–मति–हीन । जणु पापनद पूर्ण ।
स्तवुं केविं तुज दीन । क्षम न हा त्वत्स्तवनिं ॥ १ ॥
सकलसुखगुरुधाम । हृदयपरविश्राम ।
मधुमधुर तव नाम । संतत वसो वदनिं ॥ २ ॥
हृदयिं तव शुचिमूर्ति । श्रवणांतरीं कीर्ति ।
करुत सततचि वसति । हेतु एकचि भुवनिं ॥ ३ ॥

समाप्त.